**महाराष्ट्र विधानसभा**
**तिसरे अधिवेशन, २०१५**

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

u

**मंगळवार, दिनांक ०८ डिसेंबर, २०१५ / अग्रहायण १७, १९३७ ( शके )**

u

**(१) मुख्यमंत्री**
**(२) गृहनिर्माण, खनिकर्म व कामगार मंत्री** — **यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - १४२**

---

**भिवंडी (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रात जुन्या इमारतींवर अनधिकृतपणे नवीन मजले उभारल्याबाबत**

**(१) * ३७८४५ uश्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण)ण:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) भिवंडी (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रात जुन्या इमारतींवर नवीन मजले अनधिकृतपणे बांधले जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तेथील प्रभाग अधिकारी अशा बांधकामांवर कोणतीही कार्यवाही न करता अनधिकृत बांधकामांना प्रोत्साहन देत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

सदर बाब भिवंडी महानगरपालिकेस ऑक्टोबर, २०१५ पूर्वी पासून ज्ञात असून जुन्या इमारतीवर नवीन मजले अनधिकृतपणे बांधले जात असल्याची १९५ प्रकरणे निदर्शनास आले आहेत.
(२) हे खरे नाही.

या सर्व १९५ भोगवाटधारकांना महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमातील कलम ५२ ते ५५ अन्वये नोटीसा देण्यात आल्या असून ७४ भोगवाटधारकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत व इतर भोगवटाधारकांवर गुन्हे दाखल करण्याची

कार्यवाही सुरु आहे.
(३) शासनाने वेळोवेळी या प्रकरणी कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त, भिंवडी निजामपूर शहर महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

-----------------

u

**राज्यातील माथाडी कामगार संयुक्त समिती व हमाल मापाडी महामंडळाच्या मागण्यांबाबत**

u

**(२) * ३२८७८ uश्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण)ण:** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्यातील माथाडी कामगार संयुक्त समिती व महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाने माथाडी कायद्याची अंमलबजावणी करणे, हमालाच्या पाटीचा लिलाव करणारी कंत्राटी पध्दत बंद करणे, कामगार खात्यातील अधिकारी, कर्मचारी यांची रिक्त असलेली पदे तात्काळ भरणे इत्यादी मागण्यांबाबत दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी राज्यात लक्षणीय काम बंद आंदोलन केले. तसेच महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाने मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १५ जुलै, २०१५ रोजी राज्यात अनेक ठिकाणी धरणे आंदोलन करुन मागण्या मंजूर करण्याबाबतचे निवेदन देऊनही कोणतीही कार्यवाही होत नसल्याने पुन्हा दिनांक २ ऑक्टोबर, २०१५ रोजी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाचे दि.२/१०/२०१५ चे निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) माथाडी कामगारांना संरक्षण देण्याच्या उद्देशाने व कायद्याखालील तरतूदींच्या गैरवापरास प्रतिबंध करुन अनुचित प्रथांना आळा घालण्याकरीता माथाडी अधिनियम व त्याखालील योजनेत परिणामकारक उपाययोजना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. त्याचप्रमाणे मापाडी महामंडळाच्या निवेदनानुषंगाने विभागातील रिक्त पदे तातडीने भरणे व उर्वरीत मागण्यांबाबत नियमानुसार कार्यवाही करण्याची बाबही शासनाच्या विचाराधीन आहे.`
(३) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

-----------------

**भिवंडी शहर परिसरात बेकायदा वास्तव करणाऱ्या २० बांग्लादेशी नागरिकांना दहशतवादविरोधी पथकाने अटक केल्याबाबत**

**(३) * ३२१७५ uश्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व)व:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u
(१) भिवंडी शहर परिसरात बेकायदा वास्तव करणाऱ्या २० बांग्लादेशी नागरिकांना दहशतवादविरोधी पथकाने (ATS) अटक केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बांग्लादेशी नागरिकांकडे बोगस पॅनकार्ड, आधार कार्ड, रेशन कार्ड आणि पासपोर्ट असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन कोणती कारवाई केली तसेच परदेशी नागरिकांची घुसखोरी रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, १५ व १६ ऑक्टोबर, २०१५ रोजी अनुक्रमे ३ व १७ बांग्लादेशी नागरिकांना अटक केली आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी दहशहतवाद विरोधी पथक, ठाणे यांनी गु.र.नं. १५/२०१५ अन्वये २० घुसखोर बांग्लादेशीना अटक करण्यात येऊन त्यांच्या विरूद्ध काळाचौकी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे व गुन्ह्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन तपास करण्यात येत आहे. तसेच, पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर मार्फत विशेष शोध मोहिम राबवून कायदेशीर कारवाई करण्याचे आदेशीत करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

-----------------

**उल्हासनगर महापालिकेच्या ताब्यात असलेल्या**
**कॉम्पलेक्समधील भूखंडाबाबत**

u
**(४) * ३३१२८ uश्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य)य:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u(१) उल्हासनगर महानगर पालिकेच्या (जिल्हा ठाणे) ताब्यात असलेली कॉम्प्लेक्समधील हजारो चौरस मीटरची मालमत्ता खाली करुन भुमाफीयांना देण्याचा घाट घातला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार भूमाफियांना भूखंड देणा-या दोषी अधिकारी व कर्मचा-यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u
**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) उल्हासनगर महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या कॉम्प्लेक्समधील मालमत्ता खाली करुन भूमाफियांना देण्याचा महापालिकेने घाट घातलेला नाही. तथापि अशा आशयाची बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली होती हे खरे आहे.
(२) वुडलॅन्ड कॉम्प्लेक्स इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेमध्ये कार्यरत असलेले शिक्षण मंडळाचे कार्यालय मुख्य कार्यालयापासून दूर असल्यामुळे व सध्या शिक्षण मंडळ कार्यरत नसल्याने प्रशासकीय व कार्यालयीन नियंत्रणाच्या दृष्टीने सदर कार्यालय मुख्य इमारतीमध्ये स्थलांतरित करण्याबाबत महापौर व उपमहापौर यांनी आयुक्तांना कळविले होते. त्याअनुषंगाने महापालिका प्रशासनाकडून शिक्षण मंडळाचे कार्यालय मुख्य इमारतीत स्थलांतरित करण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु असतानाच वरील आशयाची बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली होती.
तथापि, महापालिका सदस्यांनी सदर कार्यवाहीस विरोध केल्याने शिक्षण मंडळाचे कार्यालय स्थलांतरीत करण्याचा निर्णय आयुक्त स्तरावर घेण्यात आलेला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

-----------------

u
**नवीन पनवेल येथील गाढी नदी ते पोदिपर्यंतचा परिसर सुशोभित करण्याबाबत**

u
**(५) * २८६०० uश्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर)र:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवीन पनवेल (नवी मुंबई) येथील गाढी नदी ते पोदिपर्यंतचा परिसर सुशोभित करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑगस्ट २०१५ मध्ये व्यवस्थापक संचालक, सिडको यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,य
(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वारंवार मागणी करूनसुद्धा सिडको प्रशासनमार्फत सुशोभिकरणाच्या संदर्भात कोणतीच कार्यवाही न झाल्यामुळे उक्त परिसरात घाणीच्या साम्राज्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) नाही. ी

(३) व (४) सिडको महामंडळाकडून सदर कामाचा नियोजन आराखडा जून, २०१५ मध्ये तयार करण्यात आलेला असून उक्त कामाचे अंदाजपत्रक बनविण्याचे काम विशेष सल्लागार यांचेमार्फत करण्यात येत आहे. अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर निविदा मागविण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येणार आहे.

-----------------

**वाशिम जिल्ह्यात रुग्णालयांमधून बाहेर पडणा-या जैव वैद्यकीय कच-याची विल्हेवाट लावण्याबाबत**

**(६) * २९७७३ uश्री.अमित झनक (रिसोड), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) ी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) वाशिम जिल्ह्यात रुग्णालयांमधून बाहेर पडणा-या जैव वैद्यकीय कच-याची विल्हेवाट लावण्यासंदर्भात अमरावतीच्या खासगी संस्थेला करारबध्द करुन नगर परिषदांनी जबाबदारी झटकली तर दुसरीकडे खाजगी रुग्णालयेदेखील बायोमेडिकल वेस्टेजची विल्हेवाट लावण्याकरीता संबंधित कंपनीकडून आकारले जाणारे शुल्क सोयीस्कररित्या रुग्णांकडूनच वसूल करत असल्याचे दिनांक २४ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच बायोमेडिकल वेस्टेज संकलन, वाहतूक प्रक्रिया व विल्हेवाटीसंदर्भातील सेवाशुल्क दरात दर दोन वर्षानी १० टक्के वाढ होणार असल्याने याचा आर्थिक फटका रुग्णानां बसणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?
u
**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) जैव वैद्यकीय घन कच-याची विल्हेवाट शास्त्रीय पध्दतीने करावयाची तांत्रिक सक्षमता वाशिम नगरपरिषदेकडे नसल्यामुळे नगरपरिषदेने ग्लोबल इको सेव्ह सिस्टीम यांच्याबरोबर सदर कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी दि. २९/११/२००७ रोजी करार केला आहे.

त्यानुसार जैव वैद्यकीय घन कच-याच्या विल्हेवाटीसाठी आकारण्यात येणारे सेवा शुल्क हे संबंधीत यंत्रणा रुग्णालय व्यवस्थापनाकडून प्रती खाटानुसार वसुल करते.
(२) जैविक कच-याच्या संकलनाबाबत सेवा शुल्कात दर दोन वर्षानी १० % वाढ करण्याची तरतूद करारात आहे, त्यामुळे प्रश्न भाग-१ मध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे सेवाशुल्क हे रुग्णालय व्यवस्थापनाकडून वसुल करण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.
(४) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

-----------------

u

**मुंबईच्या छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळाशेजारील पंचतारांकित हॉटेल्सच्या बेसमेंन्टचा विनापरवाना**

## व्यावसायिक वापर होत असल्याबाबत

u

**(७) * ३२०६२ uश्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व)व:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) मुंबई विकास नियंत्रण नियम ३८ (९) अंतर्गत बेसमेन्टच्या व्यावसायिक वापराला बंदी असतानाही मुंबईच्या छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळाशेजारील हॉटेल द लिला, सहार, अलीट, ग्रॅन्ड मराठा, हयात, हॉटेल ली मरेडियन हे पंचतारांकित हॉटेल्स शासनाची परवानगी न घेता अवैधपणे सदरहू जागेचा स्पा, सलून, जीम, बीझनेस सेंटर यासाठी वापर करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू हॉटेल्स विमानतळाशेजारी असून तेथे अनेक परदेशी पर्यटक वास्तव्यास रहात असून बेसमेंटमधील अवैध आस्थापनांमध्ये आग लागल्यास तेथे मोठी जीवित हानी उदभवू नये यासाठी तेथील लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्ते यांनी महापालिका आयुक्त यांना पत्र लिहून कारवाईची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात मरोळ अग्निशमन दलाने कोणालाही बेसमेन्टचा वापर करण्याची परवानगी दिलेली नसल्याचे माहितीच्या अधिकारान्वये तेथील सामाजिक कार्यकर्ते यांना माहिती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हॉटेल द लिला, सहार, ललित, ग्रॅन्ड मराठा, हयात, हॉटेल ली मरेडियन या पंचतारांकित हॉटेल्सच्या आस्थापनांच्या बेसमेंटमध्ये स्पा सलून, जीम, बिजनेस सेंटर कार्यरत असल्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई मनपा अधिनियमाच्या कलम ४८८ अन्वये कार्यवाही करण्यात आली. सदर कार्यवाहीत उपरोक्त ६ हॉटेल्सपैकी हॉटेल लि. मेरेडियनच्या (हिलटन) बेसमेंटमध्ये हॉटेलने, बृहन्मुंबई महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आराखडयातील निर्देशित वापरात बदल करुन सलून, स्टाफ कॅन्टीन आणि कार्यालय सुरु केले असल्याचे निदर्शनास आले.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) हॉटेल लि. मेरेडियनने (हिलटन), बृहन्मुंबई महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आराखडयातील निर्देशित वापरात बदल करुन तेथे सलून, स्टाफ कॅन्टीन आणि कार्यालय सुरु केले असल्याचे निदर्शनास आल्यामुळे, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत त्यांच्यावर एम.आर.टी.पी. कायद्यांतर्गत कलम ५३ (१) ची कार्यवाही करण्यात आली असून पुढील कार्यवाही नियमानुसार करण्यात येत आहे.

-----------------

u

**जुने धुळे सर्व्हे नं ३६ वरील ९० घरकुल लाभार्थीच्या तयार करण्यात आलेल्या बोगस यादीची चौकशी करण्याबाबत**

u

**(८) * ३३५५९ uश्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर)र:** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) जुने धुळे सर्व्हे नं ३६ वरील ९० घरकुल लाभार्थीच्या तयार करण्यात आलेल्या बोगस यादीची चौकशी करुन दोषी व्यक्तीविरुध्द कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीं, धुळे यांनी दिनांक १३ मार्च, २०१५ रोजी व तदनंतर अनेक वेळा मा. गृहनिर्माण मंत्री यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्षात ९० घरकुल लाभार्थी असतांना २१२ घरकुल लाभार्थी दाखवून तयार केलेली योजनेत गैरव्यवहार झाल्यामुळे याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. प्रकाश मेहता :** (१) विधानसभा सदस्य, धुळे यांनी मंत्री (गृहनिर्माण) यांच्याकडे दिनांक २३/३/२०१५ रोजीच्या पत्रान्वये धुळे येथील आयएचएसडीपी प्रकल्पासंदर्भात तक्रार केली आहे.

(२) व (३) सन्माननीय सदस्यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासन निकषानुसार पात्र लाभार्थीबाबतचे संपूर्ण निकष तपासल्यानंतरच व त्यांची खात्री करण्याची जबाबदारी आयुक्त, धुळे मनपा यांच्यावर ठेवण्यात आली असून त्याची खातरजमा सुकाणू अभिकरण (म्हाडा) हे करतील व त्यानंतरच पात्र लाभार्थीना घरकुलाचे वाटप करण्यात यावे, असे दि. १६ जुलै, २०१५ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त धुळे मनपा यांना निदेश देण्यात आले आहेत, याअनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे. आजपावेतो कोणीही लाभार्थ्यांस घरकुलांचे वाटप करण्यात आले नाही.

-----------------

**मुंबईत उत्तुंग इमारती उभारण्यासाठी डिझास्टर प्लॅन तयार करण्याबाबत**

u

**(९) * ३३०१५ uॲड.भीमराव धोंडे (आष्टी)ी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) मुंबईत आगामी १० वर्षात ४५० उत्तुंग इमारती उभारण्यास महानगरपालिकेच्या हायराईज समितीने मंजूरी दिली असून या इमारती ३० ते ३५ वर्षांनी धोकादायक ठरण्याची शक्यता असतानाही मुंबई महानगरपालिकेकडे वा राज्य शासनाकडे या इमारतींचा डिझास्टर प्लॅन तयार नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ च्या तिस-या

सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या इमारतींचा डिझास्टर प्लॅन तातडीने तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ते (३) प्रश्नाधीन धोकादायक इमारतीची बाब विचारात घेता मुंबई महानगरपालिका अधिनियमात यासंदर्भाने तरतूदी आहेत, शासनाने यापूर्वी मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये सन २००९ मध्ये सुधारणा करुन तीस वर्षावरील इमारतीसंदर्भात प्रत्येक मालकास संरचनात्मक स्थैर्य (Structural Stability) असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक केलेले असून त्या अनुषंगाने इमारतीमध्ये सुधारणा करणेही बंधनकारक केलेले आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्र. ११९५०/२०१३ मध्ये दिनांक १७ डिसेंबर, २०१३ रोजी आदेश देवून मुंबईतील उंच इमारतीच्या प्रस्तावाचा छाननी करणेसाठी श्री. पी.एस.पाटणकर, निवृत्त न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय यांचे अध्यक्षेतेखाली तज्ञ समिती गठीत केलेली आहे. सदर समिती दिनांक ९ जुन, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यरत झालेली आहे, त्यामध्ये स्थापत्य अभियांत्रिकी विभाग, आय.आय.टी. मुंबई येथील प्राध्यापक, तसेच व्हिजेटीआय, मुंबई येथील संरचनात्मक अभियांत्रिकी विभागाचे प्राध्यापक, निरी या संस्थेचे शास्त्रज्ञ, श्री. पंकज जोशी, वास्तुविशारद या तज्ञ व्यक्तीचा समावेश आहे.

सदर समितीकडून प्रामुख्याने ७० मी, पेक्षा जास्त उंच असलेल्या इमारतीच्या प्रस्तावाची छाननी करणेत येत आहे, उत्तुंग इमारतीची संरचना संकल्पचित्र ही BIS (IS: १८९३(Part-१) २००२) च्या भूकंपरोधक तरतुदीनुसार (Semic Zone -III) तपासली जातात त्यामुळे भविष्यात हया इमारती मुंबईतील भूकंपाचे धक्के सहन करुन शकतील.

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेस शहर आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण म्हणून घोषित करण्यात आलेले आहे, त्यामुळे प्रश्नाधीन बाब पडताळणेच्या त्यांना सूचना देणेत येत आहेत.

-----------------

u

## निफाड (जि.नाशिक) येथील क्सिस बँकेच्या एटीएम मशीनमधून १७ लाख ९६ हजार रुपयांची झालेली चोरी

u

**(१०) * २९९८६ uश्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) ी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) निफाड (जि.नाशिक) येथील शनि चौकात कर्डिले बिल्डींगमध्ये असलेल्या क्सिस बँकेच्या एटीएम मशीनमधून तंत्रज्ञानाचा वापर करुन १७ लाख ९६ हजार रुपये अज्ञात

संशयितानी चोरुन नेल्याची घटना घडली असल्याचे माहे ऑगस्ट २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर चोरीचा तपास करुन संशयित आरोपी शोधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?
u
**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
नमुद प्रकरणी रु. १७,१८,६००/- चोरी झाल्याबाबत निफाड पोलीस स्टेशन गुरनं १४१/२०१५ भा.दं.वि.क. ३८० प्रमाणे गुन्हा दाखल आहे.
(२) आरोपीचा शोध घेण्यासाठी विशेष तपास पथक तयार केले आहे. एटीएम मशिन हाताळणारे व्यक्तीच्या फिंगरप्रिंट घेवून तपासणीसाठी पाठविण्यात आल्या आहेत. सीसीटीव्ही फुटेज प्राप्त करुन घेवून आरोपीची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. घटनास्थळाचा मोबाईल डंप डाटा प्राप्त करुन घेण्यात आला असून तांत्रीक विश्लेषणाद्वारे आरोपीचा शोध घेण्यात येत आहे. तसेच अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्या आरोपींचा तपास करुन आरोपी शोधण्याचा कसोशीने प्रयत्न चालु आहेत.त
(३) तपासात विलंब झालेला नाही.

-----------------

u

## राज्यातील धर्मादाय रुग्णालयांमधून गरीब रुग्णांना वैद्यकीय उपचार दिले जात नसल्याबाबत

u

**(११) * २९२९९ uश्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) ी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) राज्यात मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अंतर्गत सार्वजनिक धर्मादाय न्यासाकडे नोंद असलेल्या धर्मादाय रुग्णालयात एकूण खाटांच्या दहा टक्के खाटा गरीब आणि दहा टक्के दुर्बल घटकांमधील रुग्णांसाठी राखून ठेवून अनुक्रमे मोफत तसेच निम्या दरात वैद्यकीय सेवा देण्याचे न्यासाचे स्पष्ट निर्देश असताना या रुग्णालयांमधून सदर रुग्णांना वैद्यकीय उपचार दिले जात नसल्याचे माहे ऑगस्ट,

२०१५ च्या पहिल्या आठवड्यात शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच दादरच्या शुश्रुषा रूग्णालयात खाट रिकामी नसल्यामुळे एका रूग्णाचा मृत्यू झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त रुग्णालयांवर देखरेख ठेवण्यासाठी धर्मादाय सहआयुक्त, सहसंचालक, आरोग्यसेवा, रुग्णालयातील कामगार संघटनेचे प्रतिनिधी आणि महापालिकेचे कार्यकारी आरोग्य अधिकारी आदिंची समिती गठीत केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर समितीला कोणकोणत्या त्रुटी आढळलेल्या आहेत,
(५) असल्यास, त्यानुसार न्यासाच्या निर्देशाचे पालन न करणा-या रुग्णालयांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u
**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

काही धर्मादाय रुग्णालयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम ४१ क क व त्याअंतर्गत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी मंजूर केलेल्या योजनेचे पालन न केल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) दादरचे शुश्रुषा रुग्णालय हे धर्मादाय रुग्णालय नाही. तथापि सदर रुग्णालय राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये अंगीकृत करण्यात आले होते. परंतु सदर रुग्णालयाने योजनेतंर्गत केलेली कामगिरी विचारात घेऊन दि. ३०.०५.२०१४ रोजी झ ाालेल्या बैठकीत सदर रुग्णालयाचे अंगीकरण रद्द करण्याचा निर्णय सार्वजनिक आरोग्य विभागाने घेतला आहे.
(३) महाराष्ट्र विश्वस्तव्यवस्था कायद्याअंतर्गत नोंदणीकृत रुग्णालयांची तपासणी करण्यासाठी तपासणी समिती व उच्चाधिकार समिती सार्वजनिक आरोग्य विभागाने गठित केली आहे. त्यानुसार तपासणी समिती खालीलप्रमाणे आहे.

१. सह धर्मादाय आयुक्त - अध्यक्ष
२. सहायक संचालक आरोग्य सेवा- सदस्य सचिव
३.मुख्य वैद्यकीय अधिकारी / प्रतिनिधी महानगरपालिका u- सदस्य
४. सहायक विक्रिकर आयुक्त - सदस्य

(४) महाराष्ट्र विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम ४१ क क व त्या अंतर्गत मा.उच्च न्यायालयाने मंजूर केलेल्या योजनेतील काही अटी व शर्तींचे पालन काही धर्मादाय रुग्णालयांनी न केल्याचे तपासणी समितीच्या निदर्शनास आले आहे.
(५) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम ४१ क क व त्याअंतर्गत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी मंजूर केलेल्या योजनेचे पालन न केलेल्या मुंबईतील ९ व पुणे येथील ३ धर्मादाय रुग्णालयांना शासनाच्या विविध विभागांनी / कार्यालयांनी व केंद्र शासनाने दिलेल्या विविध सोयी सवलती काढून घेणेबाबत शासनाच्या विविध विभागांना / कार्यालयांना व केंद्र शासनास कळविण्यात आले आहे. तसेच, मुंबईतील ५ धर्मादाय रुग्णालयांना ताकीद देण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्‌भ्‌ ावत नाही.

-----------------

u

## पुणे महानगरपालिकेतील कंत्राटी कामगारांना नियमाप्रमाणे वेतन मिळण्याबाबत

u

**(१२) * ३०३९३ uश्री.अमर काळे (आर्वी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी)ी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) पुणे मनपाच्या आरोग्य, घनकचऱ्यासह विविध विभागातील कामांसाठी ठेकेदारांकडून नेमण्यात आलेल्या कंत्राटी कामगारांना नियमाप्रमाणे वेतन दिले जात नसल्याचे आणि पीएफ कापल्याचे दाखवूनही तो भरला नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे महानगरपालिकेत ठेकेदारांकडून नेमण्यात आलेल्या कंत्राटी कामगारांना नियमाप्रमाणे वेतन दिले जात नसल्याचे आणि पी.एफ. कापल्याचे दाखवूनही तो भरला नसल्याची बाब पुणे महानगरपालिकेच्या निदर्शनास आलेली नाही.

पुणे महानगरपालिकेकडून ठेकेदारांना किमान वेतन दराने व इतर सर्व देय लाभानुसार बिल अदा करण्यात येत आहे.

ठेकेदारामार्फत सेवा घेण्यात येणाऱ्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन दराने वेतन अदा करणे व इतर लाभ देणे यापुर्वीच दिनांक १२.३.२०१५ च्या पुणे महानगरपालिकेच्या कार्यालयीन आदेशान्वये बंधनकारक करण्यात आले आहे.

(२) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

(३) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

-----------------

u

## अंधेरी (पश्चिम), मुंबई येथील गिल्बर्ट हिल परिसरात खेळाच्या मैदानासाठी आरक्षित भूखंडावर झालेले अतिक्रमण

u

**(१३) * ३३४८४ uश्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण)ण:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) अंधेरी (पश्चिम), मुंबई येथील गिल्बर्ट हिल परिसरात खेळाच्या मैदानासाठी आरक्षित करण्यात आलेला भूखंड एका बिल्डरने ताब्यात घेतल्याचे माहे सप्टेंबर,

२०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार बिल्डरने ताब्यात घेतलेला भूखंड परत मिळविणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंधेरी (पश्चिम) येथील गिल्बर्ट हिल परिसरात विकास नियोजन आराखडयात कोणताही भूखंड खेळाच्या मैदानासाठी (PG) आरक्षित नाही. तथापि सदर परिसरात महानगरपालिकेच्या उद्यान खात्याच्या ताब्यात असलेले युसुफ मेहेर अली मनोरंजन उद्यान व न.भू.क्र. २५०/इ हे दोन्ही भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियोजन आराखड्यानुसार मनोरंजन मैदान (RG) म्हणून आरक्षित असून त्यावर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

-----------------

u

**दत्तवाढ (ता.शिरोळ जि.सांगली) येथे बनावट नोटांचा कारखाना स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पथकाने उध्वस्त केल्याबाबत**

**(१४) * २९२९७ uडॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम)म:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) दत्तवाढ (ता.शिरोळ, जि.सांगली) येथे बनावट नोटांचा कारखाना स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पथकाने उध्वस्त केला असून या बनावट नोटांच्या रॅकेटमध्ये आंतरराज्य टोळी कार्यरत असल्याची शक्यता पोलीस सुत्राकडून वर्तविण्यात येत असल्याचे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने यासंदर्भात चौकशी करुन संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) प्रकरणी नमूद ठिकाणी आरोपीच्या घरुन एक हजार रुपयाच्या बनावट नोटा, छपाईची सामुग्री जप्त करण्यात आली आहे. तसेच एक हजार रुपयाच्या ३४३५ बनावट नोटा चलनात आणण्यासाठी जवळ बाळगल्याबाबत ११ आरोपी विरुध्द महात्मा गांधी चौक, पोलीस ठाणे मिरज येथे गु.र.नं. ९/१५ भा.दं.वि.क. ४८९(अ), ४८९(ब), ४८९(क), ४८९(ड), ३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्यात आंतरराज्य आरोपींचा सहभाग आढळून आलेला नाही.
(२) दाखल गुन्ह्यातील सर्व ११ आरोपींना अटक करण्यात आली असून आरोपीकडून एक हजाराच्या ३४३५ बनावट नोटा तसेच नोटा तयार करण्याची सामुग्री जप्त करण्यात आली. पोलीस कोठडी व न्यायालयीन कोठडी घेवून तपास करण्यात आला

आहे. अटक आरोपीपैकी ९ आरोपींना सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. सर्व आरोपींविरुध्द दोषारोप पत्र न्यायालयात दाखल केले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(३) विलंब झालेला नाही.

-----------------

**मुंबईतील वरळी गावाचा विकास करण्याबाबत**

**(१५) * ३२१४० uश्री.सुनिल शिंदे (वरळी)ी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) मुंबई महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर सन १९१८-१९ मध्ये इंम्प्रुव्हमेंट ट्रस्ट बोर्डाने विविध विकास योजना मुंबईत राबविल्या असून त्यापैकी क्रमांक ५२ ही योजना वरळीसाठी तयार करण्यात आली आहे व सदर योजनेतंर्गत विविध भागातील जमिनी विकास कार्यासाठी संपादीत करण्यात आल्या असून वरळी कोळीवाडा येथील सुमारे ६० एकर परिसर संपादीत करण्यात न आल्याने सदर परिसर आजतागायत अविकसित राहिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वरळी गावाच्या सीमेवर असणा-या आय.एन.एस. त्राता या नौदलाच्या रडार यंत्रणेमुळे आणि सी.आर.झेड. कायद्याच्या निर्बंधामुळे वरळी गावाचा पुर्नविकास रखडलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सध्या प्रचलित असणा-या अनेक विकास नियमावलीपैकी वरळी गावासाठी एकही विकास नियमावली लागू होत नसल्याने वरळी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी वेगळा डी. सी. कायदा तयार करण्यासाठी शासनाकडून कोणती ठोस कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सन १९१८-१९ साली मुंबई महानगरपालिकेने सुधार योजना क्र. ५२ या सुधार योजनेनुसार जमिनी संपादित करण्याची कार्यवाही सुरु केली होती.

तथापि, भूसंपादनाची कार्यवाही करतेवेळी वरळी कोळीवाडा येथील रहिवाश्यांना भूसंपादन अधिकाऱ्यांना केलेल्या विरोधामुळे भूंसपादनाची कार्यवाही पूर्णत्वास आली नाही व मुंबई सुधार समितीच्या ठराव क्र. ५९४, दिनांक २७ फेब्रुवारी, १९३१ व ठराव क्र. ७२१ दिनांक २१ फेब्रुवारी, १९३३ अन्वये वरळी कोळीवाडयातील मूळ ४५७ घरमालकाची जमिन डी-नोटीफाईड करुन भूसंपादन कार्यवाहीचा मोबदला ज्या लोकांनी स्विकारला होता तो त्यांनी परत करुन सदर मोबदल्याचा परतावा केल्याबाबत विहीत नमून्यातील पावती सादर केल्यानंतर सदर जमिनी मूळ मालकांकडे परत देण्याची कार्यवाही करण्यात येईल असे ठरविण्यात आले, तथापि गावकऱ्यांनी सदर पावत्या सादर न केल्याने पुढील कार्यवाही होवू शकलेली नाही.

(२) वरळी गाव हे नौदलांच्या आस्थापनेच्या ५०० मी. परीघ क्षेत्रामध्ये असल्याने तसेच सीआरझे क्षेत्रामध्ये येत असलेले विकासावर निर्बंध येत आहे, ही वस्तूस्थिती आहे.
(३) व (४) केंद्र शासनाच्या पर्यावरण व वनमंत्रालयाकडून दिनांक ६ जानेवारी २०११ रोजी नवीन अधिसूचना अंमलात आणलेली आहे, सदर अधिसूचनेतील तरतूदीनुसार मुंबईतील कोळीवाडयाबाबत विशेषत्वाने विचार झालेला आहे, त्यानुसार कोळीवाडे म्हणजे कोळी समाजाच्या वसाहती यामध्ये निवासी बांधकाम तसेच पुनर्बांधकाम अनुज्ञेय करणेत आलेले आहे.

शासनाने दिनांक ८ मे, २०१२ रोजीचे अधिसूचनेन्वये बृहन्मुंबईच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल मंजूर केलेला असून त्यानुसार गावठाणांप्रमाणे कोळीवाडयांच्या पुनर्विकासासाठी चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणेत आलेला आहे.

कोळीवाडयांच्या पुनर्विकासासाठी कोळीवाडयांच्या सीमा जमीन महसूल अभिलेखामध्ये विहीत होणे आवश्यक असलेने यासंदर्भात कार्यपध्दती व मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यासाठी शासन महसूल व वन विभागाकडे दिनांक १९ नोव्हेंबर, २०१२ रोजी उप संचालक, भूमि अभिलेख कोकण प्रदेश, मुंबई व इतर सदस्याची समिती नियुक्त असून सदर समितीने सादर केलेल्या अहवालावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

शासनाने दिनांक ४ नोव्हेंबर, २०१० रोजीच्या परिपत्रकानुसार बृहन्मुंबई क्षेत्रामध्ये कोणतीही विकास परवानगी मंजूर करण्यापूर्वी त्या परिसरात डिफेन्स, नेव्ही वगैर यंत्रणा असल्यास त्याचे नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे अशा सूचना दिलेल्या होत्या, त्यामध्ये संरक्षण विभागाच्या सूचनानुसार शासनाने दिनांक २१ फेब्रुवारी, २०१५ रोजी काही सुधारणा केलेल्या असून निर्बंध काही प्रमाणात शिथिल केलेले आहेत.

वरळी गांवाच्या विकासासाठी शासन प्रयत्नशील आहे, बृहन्मुंबई क्षेत्रासाठी प्रारुप विकास योजना बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून पुनप्रसिध्द करणेत येणार आहे, त्यामध्ये गुणवतेनुसार वरळी गावाच्या क्षेत्रामध्ये विकास प्रस्तावाचे नियोजन बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून संकल्पित आहे.

-----------------

**वांद्रे (पूर्व) शासकीय वसाहतीतील ९६ एकर भूखंड विदेशी संस्थांच्या कार्यालयासाठी देण्यात येणार असल्याबाबत**

**(१६) * २९६१९ uश्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुरेश लाड (कर्जत)तश्री.संजय केळकर (ठाणे),:** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वांद्रे (पूर्व) शासकीय वसाहतीतील ९६ एकर भूखंड विदेशी संस्थांच्या कार्यालयासाठी देण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर निर्णयास तेथील वसाहतीत राहणा-या शासकीय कर्मचा-यांनी व त्यांच्या संघटनेनी शासनाकडे तीव्र विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) ते (४) गृहनिर्माण विभागामार्फत विधानसभा-विधानपरिषद सदस्य आणि राज्यातील खासदारांना सूचनांसाठी पाठविण्यात आलेल्या प्रारुप गृहनिर्माण धोरणात असा प्रस्ताव होता.

यासदर्भात कोणताही निर्णय झालेला नाही.

-----------------

## रायगड जिल्हयातील रिलायन्स व भूषण स्टिल कारखान्यातील कामगारांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत

**(१७) * २८७१४ uश्री.मनोहर भोईर (उरण)ण:** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हयातील पातळगंगा औद्योगिक वसाहतीमधील रिलायन्स कारखाना व खालापूरजवळ सावरोली येथील भूषण स्टिल कारखाना कामगारांच्या आंदोलनामुळे मागील चार महिन्यापासून बंद आहे, हे खरे आहे काय,य
(२) असल्यास, या कारखान्यातील कामगारांच्या मागण्या काय आहेत तसेच मागण्या पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) कामगारांच्या आंदोलनामुळे रिलायन्स इंडस्ट्रीज मधील स्पिनिंगचे ३ विभागातील (सीपी-३, सीपी-७ व ट्रॉली एफडीवाय) कामकाज जून,२०१५ पासून बंद आहे. तर भूषण स्टील मध्ये १०/७/२०१५ ते २०/७/२०१५ व ३०/९/२०१५ ते १/१०/२०१५ या कालावधीत उत्पादन प्रक्रिया बंद होती हे खरे आहे.
(२) समान काम समान वेतन देणे, मागील सर्व फायदे देणे, कंत्राटी कामगारांना मुख्य मालकाच्या सेवा पटलावर घेणे, कंत्राटी बडतर्फ केलेल्या कामगारांना पूर्ववत कामावर घेणे, किमान वेतन दरानुसार वेतन मिळावे इत्यादी मे.रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड, पाताळगंगा मधील कामगारांच्या मागण्या आहेत.

बडतर्फ केलेल्या कंत्राटी व नियमित कामगारांना पूर्ववत कामावर घेणे, सन २०१४-१५ ची थकीत वेतनवाढ द्यावी, कंत्राटी कामगारांना मुख्य मालकाच्या सेवापटलावर घेणे या मे.भूषण स्टील लिमिटेड, सावरोली, खालापूर मधील कामगारांच्या मागण्या आहेत.

उपरोक्त कारखान्यांतील कामगारांच्या उपरोक्त मागण्यांबाबत कामगार विभागातील सर्व स्तरावर तसेच शासन स्तरावर बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. तसेच दोन्ही आस्थापनांबाबत कंत्राटी कामगार पध्दतीचा निर्मुलन प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.`
(३) प्रश्न उद्भ्‌ ावत नाही.

-----------------

## मुंबई महापालिका शिक्षण विभागाने बँक खात्याचे बनावट धनादेश पारित केल्याबाबत

**(१८) * ३३४०५ uश्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), डॉ.विजयकुमार गावीत (नंदुरबार), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.जीवा गावित (कळवण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.प्रशांत बंब (गंगापूर)र:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) मुंबई पालिका शिक्षण विभागाच्या बँक खात्याच्या बनावट धनादेशाचे प्रकरण माहे ऑगस्ट, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बँक खात्याच्या बनावट धनादेशामुळे बँकेने महापालिकेच्या शिक्षण विभागाचे खाते गोठवल्यामुळे तब्बल ३९ महिला बचत गटांना देण्यात आलेले धनादेश वटले नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रश्नाबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली तसेच महिला बचत गटांचे देयक देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) शालेय पोषण आहार योजनेतर्गत भारतीय स्टेट बँक, मुख्य शाखा, फोर्ट, मुंबई येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाचे कार्यान्वित असलेले चालू खाते (current Account) क्रमांक ३०६८२४९४४९८ चा राजेश स्टील एजन्सी यांनी १२९८८१ या क्रमांकाचा सादर केलेला बनावट धनादेश मंजुरीकरीता मंजुरी विभाग, भारतीय स्टेट बँक, मुख्य शाखा, फोर्ट, मुंबई यांच्याकडे दिनांक १५ जुलै, २०१५ रोजी प्राप्त झाला होता,
(२) हे खरे आहे,

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मुख्य शाखेमध्ये असलेल्या दोन्ही खात्यांचा व्यवहार दिनांक २४ ऑगस्ट, २०१५ पासून पुन:श्च चालू करण्यात येऊन, दिनांक १५ जुलै, २०१५ रोजी नामंजूर झालेले ३९ महिला संस्थाचे धनादेश संबंधित संस्थांना पुन्हा देण्यात आले आहेत व ते त्यांच्या खात्यामध्ये जमा झ ााले आहेत,
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यालयातील नोंदीनुसार व भारतीय स्टेट बँक यांच्याकडून प्राप्त करुन घेतलेल्या छायांकित प्रतीनुसार बँक खात्याच्या जमाखर्चाचा ताळमेळ (Bank Statement) बृहन्मुंबई महानगरपालिकेने पाहिला असता, केशर महिला मंडळ यांचे नावे दिलेला धनादेश क्रमांक १२९८८१, दिनांक ३१ मार्च, २०१५ रक्कम रुपये ८५,५०६/- दिनांक १० जुन, २०१५ रोजी उपरोक्त खात्यामधून मंजूर होऊन सदर

रक्कम वजा (Debit) झाल्याचे दिसून आले,

परंतु राजेश स्टील एजन्सी यांचे नावे प्राप्त झालेला रु. १४,५८,७६२/- रक्कमेचा धनादेश क्रमांक १२९८८१, दिनांक ०७ जुलै, २०१५ हा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून पारीत केला नसल्याचे दिसून आले त्यामुळे राजेश स्टील एजन्सी यांनी बनावट धनादेश बनवून तो वटवण्याचा प्रयत्न करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेची फसवणूक करण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्यांच्या विरोधात बाजारपेठ पोलीस ठाणे, कल्याण येथे गुन्हा नोंदविण्यात आला असून बाजारपेठ पोलीस ठाणे यांच्यामार्फत पुढील तपास चालू आहे,

(४) प्रश्न उद्‌भ् ावत नाही.

-----------------

**नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखांमधील वाढत्या चोऱ्या व दरोडे रोखण्याबाबत**

u

**(१९) * २८४४७ uश्री.छगन भुजबळ (येवला), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव)व:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या रानवड शाखेत दिनांक २५ ऑगस्ट २०१५ रोजी, निमगाव शाखेत दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ रोजी व जळगाव नेऊर शाखेत दिनांक ६ ऑक्टोंबर २०१५ रोजी तसेच अंदरसूल, चांदवड येथे दरोडे टाकून कोटयावधी रुपयांची लुट करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच माहे जानेवारी २०१५ पासून सदर बँकेच्या तब्बल सहा शाखांमध्ये दरोड्यांच्या घटना घडल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दरोड्यांच्या घटनांमुळे सदर बँकेतून गृह कर्जाच्या फाईल गहाळ झ ााल्याचे माहे ऑक्टोंबर २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी तपास करण्यात आला आहे काय, तपासात काय आढळून आले व तदनुसार शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(५) तसेच नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखांमधील वाढत्या चोऱ्या व दरोडे रोखण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२)

प्रश्नात नमूद दिवशी व ठिकाणी घरफोडीच्या ५ घटना घडल्या आहेत. नाशिक जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँक, म. रानवड शाखेत रु. १,८०,३१,१००/- ची घरफोडी झ ााल्याबाबत पिंपळगांव बसवंत, पोलीस ठाणे येथे गुरनं ११५/२०१५ भा.दं.वि.क. ४५४, ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल आहे. निमगाव शाखेत घरफोडी करुन १३,५१,८७६/- चा मुद्देमाल चोरीबाबत मालेगांव तालुका पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २५२/१५, भा.दं.वि.क. ४५४, ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल आहे. जळगांव नेवूर शाखेत

घरफोडीच्या घटनेत रु. १७,२४,७६०/- चा मुद्देमाल चोरीबाबत येवला तालुका, पोलीस स्टेशनला गु.र.नं. १९८/२०१५, भा.दं.वि.क. ४५४, ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल आहे. निमोन शाखेतील रु. १९,३८,६९६/- चोरीबाबत चांदवड पोलीस स्टेशनला गु.र.नं. ९५/१५ भा.दं.वि.क. ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल आहे. तसेच रामपूर शाखेत चोरी करण्याचा प्रयत्न झाला असून याबाबत चांदवड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ९६/१५ भा.दं.वि.क. ४५७, ३८०, ५११ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. जानेवारी २०१५ पासून उक्त ५ बँका मधील घरफोडीच्या घटने व्यतिरिक्त दरोड्याच्या घटना घडलेल्या नाहीत.

(३) रानवड शाखेतील घरफोडीच्या घटनेत मुद्देमालासह खातेदाराचे दस्तऐवज चोरी झ ाालेले आहेत. इतर घटनेत दस्तऐवज चोरीस गेलेले नाहीत.
(४) आरोपीचा शोध घेण्यासाठी विशेष तपास पथक तयार केले आहे. आरोपीच्या फिंगरप्रिंट घेवून तपासणीसाठी पाठविण्यात आल्या आहेत. सीसीटीव्ही फुटेज प्राप्त करुन घेवून आरोपीची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. घटनास्थळाचा मोबाईल डंप डाटा प्राप्त करुन घेण्यात आला असून तांत्रीक विश्लेषणाव्दारे आरोपीचा शोध घेण्यात येत आहे. तसेच अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्या आरोपींचा तपास करुन आरोपी शोधण्याचे कसोशीने प्रयत्न चालु आहेत.त
(५) सर्व सहकारी व शासकीय/निम शासकीय बँक, पतसंस्था, पतपेढ्या, एटीएम मशिन याचे व्यवस्थापक, संचालक अधिकारी व पदाधिकारी यांची पोलीस अधीक्षक कार्यालयात बैठक घेवून बँकेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे, अलार्म सिस्टीम, हत्याधारी सुरक्षा रक्षक नेमणेबाबत लेखी सूचना दण्यात आल्या आहेत. सर्व पोलीस यंत्रणेने सतर्क राहून खबरदारी घेण्याबाबत आदेशीत केले आहे. तसेच बँकाच्या सुरक्षेबाबत आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.
(६) विलंब झालेला नाही.

-----------------

u

**औरंगाबाद येथील डिको-एन ७ परिसरातील तरुणीने वारंवार होणाऱ्या छेडछाडीला कंटाळून केलेली आत्महत्या**

u

**(२०) * ३०४४६ uश्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) ी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथील डिको-एन ७ परिसरात रहात असलेल्या व शिक्षण घेणाऱ्या कु.श्रृती अशोक कुलकर्णी या तरुणीने वारंवार होणाऱ्या छेडछाडीला कंटाळून दिनांक २० ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास आत्महत्या केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक पोलिसांत तक्रार करुनही कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा

करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) नाही.
(३) आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन, सिडको औरंगाबाद येथे गु.र.नं. ४२४/२०१५, कलम ३०६, ६५४(ड) भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास पूर्ण करून मा.न्यायालयात दि. १७.१०.२०१५ रोजी दोषारोप पत्र सादर करण्यात आलेले आहेत. तसेच सदर प्रकरणाशी संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना निलंबीत केले असून, त्यांची खातेनिहाय चौकशी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भ् ावत नाही.

-----------------

**उज्ज्वल कंस्ट्रक्शन कंपनी, चंद्रपूर यांना महानगरपालिकेने आकारलेल्या दंडाबाबत**

u
**(२१) * ३२४८६ uश्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर)र:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) चंद्रपूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या उज्ज्वल कंस्ट्रक्शन कंपनीला पाण्याचे वापर शुल्कापोटी १५ लाख रुपये जमा करण्याबाबत दिनांक १९ सप्टेंबर, २०१५ वा त्यादरम्यान मनपा प्रशासन, चंद्रपूरने नोटीस बजाविल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीने अद्यापही १५ लाख रुपये मनपा प्रशासन, चंद्रपूर यांचेकडे जमा केले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,यचौकशीत काय आढळुन आले व त्यानुषंगाने उक्त कंपनीवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u
**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) होय.
(३) कंपनीचे विहीत मुदतीत रक्कम जमा केली नसल्यामुळे, महापालिकेने कंपनीच्या सुरक्षा ठेवमधून रु.१५,१२,०००/- व त्यावरील व्याज रु.८०,३२५/- असे एकूण रु. १५,९२, ३२५/- इतकी रक्कम वसूल केली आहे. तसेच सदरची सुरक्षा ठेव पूर्ववत करण्याबाबत कंपनीला कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भ् ावत नाही.

-----------------

**राज्यात पर्ल, ब्ल्यू चीप इंन्वेस्टमेंट, पॅन कार्ड क्लब**
**या कंपन्यानी नागरिकांची केलेली फसवणूक**

**(२२) * ३६६१६ uश्री.राहूल कुल (दौंड)ड:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) राज्यात पर्ल, ब्ल्यू चीप इंन्वेस्टमेंट, पॅन कार्ड क्लब अशा अनेक कंपन्या विविध प्रकारे नागरिकांची फसवणूक करून ठेवी गोळा करत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून पुणे शहरातील पोलीस स्थानकात याबाबत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,यअसल्यास चौकशी काय निदर्शनास आले, त्यानुसार गुन्हेगारांवर कोणती कारवाईईकरण्यात आली वा येत आहे,

(३) तसेच नागरिकांच्या ठेवी परत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

पुणे शहर पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रातील डेक्कन पोलीस स्टेशन येथे पर्ल कंपनी विरुद्ध् ा गुन्हा दाखल आहे.

ब्ल्यू चीप इंन्वेस्टमेंट, पॅन कार्ड क्लब यांच्याविरुद्ध पुणे शहर पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रात गुन्हे दाखल नाहीत.

(२) सदर प्रकरणी ठेवीदाराने केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने डेक्कन पोलीस स्टेशन पुणे शहर येथे गु. र.क्र.३४२/२०१५ भा.द.वि.क्र.४२०,४०६,४०९,१२०(ब) ३४, महाराष्ट्र ठेवीदारांचे हित संरक्षण अधिनियम सन १९९९ च्या कलम तीन अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

(३) अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भ् ावत नाही.

-----------------

**उल्हासनगर (जि.ठाणे) कॅम्प नंबर १ येथील बे-वॉच अर्किस्ट्रा**
**बार मध्ये पोलिसांवर हल्ला केल्याबाबत**

**(२३) * ३४२५१ uश्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर)र:** सन्माननीय **मुख्यमंत्री**

पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील कॅम्प नंबर १ मध्ये असलेल्या बे-वॉच अर्किस्ट्रा बार येथे बारमधील काही व्यक्तींनी रात्री १.३० वाजता पोलिसांवर हल्ला केल्याचे दिनांक ६ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांवर तसेच उशिरापर्यंत बार चालू ठेवणाऱ्या बार मालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी मध्यवर्ती पोलीस स्टेशन, उल्हासनगर-३ येथे गु.र.क्र. ३७०/१५, भा.दं.वि.स. कलम ३९७, ३९५, ३३२, १४१, ३५३, ३५४, ४२७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ५ आरोपींना अटक करण्यात आली असून आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले आहे.

सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

-----------------

## भिवंडी -निजामपूर शहर महानगरपालिकेस जकात कर वसूल करण्यास सवलत मिळण्याबाबत

**(२४) * ३६६४२ uश्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व)व:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी -निजामपूर शहर महानगरपालिकेला कर्मचा-यांचे वेतन, निवृत्तीवेतन, पाणी देयके, वीज देयके एमएमआरडीएकडील कर्जाचे हप्ते तसेच शहरातील महत्त्वकांक्षी प्रकल्प व विकासकामे यासाठी निधीची कमतरता असल्याने महानगरपालिकेला जकात कर वसूल करण्यासाठी सवलत मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेला सन २०१२-१३ मध्ये जकात कर म्हणून १७२.४४ कोटी रुपये प्राप्त झाले असून सन २०१३-१४ मध्ये जकात करांचे १९८.३० कोटी उत्पन्न अपेक्षित असताना स्थानिक संस्था कर लागू केल्याने ६० कोटी रुपयांच्या उत्पन्नाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, खरे आहे.
(२), (३) व (४) होय, खरे आहे.

भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेमध्ये शासनाने दिनांक २२ मे २०१३ पासून जकाती ऐवजी स्थानिक संस्था कर लागू केला आहे.

सन २०१२-१३ व सन २०१३-१४ ह्या आर्थिक वर्षामध्ये व्यापा-यांची नोंदणी करणे, कर्मचारी अधिकारी यांना प्रशिक्षण देणे व जकाती बरोबरच पारगमण शुल्क वसुली रद्द करण्यात आल्याने काहीअंशी ह्या कालावधीत स्थानिक संस्था कराची वसूली कमी झाली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

दिनांक १ ऑगष्ट, २०१५ पासून शासनाने रु.५० कोटी पेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापा-यांना स्थानिक संस्था करातून सुट देण्याचा निर्णय घेतला आहे.

यामुळे महानगरपालिकांच्या उत्पन्नामध्ये येणारी तूट भरुन काढयासाठी शासनाकडून सहायक अनुदान देण्यात येत आहे.

सहायक अनुदानाची परिगणना करताना महानगरपालिकेचे मागील ५ वर्षातील जकातीचे अथवा स्थानिक संस्था करापासूनचे सर्वोच्च उत्पन्न आधारभूत मानुन त्यावरती ८ % वाढ विचारात घेऊन सन २०१५-१६ साठी प्रत्येक महानगरपालिकेस देय्य होणारे अनुदान निश्चित केले आहे. त्यामुळे महानगरपालिकांना जकातीच्या व स्थानिक संस्था कराच्या तुलनेत आता जास्त उत्पन्न प्राप्त होत आहे.

भिवंडी निजामपूर महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ च्या सहाय्यक अनुदानाची परिगणना करताना महानगरपालिकेचे मागील ५ वर्षातील सर्वोच्च उत्पन्न रु. १७२.४४ कोटी आधारभूत मानून त्यावरती ८% वाढ विचारात घेवून महानगरपालिकेस रू.१८६.२४ कोटी ऐवढे अनुदान देय ठरते.

महानगरपालिकांच्या उत्पन्नावर कोणताही अनिष्ट परिणाम होणार नाही तसेच त्यांचे आर्थिक स्वातंत्र्य अबाधित राहील याची शासनाने पुरेपुर दक्षता घेतली आहे.

-----------------

## गोंडपिपंरी (जि. चंद्रपुर) तालुक्यामध्ये पोलीस पाटलांचे पदे भरतीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२५) * ३६६६६८ uॲड.संजय धोटे (राजूरा) I:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) गोंडपिपंरी (जि. चंद्रपूर) तालुक्यात माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये पोलीस पाटलांची पदे भरण्यात आली असून त्यात अपात्र ठरविण्यात आलेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्यात आल्याचे तसेच भरतीत संबंधीत अधिकाऱ्यांकडून मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदगाव, फुर्डी हेटी, चेकपारगाव, कुडे सावली, जुना व नवीन पोडसा, भनारहेटी येथे अपात्र व शासन निकषात न बसणाऱ्या उमेदवारांना पात्र घोषीत करुन

पोलीस पाटील पदी नियुक्ती देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन निकषाच्या अधिन न राहता बोगस भरती प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?
u
**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) चंद्रपूर जिल्ह्यातील गोडपिंपरी तालुक्यातील पोलीस पाटलांची पदे सप्टेंबर, २०१५ मध्ये भरण्यात आली आहेत.

सदर पदभरती प्रक्रियेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत लोकप्रतिनिधींचे शासनास निवेदन प्राप्त झालेले आहे. तसेच, या पद भरतीप्रक्रियेमध्ये अनियमितता झाल्याबाबत स्थानिक जनतेच्या तक्रारी जिल्हाधिकारी कार्यालय व उपविभागीय कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत.
(२), (३) व (४) जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी यांना गोडपिंपरी तालुक्यातील पोलीस पाटील पद भरती प्रक्रियेबाबत चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. सध्या सदर चौकशी सुरु असून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**पन्हाळा नगरपरिषद (जि.कोल्हापूर) येथील**
**पाणी पुरवठा योजना रद्द केलेबाबत**

**(२६) * २९०३९ uश्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) ी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u(१) पन्हाळा (जि.कोल्हापूर) नगरपरिषदेस महा सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत पाणी पुरवठा योजनेसाठी निधी मंजूर करण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाणी पुरवठा योजनेचा निधी रद्द करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरची योजना रद्द केल्यामुळे ग्रामस्थांना तीव्र पाणी टंचाईच्या समस्येस तोंड द्यावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरची योजना पूर्ण करण्यासाठी ीकोणती कार्यवाही करण्यात आली ीवा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर योजनेस प्रशासकिय मान्यता दिली होती, हे खरे आहे.
(२) सदर योजनेस निधी वितरीत केला नव्हता. त्यामुळे तो रद्द करण्याचा प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.
(३), (४) व (५) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत पन्हाळा पाणी पुरवठा योजनेस दिलेली प्रशासकिय मान्यता कायम करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

-----------------

**ठाणे येथील नौपाडा, वागळे इस्टेट आणि कळवा येथील जुन्या इमारतीच्या पुर्नविकासाबाबत**

**(२७) * ३०३८५ uॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.रणजित कांबळे (देवळी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे):** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) ठाणे येथील नौपाडा, वागळे इस्टेट आणि कळवा या परिसरात अनेक जुन्या इमारती असून एमआरटीपीचे निकष पाळल्यास त्यांचा पुर्नविकास होणे अशक्य असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त परिसरात अनेक जुन्या इमारती असून त्यांचा पुर्नविकास एमआरटीपीच्या निकषांमुळे प्रलंबित असल्याने व याबाबत संब?धित मनपा काही ठोस निर्णय घेत नसल्याने या इमारतींमध्ये वास्तव्य करणा-या नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रात क्लस्टर योजना लागू करण्यासाठीचा प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी प्राप्त झाला आहे.
(२) व (३) जुन्या इमारतींचा पुर्नविकास अस्तित्वातील विकास नियंत्रण नियमावलीनुसार होऊ शकत नसल्याने या संदर्भात क्लस्टर योजना मा.उच्च न्यायालयाचे सहमती नंतर लागू करण्याबाबत शासनास प्रयत्नशील आहे.
(४) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

-----------------

**वांद्रे (मुंबई) गांधीनगरमधील प्रस्तावित इमारतींच्या बांधकामासाठी**

## वृक्षतोड करण्यास आयुक्तांनी परवानगी दिल्याबाबत

u

**(२८) * ३२७३५ uश्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व)व:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) वांद्रे (मुंबई) गांधीनगरमधील एमआयजी ग्रुप को.ऑ.हौ.सोसायटी ग्रुप-१ मधील प्रस्तावित इमारतींच्या बांधकामासाठी ११३ झाडे तोडण्यास मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांनी परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वृक्षतोडीला आयुक्तांनी दिलेली परवानगी ही नियमबाह्य असल्यामुळे मुंबई महानगरपालिकेच्या सर्व नगरसेवकांनी त्याला विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांनी वृक्षतोडीसाठी दिलेल्या परवानगीचा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आला होता काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) वांद्रे गांधीनगरमधील एम.आय.जी. ग्रुप को.ऑ.हौ.सोसायटी ग्रुप -१ मधील प्रस्तावित इमारतीच्या बांधकामासाठी ११३ वृक्ष कापण्याकरिता महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण व जतन अधिनियम १९७५ मधील तरतुदीनुसार वृक्ष प्राधिकरण समितीने मंजुरी दिली आहे,
(२) हे खरे नाही,
(३) व (४) महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण व जतन अधिनियम १९७५ कलम ३ (१) नुसार नियोजित इमारतीच्या बांधकामांना अडथळा करणाऱ्या वृक्षांना काढण्याची परवानगी देण्याकरिता मुंबई वृक्ष प्राधिकरण हे सक्षम प्राधिकरण आहे, त्यामुळे सदर प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला नाही,
(५) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

-----------------

u

## कोल्हापूर जिल्ह्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने भ्रष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांवर केलेली कारवाई

u

**(२९) * ३४१९६ uडॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले)`:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) कोल्हापूर जिल्ह्यात महसूल, पोलिस, सहकार, महानगरपालिका, वीज मंडळ, नगरपालिका, प्रादेशिक परिवहन अधिकारी या विविध विभागातील सुमारे ३० जणांना गेल्या ९ महिन्यांत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापैकी फक्त ७ जणांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली, हे ही

खरे आहे काय,
(३) असल्यास, उर्वरित भ्रष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अद्यापर्यंत कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,
(४) कारवाई केली असल्यास, त्यांचे स्वरुप काय आहेत ?
u
**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दि.०१.०१.२०१५ ते २०.११.२०१५ या कालावधीत कोल्हापूर जिल्हयात ३१ सापळा प्रकरणी चाळीस आरोपींविरुध्द कारवाई करण्यात आली असून त्यामध्ये ३४ लोकसेवक, १ इतर लोकसेवक व ५ खाजगी इसमांचा समावेश आहे.
(२) उक्त सापळा प्रकरणाच्या अनुषंगाने ३३ लोकसेवक व १ इतर लोकसेवक यांच्याविरुध्द निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.
(३) व (४) उर्वरित ५ व्यक्ती या खाजगी इसम असल्याने त्यांचेविरुध्द निलंबनाची कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच सर्व ३१ सापळा प्रकरणाच्या अनुषंगाने संबंधीत आरोपी लोकसेवक व खाजगी इसम यांच्याविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ अंतर्गत संबंधीत पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.त

-----------------

**राज्यातील ४३ शहरात अटल अर्बन ट्रान्सफॉर्मेशन (अमृत) या महत्वाकांक्षी अभियानांची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(३०) * २९६१६ uश्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अर्जुन खोतकर (जालना) I:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) राज्यातील ४३ शहरात अटल मिशन फॉर रिज्युकेशन न्ड अर्बन ट्रान्सफोर्मेशन (अमृत) या महत्वाकांक्षी अभियानाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये झालेल्या राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अभियानामुळे शहरातील प्रत्येक घरासाठी प्रचलित निकषानुसार पाणीपुरवठा, सार्वजनिक स्वच्छतेसाठी मलनिस्सारण, मलव्यवस्थापन व पर्जन्य वाहिनीची व्यवस्था करण्यासह शहरातील मोजक्या जागा हरितक्षेत्रे, परिवहन व्यवस्था यामध्ये सुधारणा करुन प्रदुषण कमी करणे आणि इतर सुविधांची निर्मिती या उद्दिष्टांसाठी हे अभियान राबविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अभियानात कोणत्या शहरांची निवड केली आहे,
(४) असल्यास, उक्त अभियान पाच वर्षाच्या कालावधीसाठी राबविण्यात येणार असून यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून प्रत्येक वर्षी किती निधी उपलब्ध करुन देण्यात

येणार आहे,

(५) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय

(२) होय.

(३) केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे राज्यातील १ लक्ष पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ४३ शहरांचा समावेश अमृत अभियानामध्ये करण्यात आला आहे.

(४) व (५) अमृत अभियान पाच वर्षाच्या कालावधीमध्ये अभियान स्वरूपात राबविण्यात येणार असून प्रत्येक वर्षासाठी केंद्र शासनाने निश्चित केलेल्या नियतव्ययानुसार केंद्र शासनास प्रतिवर्षी राज्य वार्षिक कृती आराखडा सादर करणे अपेक्षित आहे.

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी रूपये २०३७.८३ कोटी किंमतीचा राज्य वार्षिक कृति आराखडा सादर करण्याच्या सूचना केंद्र शासनाकडून प्राप्त झाल्या असून त्यापैकी केंद्र शासन हिस्सा रूपये १०३४.४४ कोटी असून उर्वरीत हिस्सा रूपये १००३.३९ कोटी हा राज्य शासन व संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत उभा करण्यात येणार आहे.

-----------------

u

## तुळजापूर (जि.उस्मानाबाद) येथील तुळजाभवानी देवीच्या मंदिरात चोरी झाल्याबाबत

u

**(३१) * ३३७५६ uश्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) I:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) तुळजापूर (जि.उस्मानाबाद) येथील तुळजाभवानी देवीच्या मंदिरातून शिवकालीन पेशवेकालीन अनेक दागदागिने, भांडी, मौल्यवान साहित्य यांची माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये चोरी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व चोरी गेलेले साहित्य दागदागिने परत मिळविण्यासाठी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा प्रकारची एकही तक्रार पोलीस स्टेशन तुळजापूर येथे प्राप्त नाही.

(२) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

(३) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

(४) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

-----------------

u

## नवी मुंबई क्षेत्रातील गावठाणात प्रकल्पग्रस्तांनी केलेले बांधकामाबाबत

**(३२) * ३०३६४ uश्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल)ल:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) नवी मुंबई विभागात गावठाण व गावठाणाबाहेर प्रकल्पग्रस्तांनी केलेल्या बांधकामाबाबत शासनाने क्लस्टर डेव्हलपमेंट योजना जाहीर केली असली तरी त्यासंबंधीची अधिसूचना अद्यापी जाहीर करण्यात आली नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्लस्टर योजनेमध्ये ग्रामस्थांच्या हिताच्या अनेक बाबींचा समावेश नसल्याने या योजनेस ग्रामस्थांचा तीव्र विरोध आहे त्यासाठी ग्रामस्थांशी चर्चा करुन त्यांच्या हिताची योजना जाहीर करावी म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री महोदयांना माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नवी मुंबई अधिसूचित क्षेत्रामधील गावठाण व विस्तारित गावठाण क्षेत्राचा नागरी नुतनीकरण योजनेंतर्गत (Cluster Development) पुर्नविकास करणेबाबतची तरतुद सिडकोच्या व नवी मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये अंतर्भूत करणेसाठी महाराष्ट प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१ अ`.अ`.) खाली दोन स्वतंत्र सूचना दिनांक ४.३.२०१४ रोजी नागरिकांच्या सूचना/हरकतीसाठी प्रसिध्द करणेत आलेल्या होत्या यासंदर्भात वैधानिक कार्यवाही पुर्ण झालेली असून अंतिम अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली नाही.

(२) व (३) सदर निवेदन प्राप्त झालेले असून विचाराधीन आहे.

(४) मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. ६१/२०१४ मध्ये नागरी नुतनीकरण योजनेंतर्गत वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणेपूर्वी पायाभूत सुविधांच्या अनुषंगाने आघात मूल्यमापन अहवाल (Impact Assessment Report) तयार करुन त्याची पडताळणी करणे बंधकारक केलेले आहे. त्याशिवाय अंतिम अधिसूचना निर्गमित करणेस मा उच्च न्यायालयाने प्रतिबंधात्मक आदेश दिलेले आहेत. त्याबाबत पुर्ततेसंदर्भात कार्यवाही सुरु आहे.

-----------------

u

## नांदेड महानगरपालिकेच्या इमारत साफसफाईची कामे

**जुन्याच ठेकेदारांना देण्यात आल्याबाबत**

u

**(३३) * ३४६८९ uश्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा) I:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) नांदेड महानगरपालिकेच्या इमारत साफसफाईची केअर टेकर ग्रुपची निविदा मंजूर केली असतांनाच ती मंजूरी पाच महिने प्रलंबित ठेवून जुन्याच ठेकेदारांना सदर काम देण्यात आल्याने महानगरपालिकेचे दोन कोटी रूपयांचे नुकसान झाल्याचे दिनांक १ ऑक्टोबर, २०१५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याने त्याची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) या प्रकरणी कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झालेला नसल्याने चौकशीचा प्रश्न उद्‌भ् ावत नाही.

(३) प्रश्न उद्‌भ् ावत नाही.

-----------------

u

**शेंद्रा (जि.औरंगाबाद) औदयोगिक वासहतीतील रॅडिको एनव्ही डिस्टिलरी कंपनीच्या यंत्रात हात अडकल्याने कामगाराचा मृत्यू झाल्याबाबत**

u

**(३४) * ३३१६१ uश्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम)म:** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) शेंद्रा (जि.औरंगाबाद) औदयोगिक वसाहतीतील रॅडिको एनव्ही डिस्टिलरी या कंपनीत भुसा वाहून नेणाऱ्या बाळू रामकिसन जयकर या कामगाराचे हात यंत्रात अडकल्याने त्याचा मृत्यु झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

uत्यानुसार दोषीवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच सदर कंपनीत काम करणाऱ्या मृत कामगाराच्या कुटुंबास आर्थिक मदत करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

u

**श्री. प्रकाश मेहता :** (१) रॅडिको एनव्ही डिस्टिलरीज महाराष्ट्र लि. (डी-१९२ ते १९५,

एम.आय.डी.सी. शेंद्रा, औरंगाबाद) या कारखान्यात दिनांक ०७.०९.२०१५ रोजी रात्री ११.४५ च्या सुमारास श्री.बाळू रामकिसन जयकर या कामगाराचा बगास वाहून नेणाऱ्या कन्व्हेअर बेल्टमध्ये हात अडकल्याने गंभीररित्या जखमी होऊन मृत्यू झाला, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून चौकशीत असे आढळून आले की, एक कामगार कारखान्यातील बगास यार्डमधील टनेलच्या आत असलेल्या बेल्ट कन्व्हेअरवरील लूज बगास साफ करीत असताना फिरणाऱ्या कन्व्हेअर बेल्ट व रोलरमधील निप पॉईंटमध्ये ओढला गेला.त्याच्या डाव्या हाताला, डोक्याला व पोटाला गंभीर जखमा झाल्यामुळे त्याचा जागीच मृत्यु झाला.

सदर जागेस धोकादायक भागावर सुरक्षा जाळी न लावल्यामुळे कारखाने अधिनियम, १९४८ चे कलम २१ (१) (४) (क) च्या भंगाबाबत भोगवटादार व व्यवस्थापक यांच्याविरुध्द न्यायालयात फौजदारी खटला क्र.७८७४/२०१५, दिनांक २१.११.२०१५ रोजी दाखल करण्यात आला आहे.

(३) व (४) मृत कामगाराच्या वारसदारास नुकसान भरपाई मिळण्यासाठी मा.आयुक्त, श्रमिक नुकसान भरपाई यांच्याकडे जमा करण्यासाठी कारखान्याच्या भोगवटादारास सूचना दिल्या आहेत. मृत कामगाराच्या वारसदारास कारखान्याच्या व्यवस्थापनाने रक्कम रुपये ५,००,०००/- सानुग्रह अनुदान म्हणून दिली आहे. तसेच मृत कामगाराच्या वारसास नोकरी देण्याचे व्यवस्थापनाने मान्य केले आहे.

-----------------

u

## हिंगोली नगरपरिषदेची हद्दवाढ करणे बाबत

u

**(३५) * ३३११५ uश्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) ी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) हिंगोली शहराच्या भोवताली ग्रामपंचायती अंतर्गत अनेक वसाहती निर्माण झाल्या असून बळसोड, कारवाडी, अंधारवाडी, मालवाडी इ. ग्रामपंचायती अंतर्गत वसलेली नगरे शहराचाच एक भाग झाली आहेत परंतु, सदर वसाहती नगरपरिषद कार्यक्षेत्रात येत नसल्यामुळे त्यांना पाणी पुरवठा, स्वच्छता साफसफाई इ. नागरी सोयी सुविधांपासून वंचित रहावे लागत आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांची सदर वसाहती नगरपरिषद हद्दीत समाविष्ट करण्याकरिता हिंगोली नगर परिषदेची हद्दवाढ करण्यात यावी अशा आशयाचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांना माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासन निश्चित किती कालावधीत निर्णय घेईल?

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२), (३) व (४) हिंगोली नगरपरिषदेची हद्दवाढ करणे बाबत वि.स.स. श्री. तान्हाजी मुटकुळे यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना लिहिलेल्या पत्रास अनुलक्षून जिल्हाधिकारी, हिंगोली, तसेच नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे कडून परिपूर्ण प्रस्ताव मागविण्यात आला आहे. सदर प्रस्ताव प्राप्त होताच नियमानुसार यथोचित कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

u

**उदगीर जिल्हा लातूर येथील नगरपालिकेत पाणी टंचाईबाबत**

u

**(३६) * ३०८८९ uश्री.सुधाकर भालेराव (उदगीर)रः** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) उदगीर (जि. लातूर) नगरपालिकेअंतर्गत असलेल्या भोकणी,बनशेळकी धरण व देवर्जन प्रकल्पातील पाणी साठे संपले असल्यामुळे या ठिकाणी भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे, त्यासाठी लोकप्रतिनिधींनी मन्याड प्रकल्पातील लिंबोटी धरणातून पाणी उपलब्ध करण्यात यावे अशी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर लिंबोटी धरणातील पाणी पुरवठा योजनेसाठी १.६२ लक्ष रुपयाचा ढोबळ आराखडा तयार करण्यास मा. मुख्यमंत्री यांनी माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये मंजूरी दिली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उदगीर नगर पालिकेच्या पाणी टंचाई निवारणासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.
(२) नाही.
(३) उदगीर शहरास पाणी पुरवठा करण्यासाठी नगर परिषद, उदगीर मार्फत खालील दोन योजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

(१) अमृत ये ाजने अंतर्गत लिंबोटी धरणावरुन कायम स्वरुपी पाणी पुरवठा करणे,

(२) टंचाई २०१५-२०१६ अंतर्गत लघुपाटबंधारे विभागाच्या तिरु मध्यम प्रकल्पातून तातडीची पाणी पुरवठा योजना.

(४) प्रश्न उद्‌भ ावत नाही.

-----------------

u

**राज्यातील शहरी व ग्रामीण भागातील गरीब वर्गातील तसेच**
**मागास वर्गातील गरीबांना घरकुले उपलब्ध होणेबाबत**

u

**(३७) * ३२५१९ uश्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.किसन कथोरे (मुरबाड),**

**श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल)ल:** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) गोर-गरीब जनतेला हक्काचे घर मिळवून देण्याच्या दृष्टीने शिवशाही पुनर्वसन प्रकल्प राज्यभर राबविण्यात येणार असल्याची माहिती माहे सप्टेंबर, २०१५ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आली हे खरे काय,

(२) असल्यास, गृहनिर्माण विभागाने त्यासाठीची योजना तयार केली असून सदर योजनेस शासन लवकर अंतिम स्वरुप देणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यातील अन्य शहरी भागातील झोपडपट्यांचा विकास करुन जास्तीत जास्त गरीबांना हक्काचे घर देण्याचे शासनाचे धोरण आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात सद्या सुरु असणाऱ्या इंदिरा आवास, रमाई, शबरी, वाल्मिकी घरकुल आदि विविध योजना एकत्र करुन ३०० फुटांपेक्षा मोठे घर गरिबांना मिळवून देण्याच्या दृष्टीने विचार विनिमय चालू असल्याचे मा. मंत्री गृहनिर्माण यांनी स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. प्रकाश मेहता :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

(४) व (५) ग्रामीण भागात सद्य:स्थितीत ग्रामविकास विभाग (इंदिरा आवास योजना) (केंद्रशासित), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (रमाई योजना) व आदिवासी विकास विभाग (शबरी घरकुल योजना) विशिष्ट गटाकरीता घरकुल निर्मितीच्या योजना राबविते. या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये सुसुत्रता आणण्यासाठी संबंधित विभागांशी विचारविनियम करण्याकरीता एक बैठक झाली असून त्यात ग्रामविकास विभागास समन्वय विभाग ठेवून सर्व ग्रामीण गृहनिर्माणाच्या योजना एका स्वतंत्र यंत्रणेव्दारे राबविण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, तथापि इंदिरा आवास योजनेचे निकष केंद्र शासनाकडून निश्चित केले जातात व राज्य शासनाकडून त्याचे पालन केले जाते. या योजनांतर्गत ३०० फूटापेक्षा मोठी घरे वाटप करण्याचा कोणताही प्रस्ताव नाही.

(६) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

-----------------

u

**कुंडलवाडी (जि.नांदेड) येथे दारिद्रयरेषेखालील लोकांसाठी एकात्मिक गृहनिर्माण विकास योजना राबविण्याबाबत**

u

**(३८)** * **३२२४१ uश्री.सुभाष साबणे (देगलूर)र:** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) कुंडलवाडी शहरात (जि.नांदेड) दारिद्रयरेषेखालील लोकांना एकात्मिक गृहनिर्माण विकास योजनेअंतर्गत १८०३ नागरिकांकडून सर्वेसाठी प्रति व्यक्ती ३०० रुपये प्रमाणे लाखो रुपयांची वसूली सन २००७ मध्ये नगरपालिकेने करुनही अद्याप सदरचे योजनेपासून नागरिक वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची योजना पूर्ण होण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, तसेच ही योजना केव्हा पर्यंत पूर्ण करण्याचे शासनास अपेक्षित आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. प्रकाश मेहता :** (१) अंशत: खरे आहे.

एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमातंर्गत सर्व्हेक्षण करुन प्रस्ताव सादर करण्यासाठी कुंडलवाडी नगरपरिषदेने मे.नवनिर्माण महिला बहुउद्देशिय संस्था, अकोला या संस्थेची नियुक्ती केली होती. प्रस्तुत संस्थेने योजनेतील झोपडपट्टीतील नागरिकांकडून प्रति-व्यक्ती रु. ३००/- इतकी रक्कम वसूल केली असल्याने निदर्शनास आल्याचे मुख्य अधिकारी नगरपरिषद कुंडलवाडी यांनी कळविले आहे. सदरहू रक्कम नगरपरिषदेने वसूल केलेली नाही.

(२) कुंडलवाडी नगरपरिषदेने सादर केलेला प्रस्ताव सुकाणु अभिकरणाने (म्हाडा) दि. २३.१.२००९ रोजी तपासणीकरिता व केंद्र शासनाच्या मंजूरीकरीता सादर करण्यासाठी हुडको कार्यालयास सादर केला होता. तथापि केंद्र शासनाकडून राज्य शासनास मिळणारे अनुदान (Fund allocation) कमी असल्याने प्रकल्पास केंद्र शासनाची मंजूरी मिळू शकली नाही.

(३) प्रश्न उद्भ् ावत नाही.

-----------------

u

**राज्य शासन टीडीआर, एफएसआय, भाडेपट्टयाने दिलेल्या जमिनी आणि विकासक्षम जमिनींचा वापर यातून चालू आर्थिक वर्षातील महसूली उत्पन्नाबाबत**

u

**(३९)** * **३५२१७ uश्री.उल्हास पाटील (शिरोळ)ळ:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(१) राज्य शासन टीडीआर, एफएसआय, भाडेपट्टयाने दिलेल्या जमिनी आणि विकासक्षम जमिनींचा वापर यातून चालू आर्थिक वर्षात शासनाच्या तिजोरीत तब्बल १२ हजार कोटी रुपयांची भर पडणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असे असतांना महसूल, नगरविकास,सगृहनिर्माण अशा वेगवेगळया खात्यांनी याकरिता नियमात करायच्या बदलामध्ये सात महिने वाया गेले आहेत, हे ही खरे आहे

काय,
(३) असल्यास, प्रशासनाच्या ढोबळ कारभारामुळे शासनाचे महसूल उत्पन्न कमी येणार आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u
**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षात विविध विकास विषयक परवानगी देताना आकारावयाच्या अधिमुल्याद्वारे रुपये ५००० कोटी जमा करण्याचे उद्दिष्टे नगर विकास विभागास देण्यात आलेले आहे, यास अनुसरुन शासनाने या आर्थिक वर्षामध्ये ना-विकास क्षेत्रामध्ये विविध विकास विषयक परवानगी देतांना / जागेचा वापर बदल करतांना / विविध वापराकरीता अतिरिक्त चटई क्षेत्र निदेशांक मंजूर करतांना / स्थानिक स्तरावर परवानगी देण्याचा व अधिमूल्य आकारण्याचा निर्णय घेतलेला आहे, याशिवाय बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठी जमीन मालकाने खाजगी जागेवर सार्वजनिक वाहनतळ प्रकल्पाचे बांधकाम करुन हस्तांतरण केल्यास त्यास अधिमुल्याचा भरणा करुन प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करणे, अशा प्रकारच्या महसूल जमा होणाच्या दृष्टीने चालू वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्यातील जमिनीच्या मुल्यावर आधारित अधिमूल्य (Premium) आकारणी करणे, अधिमुल्याच्या विद्यमान दरात वाढ करुन परवानगी देण्यासंबंधी सुचना/अधिसूचना निर्गमित केल्या असून त्यानुसार स्थानिक पातळीवर अधिमूल्य आकारुन परवानगी देण्याची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे,
(२) ही बाब खरी नाही, अ.क्र.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे,
(३) व (४) शासनातर्फे मुद्दा क्र. १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सन २०१५-२०१६ या वर्षापासून विविध प्रकरणी अधिमूल्य आकारण्यासंबंधात शासन निर्णय निर्गमित केले असून त्यानुसार स्थानिक पातळीवर अधिमूल्य आकारुन परवानगी देण्याची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे,
(५) लागू नाही.

-----------------

## भिवंडी शहरातील विविध भागात होणा-या दुषित पाण्यामुळे गॅस्ट्रोची साथ पसरल्याबाबत

u
**(४०) * ३४३१४ uश्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) t:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) भिवंडी शहरातील विविध भागात होणा-या दुषित पाण्यामुळे फटका रहिवाश्यांना बसला असून त्यामुळे गॅस्ट्रोची साथ मोठया प्रमाणात पसरली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याच कालावधीत गॅस्ट्रोची लागण झालेल्या ४० जणांना उपचारासाठी विविध रुग्णालयात दाखल करण्यात आले व त्यापैकी ५ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गॅस्ट्रोच्या साथीला तातडीने आळा घालण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची माहे नोव्हेंबर, २०१५ अखरेची सद्य:स्थिती काय आहे ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अंशत खरे आहे,

तथापि, ऑक्टोंबर, २०१५ वा त्या सुमारास दुषित पाणी पुरवठा शहरातील प्रभाग क्र. १५ मधील बंगालपुरा परिसरातील एका भागामध्ये दिनांक १२ ऑक्टोंबर, २०१५ रोजी झालेल्या होता,

बंगालपुरा परिसरातील काही भागामध्ये दुषित पाण्यामुळे गॅस्ट्रोच्या आजारामुळे बाधित झालेले एकूण ३५ रुग्ण आढळून आले होते, तथापि, गॅस्ट्रोमुळे एकाही व्यक्तीचा मृत्यू झालेला नाही,

गॅस्ट्रोबाधीत संबंधीत रुग्णाना भिंवडीतील खाजगी, शासकिय व महानगरपालिकेकडून बाह्य रुग्ण सेवा देऊन रुग्णाना आवश्यक तो औषधोपचार देण्यात आलेला आहे,
(३) गॅस्ट्रो साथीला तातडीने आळा घालण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत:-

- दिनांक १३ ऑक्टोबर, २०१५ रोजी तातडीने नविन जलवाहिनी बदलुन सदर ठिकाणी नव्याने जलवाहिनी टाकण्यात येऊन शुध्दपाणी पुरवठा करण्यात आलेला आहे,
- सदर भागामध्ये तातडीने वैद्यकीय सर्वेक्षण करुन वैद्यकीय शिबिरे आयोजित करण्यात आली,
- तसेच या भागातील नागरीकांना धार्मिक स्थळातून, शैक्षणिक संस्थातुन पाणी उकळून व गाळून पिण्याबाबत आवाहन करण्यात आलेले आहे,
- तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजनासाठी हस्तपत्रिका वाटप करण्यात आली,
- सद्यस्थिती गॅस्ट्रोचा एकही रुग्ण निदर्शनास आलेला नाही.

-----------------

u

**पुणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील परिमंडळ तीनमधील पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्ह्यांचे प्रमाण वाढत असल्याबाबत**

u

**(४१)** * **३२८८० uश्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ)ळ:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) पुणे जिल्हा,पुणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील पोलीस उपायुक्त परिमंडळ तीनच्या हद्दीत सोनसाखळी हिसकावणे,लिफ्टचा बहाणा करुन लुबाडणे,घरफोडी, वाहन चोरी, लाखो रुपयांचे दागिने, रोख रक्कम तसेच कंपनीच्या आवारातील लोखंडी साहित्य चोरीस जाणे आदी प्रकारच्या गंभीर स्वरुपाच्या चोऱ्यांचे गुन्हे वाढत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस उपायुक्त परिमंडळ तीनच्या हद्दीतील नऊ पोलीस ठाण्याच्या हददीत १ जानेवारी ते ३१ जुलै, २०१५ या सात महिन्यांच्या कालावधीत तब्बल १३२१ चोरीचे गुन्हे दाखल झालेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चोऱ्यांचे प्रमाण कमी करण्यासाठी गृहमंत्रालयाच्यावतीने शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

सन २०१४ च्या तुलनेत चालू वर्षात सोनसाखळीच्या गुन्ह्यात ८२ ने, लिफ्टचा बहाणा करुन लुबाडण्याच्या घटनेत १ ने, घरफोडीच्या गुन्ह्यात ९६ ने, कंपनीच्या आवारातील चोरीच्या गुन्ह्यात १३ ने घट झाली आहे. u

परंतु सन २०१४ च्या तुलनेत चालू वर्षात वाहनचोरीच्या गुन्ह्यात ४२ ने वाढ झाली आहे.

हिंजवडी येथील आय.टी. पार्क तसेच पिंपरी चिंचवड शहरातील वाढते औद्योगिककरण यामुळे सदर परिसरात नागरी वस्तीमध्ये वाढ झालेली असून पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण अंतर्गत देहुरोड पोस्टेचा चिखली, रुपीनगर हा भाग पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील निगडी पोलीस स्टेशनला संलग्न करण्यात आलेला आहे. यामुळे वाहनचोरीच्या गुन्ह्यात वाढ झालेली आहे. u

(२) नाही.

पोलीस उपायुक्त परिमडळ तीनच्या हद्दीतील नऊ पोलीस ठाण्याच्या हद्दीत १ जानेवारी ते ३१ जुलै, २०१५ या सात महिन्यांच्या कालावधीत तब्बल १०८५ चोरीचे गुन्हे दाखल झालेले आहेत.

(३) चोऱ्यांचे प्रमाण कमी व्हावे यासाठी परिमंडळ ३ अंतर्गत सर्व पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांना हद्दीमध्ये पेट्रोलिंग करणे, अचानक नाकाबंदी लावून चेकींग करणे, कोम्बिंग ऑपरेशन दरम्यान रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक करणे याप्रकारची कार्यवाही करण्यात येत आहे.

चालू वर्षात एकूण ३६ गुन्हेगारांविरुध्द हद्दपार कारवाई करण्यात आली असून एकूण ४५ गुन्हेगाराचे विरुध्द महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. तसेच एका इसमाचे विरुध्द एम.पी.डी.ए. अन्वये

स्थानबध्दतेची कारवाई करण्यात आली आहे.

तसेच चैन चोरी, जबरी चोरी, घरफोडी, वाहनचोरी, दरोडा व इतर चोरी अशा गुन्ह्यांमध्ये एकूण ६८६ आरोपींना चोरीच्या गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भ् ावत नाही.

-----------------

u

**मुंबई देवनारजवळील बोरला गावातील चिल्ड्रन्स एड सोसायटीचा भूखंड झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकरणाने खाजगी विकासकाला इरादा पत्र दिलेबाबत**

u

**(४२) * ३३८१० uश्री.संजय सावकारे (भुसावळ), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) मुंबई देवनारजवळील बोरला गावातील सुमारे सहा एकर भूखंड मोहम्मद युसूफ ट्रस्टने चिल्ड्रन्स एड सोसायटीला दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिल्ड्रन्स एड सोसायटीचा भूखंड शासकीय असल्याचा ठरवून झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकरणाने खाजगी विकासकाला इरादा पत्र दिल्याची बाब दिनांक ४ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चिल्ड्रन्स एड सोसायटीने नाहरकत प्रमाणपत्र दिल्याशिवाय झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनामार्फत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

u

**श्री. प्रकाश मेहता :** (१) होय.

(२) चिल्ड्रन्स एड सोसायटीला दिलेला भूखंड शासकीय भूखंड समजून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने त्यावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस दि.२४.०९.२०१३ रोजी आशयपत्र दिलेले आहे आणि त्या अनुषंगाने प्राधिकरणाने दि.०४.१०.२०१३ अन्वये जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडे बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली,१९९१ विनियम ३३(१०) परिशिष्ट-IV कलम २.८ अन्वये ना-हरकत प्रमाणपत्र देण्याविषयी विनंती केली होती.

(३) या योजनेसंदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.१२०/२०१४ दाखल करण्यात आली असून त्यामध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाने दि.०३.०७.२०१४ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना काम थांबविण्याचे अंतरीम आदेश दिलेले आहेत. त्यास अनुसरुन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि.१७.०७.२०१४ अन्वये विकासक मे.अटलांटिक कन्स्ट्रक्शन्स कंपनी यांना काम थांबविण्याचे आदेश दिलेले आहेत.

(४) वर नमुद केल्याप्रमाणे मा.मुंबई उच्च न्यायालयापुढे जनहित याचिका क्र.१२०/२०१४ न्यायप्रविष्ठ आहे. मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या अंतीम आदेशानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

-----------------

u

**राज्यातील विविध शहरांमध्ये उभारण्यात येणा-या मेट्रोसारख्या वाहतूक प्रकल्पाला लागणारा निधी उभारण्याबाबत**

u

**(४३) * २९९९५ uश्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) ी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(१) मुंबई, ठाण्यासह राज्यातील विविध शहरांमध्ये उभारण्यात येणा-या मेट्रोसारख्या वाहतूक प्रकल्पाला लागणारा निधी उभारण्यासाठी शासनाने त्या शहरामधील बांधकाम प्रकल्पांसाठी आकारण्यात येणा-या विकास शुल्कात तब्बल दुप्पट वाढ करण्याचा प्रस्ताव तयार केल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) शासनाने दिनांक २१/०८/२०१५ रोजी महाराष्ट्र शासन राज्यपत्रात प्रसिध्द केलेल्या महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मध्ये समाविष्ठ केलेल्या कलम १२४(ब) (२-१अ) या तरतूदीनुसार महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प राबविणा-या नियोजन प्राधिकरणात्मक किंवा नवीन विकास प्राधिकरणाच्या अधिकारीते खालील क्षेत्राच्या संबंधात लागू करण्यात आलेल्या विकास शुल्क दरात १०० % वाढ केली आहे.

-----------------

u

**राज्यातील कारागृहांमध्ये क्षमतेपेक्षा कितीतरी अधिक संख्येने कैदी ठेवण्यात येत असल्याबाबत**

u

**(४४) * २९५७० uश्री.नितेश राणे (कणकवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), अॅड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर)र:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा

करतील काय :-

u

(१) राज्यातील तुरुंग सुरक्षेसाठी विशेष कृती पथकाची स्थापना करण्याची मागणी दोन वर्षापासून विचाराधीन असून वेगवेगळ्या वर्गातील १३६६ पदे भरण्यात आलेली नसल्यामुळे तुरुंग सुरक्षा धोक्यात आली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, पुणे येथील येरवडा कारागृहात २३२३ कैदी ठेवण्याची क्षमता असताना तेथे ६००० कैदी ठेवण्यात आल्याचा अहवाल मा.उच्च न्यायालयात सादर करण्यात आला आहे, तसेच मुंबईतील आर्थर रोड कारागृहासंबंधीचाही अहवाल सादर करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील सर्वच कारागृहांमध्ये क्षमतेपेक्षा कितीतरी अधिक संख्येने कैदी ठेवण्यात आले असून कारागृहात त्याप्रमाणात पुरेशा सुविधा उपलब्ध नसल्याने नविन कारागृहे बांधणे तसेच किमान सुविधा उपलब्ध करणेसाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) तसेच तुरुंग सुरक्षेसाठी उपरोक्त पदे भरण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही,

(२) होय, अंशत: खरे आहे,

(३) राज्यातील काही कारागृहांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त बंदीची संख्या आहे हे खरे आहे, परंतू त्याप्रमाणात पुरेशा सुविधा उपलब्ध नाहीत ही वस्तुस्थिती नाही,

राज्यातील काही ठिकाणी नवीन कारागृह बांधण्याची तसेच काही कारागृहामध्ये वाढीव बॅरॅक्स बांधण्याची कामे प्रगतीत आहे, तसेच काही ठिकाणी जागा संपादन करुन घेण्याची कार्यवाही चालू आहे,

तसेच टेलीमेडीसीनसारखी आधुनिक सुविधा, कॉईन बॉक्स सुविधा तसेच बंदयाच्या केसेसच्या जलद निपटा-यासाठी व्हीडीओ कॉन्फरन्सिगद्वारे सुनावणी चालू करण्यात आली आहे,

(४) व (५) तुरुंग सुरक्षेसाठी विविध संवर्गातील पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

-----------------

u

## मुंबई मेट्रोच्या तिकीटदराबाबत

u

**(४५) * ३२४३६ uश्री.बसवराज पाटील (औसा), श्री.वैभव नाईक (कुडाळ)ळ:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) केंद्र शासनाने नेमलेल्या ई. पदमनाभन समितीच्या अहवालामुळे मुंबई मेट्रोच्या तिकिटदरांचा गुंता वाढला असून सदरहू समितीने तब्बल ११० रुपये तिकिट दरांचीही

शिफारस केल्याने या अहवालाचा फेर आढावा घेण्याचे निर्देश केंद्रीय नगरविकास खात्याने राज्य शासनाला दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) केंद्रीय नगरविकास खात्याने राज्य शासनाला निर्देश दिल्यानंतर राज्याचे माजी मुख्य सचिव जयंत बांठिया यांनी सदरहू ई पदमनाभन समितीच्या दरवाढीला ठाम विरोध दर्शविला असून मुंबई मेट्रो प्रा.लि. आणि एमएमआरडीएच्या चुका निदर्शनाला आणून देत त्यांनी आपल्या स्वतंत्र अहवालात १८, २२ आणि २६ रुपये असे तिकिट दर सुचविले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, माजी मुख्य सचिव यांनी शासनास सादर केलेल्या अहवालाचे थोडक्यात स्वरुप काय आहे, अहवालाच्या अनुषंगाने शासनाने आजमितीस कोणती कार्यवाही केली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u
**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.
(३) माजी मुख्य सचिव यांचे अहवालाचे थोडक्यात स्वरुप पुढीलप्रमाणे आहे.

- सदर प्रकल्प बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्वावर असून प्रकल्प राबविण्यासाठी दोन्ही पक्षामध्ये (Reliance & MMRDA) सवलतकरारनामा झालेला आहे. तथापि, केंद्र शासनाने तिकिटदराचा गुंता सोडविण्यासाठी नेमलेल्या समितीचे सदर सवलतकरारनाम्याच्या अटी व शर्तीकडे दुर्लक्ष झ ाालेले दिसते.
- सदरच्या प्रकल्प खर्चात वाढ झाल्यामुळे तिकिटामध्ये वाढ होणे स्वाभाविक असले तरी वाढीव खर्चाच्या किंमतीबद्दल अजून वाद आहे. तरी सुध्दा अंदाजे प्रकल्पाचा खर्च १.८ पटीने वाढल्याचे गृहीत धरले असता तिकिटाचे दर रु. १८,२२ व २६ इतके राहणे अपेक्षित आहे.
- परंतू, वाढीव तिकीटाचा बोजा ग्राहकावर लादण्यापेक्षा दुस-या उपायांचा विचार करावा जसे वाढीव खर्च समभागामध्ये रुपांतर करुन एम. एम.आर.डी.ए. आणि मे. मुंबई मेट्रो वन प्रा.लि. यांनी करावा अथवा करारनाम्याचा कालावधी वाढवावा इत्यादी.

(४) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

-----------------

u

## देऊळगांवराजा (जि.बुलडाणा) तालुक्यातील पोलीस स्थानकांच्या इमारती तसेच पोलिस वसाहती जीर्ण झाल्याबाबत

u
**(४६) * ३४२८४ uडॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) ा:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) देऊळगांवराजा (जि.बुलडाणा) तालुक्यातील बहुतांशी पोलीस स्थानकांच्या इमारती तसेच पोलिस वसाहतीतील इमारती जीर्ण झाल्या असून अंढेरा, देऊळगावमही आणि स्थानिक पोलिस स्थानकांची कामे निधी अभावी प्रलंबित असल्याचे नुकतेच माहे

सप्टेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी जुन्या इमारतीमध्येच दाटीवाटीने पोलिस कारभार चालत असून पोलिस वसाहत इमारतींची दुरवस्था झाली असल्यामुळे कर्मचारी व कुटुंबियांना जीव मुठीत धरुन राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच तेथील पडक्या वसाहतीत अवैध धंदे होत असून याठिकाणी जुगार मोठया प्रमाणात खेळले जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त इमारती नव्याने बांधण्याबाबत वा दुरुस्ती करण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) देऊळगांवराजा तालुक्यात पोलीस स्टेशन देऊळगांवराजा व अंढेरा येथील पोलीस स्टेशनच्या इमारती व निवासस्थाने हे फार जुने झालेले आहेत,
(२) व (३) हे खरे नाही,
(४) व (५) पोलीस स्टेशन देऊळगांवराजा व अंढेरा येथील पोस्टेची इमारत व निवासस्थानांची नव्याने बांधकाम करणेबाबत आवश्यक नकाशे व अंदाजपत्रके प्राप्त करण्याबाबतचा पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

-----------------

u

## मुलूंड पश्चिम येथील आरक्षित बस आगाराच्या भूखंड आराखड्यात विकासकाने परस्पर बदल केल्याबाबत

u

**(४७) * ३०८९२ uश्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम)म:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) मुलूंड पश्चिम येथील आरक्षित बस आगाराच्या भूखंड आराखड्यात विकासकाने परस्पर बदल केल्यामुळे बेस्टचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) प्रश्नाधीन मुलुंड पश्चिम येथील न.भू.क्र. ७४२ सी मधील १४७९.६६ चौ.मी. खाजगी मालकीचे क्षेत्र हे बेस्ट आगारासाठी आरक्षित असलेल्या मोठया क्षेत्राचा भाग आहे.

बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या विनियम ९ मधील तरतूदीनुसार बेस्ट आगारासाठी आरक्षित तरतूदीनुसार बेस्ट आगारासाठी आरक्षित

असलेल्या जागा जमिन मालक यांनी समावेशक आरक्षणांच्या विनियमाप्रमाणे विकसित करण्याची तरतूद आहे. सदर तरतूदीनुसार आरक्षणाच्या ४०% क्षेत्र हे बेस्टच्या मानकाप्रमाणे ०.४० चटई क्षेत्र निर्देशाकाप्रमाणे बांधकाम करुन जमिन मालकाने विनामोबदला हस्तांतर केल्यानंतर संपूर्ण भूखंडाच्या चटई क्षेत्र निर्देशांक उर्वरित ६०% क्षेत्रामध्ये वापरणेची जमिन मालकास मुभा आहे.

सदर ४०% क्षेत्राची निश्चिती जमिन मालक व समुचित प्राधिकरण म्हणजे बेस्ट उपक्रम यांनी निश्चित करणे क्रमप्राप्त आहे.

जमिन मालक/विकासक यांनी त्यांच्या आराखड्यामध्ये बदल केलेले आहेत. तथापि, यासंदर्भात बेस्ट उपक्रमाचे कोणतेही आर्थिक नुकसान झाल्याचे नसल्याचे बेस्ट प्रशासनाने कळविलेले आहे. तसेच विकासकाने बेस्टला विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतुदीनुसार येणारे परिबध्द क्षेत्र व मोकळ्या जमिनीचा ताबा हस्तांतरीत करणेस नोव्हेंबर, २०१४ मध्ये सहमती दर्शविलेमुळे परिबध्द क्षेत्र व मोकळया जमिनीचा ताबा बेस्ट उपक्रमांच्या गरजेनुसार बांधकाम पुर्ण केल्यानंतर बेस्ट उपक्रमाकडून घेणेत येणार आहे.

(२) ते (४) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

-----------------

**नागोठणे (जि. रायगड) येथील पोलीस ठाण्याच्या जुन्या इमारतींची तसेच पोलीस वसाहतीची दुरावस्था झाल्याबाबत**

u

**(४८) * ३०४४१ uश्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) ।:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) नागोठणे (जि. रायगड) येथील पोलीस ठाण्याच्या जुन्या इमारतींची तसेच पोलीस वसाहतीची दुरावस्था झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे या इमारतींत राहणा-या पोलिसांच्या कुटूंबियांना भाड्याच्या जागेत राहण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पोलिस ठाण्याच्या इमारती/वसाहतीच्या दुरुस्तीकरिता निधी मंजूर असूनही दुरुस्ती प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनस्तरावर याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :**

(१) (२) व (३) नागोठणे पोलीस ठाण्याच्या इमारतीचे बांधकामास प्रशासकीय मान्यता

दिनांक १३ फेब्रुवारी, २००९ रोजी देण्यात आली आहे.

पोलीस वसाहतीतील बैठ्याचाळीच्या इमारतीमध्ये ५ कर्मचारी निवासस्थाने आहेत, परंतू इमारत जूनी व जीर्ण झाली असल्याने राहण्यास योग्य नाही.

(४) नागोठणे पोलीस ठाण्याच्या नवीन बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता दिनांक १३.०२.२००९ रोजी देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

-----------------

u

**कांदिवली, मुंबई येथील मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या क्लबमध्ये बिअरबार सुरु केल्याबाबत**

u

**(४९) * २९६४२ uश्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम)म:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) कांदीवली (मुंबई) येथील महावीरनगरमधील ४२ हजार चौ.मीटर क्षेत्रफळाचा भूखंड मुंबई महानगरपालिकेने काळजीवाहू तत्वावर क्रिकेट कॅडमी उभारण्यासाठी मुंबई क्रिकेट आसोसिएशनला दिलेला असतांना मुंबई महानगरपालिकेच्या अटी आणि शर्तीचे उल्लंघन करुन मुंबई क्रिकेट असोसिएशनने सदर भूखंडावर क्लब उभारुन त्यामध्ये बिअर बार सुरु केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या नगरसेवकांनी सदर बिअर बारला विरोध करुन नियमाचे व अटीशर्तीचे उल्लंघन करणा-या मुंबई क्रिकेट असोसिएशनवर महानगरपालिकेच्या प्रशासनाने कारवाई करावी अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर भूखंडावर मुंबई क्रिकेट असोसिएशनने मुंबई महानगरपालिकेच्या नियमावलीनुसार क्लब उभारुन त्यामध्ये मुंबई महानगरपालिकेच्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरीने बिअर बार सुरु केला आहे.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या तत्कालिन स्थायी समिती सदस्यांनी दिनांक १० जुलै, २०१३ रोजी स्थायी समितीच्या सभेत हरकतीचा मुद्दा उपस्थित करुन क्रिडांगणावर दोन बार, रेस्टॉरंट व कार्ड रुमच्या बांधकामावर हरकत घेतली होती.

तथापि, विकास नियंत्रण नियमावली १९९१ नुसार अशा प्रकारच्या क्रिडा संकुलामध्ये, रेस्टॉरंटच्या बांधकामावर निर्बंध नसल्यामुळे तसे उत्तर देऊन सदर हरकतीचा मुद्दा निकाली काढण्यात आला होता.

(४) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

-----------------

u

**मुंबईतील नानावटी रुग्णालयात ११ कर्मचाऱ्यांना कामावरुन कमी केल्याबाबत**

u

**(५०) * ३२३८४ uश्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम)म:** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) मुंबईतील नानावटी रुग्णालयात कर्मचारी कपात सुरु असून ११ कामगारांना तात्काळ कामावरुन कमी केले असून अपु-या कर्मचाऱ्यांकडून कामे करुन घेतली जात असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रुग्णालयातील कर्मचा-यांची कपात न करता त्यांना न्याय मिळून देण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे खरे नाही.

तथापि, ११ बदली कामगारांना गैरहजेरीच्या कारणास्तव कामावरुन कमी केले आहे ही बाब माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आली आहे.
(२) व (३) होय, संघटनेने अथवा कामगारांनी याबाबत क्षेत्रिय कामगार कार्यालयास तक्रार केलेली नाही. तथापि, व्यवस्थापन व मुंबई लेबर युनियन या संघटनेबरोबर परस्पर चर्चा होऊन ११ पैकी ७ कामगारांना १८/०९/२०१५ रोजी कामावर हजर करुन घेतले असून उर्वरीत ४ कामगार अद्यापही हजर झालेले नाहीत. अशाप्रकारे व्यवस्थापन व संघटना यांच्यामध्ये चर्चा होऊन सदर प्रश्न निकाली निघाला आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

u

**नवीन पनवेल (जि.रायगड) परिसरात स्वप्नपूर्ती आणि सहारा या बांधकाम विकासकांनी ग्राहकांची फसवणूक केल्याबाबत**

u

**(५१) * २९७७७ uश्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा) I:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) नवीन पनवेल (जि.रायगड) परिसरात स्वप्नपूर्ती आणि सहारा या दोन बांधकाम व्यावसायिकांनी ठिकठिकाणी इमारतींची होर्डिग्ज आणि बॅनर्सव्दारे स्वस्तात घरे देण्याची

जाहिरातबाजी करुन ग्राहकांकडून लाखो रुपये घेऊन त्याची फसवणूक केल्या प्रकरणी पनवेल पोलीसांकडे दि. २३ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास ग्राहकांनी तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, व त्यानुसार सदर विकासकांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सहारा या बांधकाम व्यावसायिक यांचे विरुध्द खांदेश्वर पोलीस स्टेशन, ठाणे येथे गु.र. क्र. १२७/२०१५, भा.दं.वि. कलम ४२० महाराष्ट्र मालकी हक्काच्या फ्लॅट्सबाबत (ते बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियम व करण्यासंबंधी) अधिनियम १९६३ चे ४ (१)/१३(१) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

तसेच स्वप्नपूर्ती या व्यावसायिकाचे विरुध्द खांदेश्वर पोलीस ठाणे येथे दोन गुन्हे दाखल आहेत.

१) गु.र.क्र. २०४/२०१५, भा.दं.वि.कलम ४२० महाराष्ट्र मालकी हक्काच्या फ्लॅट्सबाबत (ते बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियम व करण्यासंबंधी) अधिनियम १९६३ चे ४ (१)/१३(१)

२) गु.र.क्र. २०५/२०१५, भा.दं.वि.कलम ४२० महाराष्ट्र मालकी हक्काच्या फ्लॅट्सबाबत (ते बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियम व करण्यासंबंधी) अधिनियम १९६३ चे ४ (१)/१३(१)अन्वये गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. सदर गुन्हे पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील प्रभाग ८ अ व ब मध्ये घरे बांधकामासाठी प्राप्त झालेला रु. ५० कोटींचा निधी पडून असल्याबाबत

**(५२) * ३३३४३ uकुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य)य:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) सोलापूर जिल्ह्यातील प्रभाग ८ अ व ब मध्ये वडार गल्ली, मिलिंदनगर, साठे चाळ, मातंग वस्ती, वृंदावन अपार्टमेंट, बुधवार पेठ, गणेश नगर, एस.टी. स्टॅन्ड परिसर, एस.टी. कर्मचारी वसाहत, सम्राट चौक, मित्रनगर आदिच्या दीन - दलित

बांधवांना त्यांच्या स्वप्नातील घर साकारण्यासाठी शासनाच्या समाजकल्याण विभागाकडून आलेला रुपये ५० कोटीचा निधी सोलापूर महापालिकेकडे पडून असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली काय, चौकशीत काय आढळून आले व शासनाने रमाई आवास योजनेतील ५० कोटी रुपयाचा निधी महापालिकेने प्रभाग ८ अ व ब मध्ये वापरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) रमाई आवास योजनेंतर्गत सोलापूर शहरातील सर्व प्रभागातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकासाठी सामाजिक न्याय विभागाकडून रु. ४७.९३ कोटी इतकी रक्कम महानगरपालिकेस प्राप्त झाली आहे.

वरील निधीपैकी प्रथम टप्प्यात ७१० लाभार्थ्यांपैकी ५३९ लाभार्थ्यांची घरकूले पूर्ण झाली असून उर्वरित लाभार्थ्यांची घरे अंतिम टप्प्यात आहेत. याकरीता १४ कोटी रुपये खर्च झालेले आहेत.

रमाई योजनेसाठी लाभार्थी निवडताना त्याच्या नावावर ७/१२ असण्याची अट विहित करण्यात आली आहे. तथापि अशा प्रकारचे लाभार्थी नसल्यामुळे व जास्तीत जास्त लोकांना या योजनेचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने सदर अट शिथिल करण्याबाबत सोलापूर महानगरपालिकेने सामाजिक न्याय विभागाकडे संदर्भ केला आहे.

(२) सोलापूर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग ८ अ व ब मधील १६० लाभार्थ्यांना या योजनेंतर्गत रु. ३.२० कोटी एवढे अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

(३) रमाई ये ाजनेसाठी विहित करण्यात आलेली ७/१२ ची अट शिथिल करण्याबाबत सोलापूर महानगरपालिकेने केलेली विनंती शासनाच्या सामाजिक न्याय विभागाकडे विचाराधीन आहे.

-----------------

## सांगली महानगरपालिकेच्या ड्रेनेज योजनेत भ्रष्टाचार झाल्याबाबत

u

**(५३) * ३०७७३ uश्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड)ड:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) सांगली मिरज कुपवाड महानगर पालिकेतील विरोधी पक्षनेते यांनी एका शिष्टमंडळासह दिनांक १४ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास, मा.मुख्यमंत्री यांची भेट घेऊन सदर महानगर पालिकेच्या ड्रेनेज योजनेत अनेक घोटाळे झाले असून, कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबतची लेखी तक्रार मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांनी नगरविकास विभागाच्या सचिव श्रीमती. मनिषा म्हैसकर यांना या सर्व प्रकाराची चौकशी करुन लेखी अहवाल देण्यास सांगितले आहे,

हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी विभागीय आयुक्त, पुणे यांना चौकशी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.त

-----------------

## बऱ्हाणपुर (ता.शेवगाव, जि.अहमदनगर) येथील महिलेस झाडाला बांधून केलेली अमानूष मारहाण

u

**(५४) * २९५४४ uश्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) ी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) बऱ्हाणपुर (ता.शेवगाव, जि.अहमदनगर) येथील एका महिलेस दिनांक १५ ऑगस्ट, २०१५ रोजी तिच्या घरात घुसून अमानुष मारहाण करून गाडीतून घरापासून दूर नेऊन झाडाला बांधून जबरी मारहाण केली व लज्जास्पद कृत्य करण्याचा प्रयत्न केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी पोलीसांनी कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) नाही.
(३) सदर प्रकरणी आरोपींविरुध्द शेवगाव पोलीस स्टेशन गु.र.नं. १९२/२०१५ भादंवि कलम १४३, १४७, १४९, ४५२ ३५४ (अ)(ब), ३६४ व ३०७, ३४२, ३९४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला व ६ आरोपींना अटक करण्यात आलेली असून, यापैकी आरोपी क्र. ५ व ६यांना मा.न्यायालयाने अटक पूर्व जामिन मंजूर केला आहे. आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भ् ावत नाही.

-----------------

u

**मुंबई कुर्ला येथील सिटी किनारा हॉटेल मध्ये गॅस गळतीमुळे स्फोट होऊन ८ कामगारांचा मृत्यू झाल्याबाबत**

u

**(५५) * ३०६१४ uश्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर)र:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) मुंबई कुर्ला येथील सिटी किनारा या हॉटेलमध्ये व्यवस्थापनाच्या निष्काळजीपणामुळे गॅस गळतीमुळे स्फोट होऊन ८ जणांचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक १६ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर घटनेत मृत झालेल्या मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदर हॉटेल व्यवस्थापनावर निष्काळजीपणाबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी विनोबा भावे नगर, पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २८०/१५ भा.द.वि.स. कलम ३०४, ३०४(२), २८५, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्ह्यामध्ये एका व्यक्तीस अटक करण्यात आली असून, गुन्हा तपासाधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भ् ावत नाही.

----------------

u

**सिंधुदुर्ग जिल्ह्यात कासार्डे येथे सिलिका मायनिंगमध्ये बेकायदेशीर उत्खनन सुरु असल्याबाबत**

u

**(५६) * ३४६०९ uश्री.वैभव नाईक (कुडाळ)ळ:** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात बेकायदेशीर उत्खननाला शासनाची बंदी असतानांही कासार्डे येथे सिलिका मायनिंगमध्ये राजरोसपणे बेकायदेशीर उत्खनन सुरु असल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकीकडे शासन जिल्ह्यात बेकायदा उत्खनन करणाऱ्यांना मोजमापे घेऊन

२१ कोटीचा दंड ठोठावते. तर एकीकडे जिल्ह्यात बेकायदा मायनिंग करणाऱ्या अभय देऊन शासनाचा करोडो रुपयांचा महसूल बुडवित असल्याने याबाबत शासनाकडे रितसर तक्रार करुनही शासन स्तरावर कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) नाही.

(२), (३) व (४) यासंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उपसंचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, प्रादेशिक कार्यालय, कोल्हापूर यांनी दि. १२.०६.२०१५ रोजी खाणपट्ट्याची स्थळ पाहणी केली असुन त्यानुसार खाणपट्टा धारकाने खाण क्षेत्रातील खनिज साठ्याचे भूपृष्ठ भाडे व अकृषीक आकारणी दंडासहित भरली असल्याचे आढळून आले आहे. तसेच खाणपट्ट्यांमध्ये सिमांकनाचे स्तंभ आढळून न आल्याने ते उभारण्याबाबत खाणपट्टाधारकास कळविण्यात आलेले आहे.

-----------------

**मुंबईतील नालेसफाईच्या कामांमध्ये कंत्राटदारानी केलेल्या गैरव्यवहाराबाबत**

u

**(५७) * २९४८४ uश्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम)म:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) मुंबईतील सर्व नालेसफाईच्या कामांमध्ये कंत्राटदारानी केलेला गैरव्यवहार उघड झाल्यामुळे दोषी कंत्राटदारांवर फौजदारी गुन्हे दाखल करुन कडक कारवाई करण्याची मागणी महापालिकेतील लोकप्रतिनिधीनी केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकप्रतिनिधीच्या सदर मागणीनुसार शासनाने चौकशी करुन संबधित कंत्राटदारावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) नालेसफाई प्रकरणी झालेल्या अनियमिततेबाबत आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिलेल्या आदेशानुसार उपायुक्त (घन कचरा व्यवस्थापन) यांच्या

अध्यक्षतेखालील समितीने मोठया नाल्यांच्या ३२ कंत्राटांपैकी ९ कंत्राटांची प्राथमिक चौकशी करुन त्याचा अहवाल आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना सादर केला.

आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी सदर अहवालानुसार अतिरिक्त आयुक्त (पश्चिम उपनगरे) यांना नालेसफाईच्या कंत्राटांची पुढील सविस्तर चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

सदर चौकशी अंतर्गत अतिरिक्त आयुक्त (पश्चिम उपनगरे) यांनी सादर केलेल्या अंतरिम अहवालानुसार सद्य:स्थितीत सदर प्रकरणात प्राथमिक चौकशीत आढळलेल्या अनियमिततांबाबत १३ कर्मचारी / अधिकारी यांना महानगरपालिकेच्या सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. तसेच संबंधित कंत्राटदाराविरुध्द आझाद मैदान पोलीस ठाणे येथे दिनांक १९.०९.२०१५ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे सद्य:स्थितीत आयुक्तांनी सदर ३ नालेसफाई कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करण्याबाबतही आदेश दिले असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

सद्य:स्थितीत सर्व मोठया नाल्यांसंबंधी नालेसफाई कंत्राट कामाचे अधिदान रोखण्यात आले आहे.

सदर प्रकरणाची सुरु असलेली सविस्तर चौकशी एका महिन्यात पूर्ण होणे अपेक्षित आहे.

तद्नंतर चौकशीअंती आढळणाऱ्या बाबींच्या अनुषंगाने पुढील योग्य ती कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल. u

-----------------

**नागपूर जिल्ह्यात घरकुल बांधण्यासाठी**
**जागा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(५८) * ३४६४४ uश्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक)क:** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) नागपूर जिल्ह्यात बीपीएल धारकांना हक्काचे घरकुल मिळावे यासाठी बीपीएल सर्वेक्षण सन २००२ च्या यादीनुसार कुटुंब धारकाची निवड केली मात्र हे सर्व लाभार्थी घरकुलाच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही लाभार्थी घरकुल बांधण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याने व काही लाभार्थ्यांकडे जागा उपलब्ध आहे पण निधी अभावी हे लाभार्थी घरकुल योजनेपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्व लार्भाथ्यांना घरकुलाचा लाभ देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(४) असल्यास, नागपूर जिल्ह्यात सन २०११ च्या समाविष्ठ सर्वेक्षण यादीतील लाभार्थ्यांना ही घरकुल योजनेचा लाभ देण्यात येणार काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

सन २००२ च्या सर्वेक्षणानुसार नागपूर जिल्ह्यात कायम प्रतिक्षा यादीमध्ये ८०५०१ लाभार्थी असून त्यापैकी ३८४०८ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे,

(२) होय,

इंदिरा आवास योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार लाभार्थ्याकडे घरकुलाचा लाभ देण्यासाठी स्वत:ची जागा असणे आवश्यक आहे त्यामुळे अशा लाभार्थ्यांना जागेअभावी या योजनेअंतर्गत लाभ देणे शक्य नाही,

इंदिरा आवास योजनेचे उद्दिष्ट केंद्र शासनामार्फत राज्याला दिले जाते, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार उद्दिष्टांचे व निधीचे राज्यस्तरावरुन जिल्हानिहाय वाटप केले जाते,

(३) इंदिरा आवास योजनेचे उदिष्टे केंद्र शासनामार्फत राज्याला दिले जाते केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार उद्दिष्टाचे व निधीचे राज्यस्तरावरुन जिल्हानिहाय वाटप केले जाते,

घरकुल योजनेचा लाभ देण्यासाठी ज्या लाभार्थ्याकडे घरकुल बांधकामासाठी स्वत:ची जागा नाही, अशा लाभार्थ्यांना जागा खरेदीसाठी रु. ५०,०००/- पर्यत अनुदान देण्याबाबत uपंडीत दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदीसाठी अर्थसहाय योजना ा ही घोषणा करण्यात आली असून योजनेस अंतिम स्वरुप देण्याची प्रक्रिया सुरु आहे,

(४) केंद्र शासनाने सन २०१५-१६ पासून इंदिरा आवास योजनेचे उद्दिष्ट निश्चित करतांना आर्थिक सामाजिक व जात सर्वेक्षण, २०११ च्या आधारे मार्गदर्शक तत्वातील सुचनेनुसार प्रतिक्षा याद्या तयार करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत, या सूचनेबरोबरच केंद्र शासनाने सर्वेक्षण, २०११ अन्वये लाभार्थी उपलब्ध झाले तरी आधीच्या प्रतिक्षा यादीतील लाभार्थ्यांना देखील घरकुलाचा लाभ देता येईल अशा सूचना दिलेल्या आहेत, त्यानुसार कार्यवाही सुरु आहे,

(५) प्रश्न उद्भ्‍ ावत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेतील जकात चोरी प्रकरणी चौकशी करण्याबाबत

**(५९)** * **२९४३२ uॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) ाे:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) मुंबई महानगरपालिका जकात चोरी प्रकरणी कोणतीही कार्यवाही होत नसल्याने मुंबई महानगरपालिकेचे करोडो रुपयांचे उत्पन्न बुडत असल्याने याबाबतची टास्क फोर्स मार्फत चौकशी करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्र्यांनी दिनांक २० ऑगस्ट, २०१५ रोजी पोलीसांना दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कारवाईनंतर जकात वसूलीत किती टक्के वाढ झाली आहे,

(३) असल्यास, यापूर्वी कमी वसूली झाली असेल तर त्याची जबाबदारी कोणत्या

अधिकाऱ्यांवर निश्चित केली,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने केलेल्या चौकशीचे निष्कर्ष काय आहेत त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
२) जकात टास्क फोर्सच्या अंमलबजावणीनंतर क्रुड ऑईलवरील जकात वसूली वगळता उर्वरीत जकातीच्या महसूलात ११.५० % वाढ झालेली आहे.
३ व ४) जकात चोरी / चुकवेगिरी प्रकरणातील जबाबदार अधिकारी / कर्मचारी यांच्यावर आढावा समितीमार्फत कारवाई करण्यात येवून आत्तापर्यंत चौकशी प्रकरणामध्ये एकुण ६८८ शिक्षादेश बजावण्यात आलेले आहेत. तसेच जबाबदार अधिकारी / कर्मचारी यांच्यावर आढावा समितीमार्फत कारवाई करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
५) प्रश्न उद्भ्‌ावत नाही.

-----------------

## मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्पाबाबत

**(६०) * ३०३५५ uप्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) ी:** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u(१) राज्य शासनाने मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्पाबाबत सुधारीत गॅझेट काढून त्यामध्ये विशेष कार्यकारी अधिकारी यांच्या अधिकारात प्रकल्प राबविण्याचा उल्लेख केला असल्याचे नमुद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सेक्टर ५ मधील पात्रता यादी जाहीर करुन उक्त प्रकल्पाला गती देण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) नाही. तथापि, जागतिक बँक प्रकल्प बंद झाल्याने धारावी पुनर्वसन प्रकल्पासाठी uसक्षम प्राधिकारी ी म्हणून शासन अधिसुचना दि.२९.०८.२०१५ अन्वये uउपमुख्य अधिकारी, जागतिक बँक प्रकल्प, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळळ या पदा ऐवजी uउपमुख्य अधिकारी, धारावी पुनर्विकास प्रकल्प, सेक्टर-५, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळळ अशी सुधारणा करण्यात आली आहे.
(२) व (३) धारावी पुनर्वसन प्रकल्पातील सेक्टर-५ मधील क्लस्टर uजे ी मध्ये एकूण ८५१ झोपडीधारकांचा समावेश असून त्यापैकी ५५४ झोपडीधारकांची पात्र/अपात्रते बाबतची प्रारुप यादी दि.२१.१०.२०१५ रोजी परिशिष्ट-II मध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. प्रारुप यादी प्रसिध्द केल्यानंतर त्यावर झोपडीधारकांचे हरकती/दावे/आक्षेप म्हाडाच्या मुंबई मंडळाद्वारे स्विकारण्यात येत असून झोपडीधारकांची सुनावणी घेण्याची कार्यवाही

त्यांच्याकडे सुरु आहे. झोपडीधारकांचे आक्षेप/दावे/हरकती स्विकारण्याची मुदत दि.३०.११.२०१५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. वाढीव मुदतीत आलेल्या झोपडीधारकांचे आक्षेप/दावे/हरकती वर झोपडीधारकांची सुनावणी घेऊन पात्र/अपात्रबाबतचा अंतिम निर्णय घेण्यात येईल. त्यानंतर मुंबई मंडळाव्दारे अंतिम यादी प्रसिध्द करण्यात येऊन त्यांच्याव्दारे धारावी पुनर्वसन प्रकल्पातील सेक्टर-५ मध्ये बांधण्यात आलेल्या नवीन इमारतीत सोडतीव्दारे पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यात येईल.

-----------------

**पुणे शहरात जुने व जीर्ण अवस्थेत असलेले वाडे व इमारतीचे पुनर्बांधणीबाबत**

**(६१) * २९८०५ uश्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली)ी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) पुणे शहरात शेकडोच्या संख्येने जुने व जीर्ण अवस्थेत असलेले वाडे व इमारती असून ते अतिशय धोकादायक असल्यामुळे रहिवाशांना जीव मुठीत घेऊन राहावे लागत असल्याने या जीर्ण वाड्यांचे व इमारतींचे पुनर्बांधणीसाठी शासनाने तातडीने कार्यवाही करण्याबाबत माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास लोकप्रतिनिधी व रहिवाशांनी संबंधिताकडे वारंवार मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जुने व जीर्ण वाडे व इमारतींचे लवकरात लवकर पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,

पुणे शहरातील स्थानिक लोकप्रतिनीधींनी घर दुरूस्ती मंडळ स्थापन करणे, जुन्या वाडयामध्ये राहणाऱ्या भाडेकरूंचे कायम स्वरूपी हक्क अबाधित राहणेबाबत व जुन्या मोडकळीस आलेल्या धोकादायक वाडयामधील मालक व भाडेकरुंचे तात्पुरत्या निवासाच्या प्रश्नावर उपाययोजना करणे अशा विविध प्रकारच्या मागण्या केल्या आहेत.

(२) या संदर्भात पुणे जिल्हयाचे मा.पालक मंत्री यांनी पुणे शहरासाठी घर दुरूस्ती मंडळ (Housing Repair Board) स्थापन करण्याच्या प्रश्नावर चर्चा करण्याबाबत दिनांक १.१०.२०१५ रोजी बैठक आयोजित केली होती. त्यावेळी मा. पालकमंत्री पुणे जिल्हा यांनी मुंबईच्या धर्तीवर पुणे शहरासाठी शहरातील जुनेवाडे / इमारतीचे दुरूस्तीसाठी स्वतंत्र घर दुरूस्ती मंडळ स्थापन करण्याविषयी कार्यवाही सुरू करण्याचे सुचित केले आहे. त्याअनुषंगाने पुणे महानगरपालिकेमार्फत तपासणी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

-----------------

u

**नांदेड शहरात अनधिकृत मोबाईल टॉवर बाबत**

u

**(६२) * ३३९८४ uश्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे)े:** सन्माननीय

**मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) नांदेड शहरात शाळा, दवाखाना तसेच गर्दीच्या ठिकाणी अनधिकृत मोबाईल टॉवर उभे असून या टॉवरमुळे शाळेतील मुले व रुग्णांच्या जीवितास धोका निर्माण झाला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड शहरातील १३९ अनधिकृत मोबाईल टॉवरधारकांवर महापालिका कारवाई करत नसल्याने संबंधित मनपाचे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे तसेच याबाबत आवश्यक कार्यवाही करु असे आश्वासन वारंवार देतात परंतू प्रत्यक्षात कारवाई करीत नसल्याचे नागरिकांचे जीव धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) सदर प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नांदेड शहरामध्ये गर्दीच्या ठिकाणी अनधिकृत मोबाईल टॉवर्स उभे आहेत हे खरे आहे.

(२) व (३)

- नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीमध्ये एकूण १५२ अनधिकृत मोबाइ्रल टॉवर्स आहेत.
- अनधिकृत मोबाईल टॉवर धारकांना महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३(१) अन्वये नोटीसा बजावण्यात आल्या आहेत तर कलम ४४ ते ४७ अन्वये टॉवर धारकांनी महानगरपालिकेकडे रितसर परवानगीसाठी अर्ज करण्याबाबत कळविले आहे.
- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६७ (अ) मधील तरतुदीनुसार विना परवाना बांधकाम करुन अधनिकृत मोबाईल टॉवर उभारणेबाबत जमीन मालकांकडून मालमत्ता करात शास्ती लावून मालमत्त कर वसूल करण्याची कार्यवाही प्रस्तावित केली आहे.
- अनधिकृत मोबाईल टॉवर्सवर दंडात्मक कार्यवाही करण्याचे प्रस्तावित असल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होण्याचा प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.
- मा.उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक २०४३/२०१४ प्रकरणी दि. २५/०८/२०१४ व १२/०९/२०१४ रोजी दिलेल्या आदेशान्वये महानगरपालिका व स्थानिक प्राधिकरण यांनी मोबाईल टॉवरवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात येवू नये तसेच मोबाईल टॉवरवर कोणत्याही प्रकारचे सील लावू नये व विद्युत पुरवठा खंडीत करु नये. जर विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आला असेल तर जोडण्यात यावा असे निदेश दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

-----------------

**यवतमाळ येथे बनावट कागदपत्रांच्या आधारे सीमकार्ड मिळवून बँकीगव्दारे मॅक व्हेईकल प्रा.लि.कंपनीच्या खात्यातून तब्बल ४९ लक्ष रूपये हस्तांतरीत केल्याबाबत**

u

**(६३) * ३४९४८ uश्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) ी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) यवतमाळ येथे बनावट कागदपत्रांच्या आधारे सीमकार्ड मिळवून ऑनलाईन बँकीगव्दारे मॅक व्हेईकल प्रा.लि. कंपनीच्या खात्यातून तब्बल ४९ लक्ष रूपये हस्तांतरीत करून घेतल्या प्रकरणी वडगावरोड पोलीसांनी तीन आरोपींना अटक केली असल्याचे माहे आक्टोबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करून संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) प्रस्तुत प्रकरणी पोलीस स्टेशन वडगाव रोड येथे फिर्यादीनी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने गु.र. क्र. ३२४/१५ भा.द.वि. ४१७,४२०,४६८,४७१ माहिती व तंत्रज्ञान कायदा सह कलम ६६ (क) (ड) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
सदर प्रकरणी सहा आरोपींना अटक करण्यात आली असून आरोपींकडून रु. १,३०,०००/- रोख , तीन लाख रुपयांचे सोन्याचे दागिने व विविध बँकातील ३१ लाख रुपये गोठविण्यात आले आहेत. गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.
(३) प्रश्न उद्‌भ् ावत नाही.

-----------------

u

**पालघर जिल्ह्यातील तारापूर अणुउर्जा केंद्राजवळील मांगले पाडयाजवळ समुद्रकिनारी बॉम्ब सदृश्य संशयास्पद वस्तू आढळल्याबाबत**

u

**(६४) * ३१८३७ uश्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुरेश लाड (कर्जत)त:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) पालघर जिल्ह्यातील तारापूर अणुउर्जा केंद्रापासून २ किलोमीटर वरील मांगले पाडयाजवळ समुद्रकिनारी दिनांक २७ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास बॉम्ब सदृश्य वस्तू व इतर संशयास्पद वस्तू आढळून आल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच समुद्र किनाऱ्यावरील परिसरात सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) संशयास्पद वस्तू बाबत तारापूर पोलीस ठाणे स्टेशन डायरी क्रमांक ०८/२०१५ रोजी ६.२० वाजता नोद करण्यात आली.

संशयास्पद वस्तू हे एक उपकरण हे एका जहाजातून दुसरे जहाजावरती दोरी टाकण्यासाठी वापरले जाते तसेच रेसक्यू ऑपरेशन मध्ये एका जहाजावरून समुद्र किनाऱ्यावरुन जहाजावर दोरी टाकण्यासाठी वापरले जाते असे निदर्शनास आले आहे.

तारापूर पोलीस ठाण्याचे हद्दीतील सागरी किनारी सुरक्षिततेच्या दृष्टीने २४ तास हत्यारधारी पो कर्मचारी पेट्रोलिंग तसेच सागरी गस्त नेमण्यात येतात. गावात सागर रक्षक दल स्थापन करण्यात आले असून त्यांना सागर किनाऱ्याचे सुरक्षिततेचे महत्व समजावून सांगितलेले आहे. तसेच कोस्टल हेल्पालाईन टोल फ्री क्रमांक १०९३ आहे.
(३) प्रश्न उद्‌भ् ावत नाही.

-----------------

**जळगाव शहरातील विविध ठिकाणी गरिबांसाठी बांधण्यात आलेल्या घरकुल योजनेमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(६५) * ३६८६९ uश्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर)र:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) जळगाव शहरातील शिवाजीनगर, गेंदालाल मिल तसेच विविध ठिकाणी गरिबांसाठी बांधण्यात आलेल्या घरकुल योजनेतील घरे काही पालिका कर्मचाऱ्यांनी बळकावले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेच्या ८२ कर्मचाऱ्यांचा यात समावेश असुन या कर्मचाऱ्यांना प्रशासनाने नोटीसा बजावण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार गरिबांना घरे मिळवून देण्याबाबततकोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) जळगाव शहरामधील झोपडपट्टीमध्ये रहिवास करणाऱ्या झ ाोपडी धारकांसाठी घरकुलांची योजना जळगाव शहर पलिकेद्वारे राबविण्यात आली.
uयामध्ये घरकुल योजनेच्या सेवाशुल्क रजिस्टरमधील नोंदीनुसार घरकूल वाटप करण्यात आलेल्या लाभधारकांमध्ये ८२ महानगरपालिका कर्मचाऱ्यांचा समावेश असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) या ८२ कर्मचाऱ्यांना ते सदर योजनेचे लाभार्थी असल्याची खातरजमा करण्याकरिता त्यांना मे २०१५ व २.७.२०१५ अन्वये महानगरपालिकेने नोटीसा बजावल्या आहेत.
(३) सदर ८२ कर्मचारी तत्कालिन धोरणानुसार सर्व निकषांची पुर्तता करत असल्याने

व घरकुल मिळण्यास पात्र असल्याने त्यांना घरकुलाचे वाटप करण्यात आले होते. जळगाव महानगरपालिकेकडून सदर ८२ कर्मचाऱ्यांच्या घरकुलांचे स्थळ निरिक्षण करण्यात आले.

त्यानुसार ६० कर्मचारी हे घरकुलांचा स्वत: रहिवासीकरिता वापर करत असल्याचे व उर्वरित २२ कर्मचारी हे त्यांच्या नावे असलेल्या घरकुलांचा स्वत: रहिवासीकरीता वापर करीत नसून तेथे अन्य व्यक्ती राहात असल्याचे निदर्शनास आले आहे.

घरकुल वाटपाच्या निकष/शर्तीचा भंग केल्याने महानगरपालिकेमार्फत सदर २२ कर्मचाऱ्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ६० व ८१-१(ब) नुसार ३० दिवसात घरकुल निर्वस्ती करुन महानगरपालिकेच्या ताब्यात देणेबाबत दिनांक २१ नोव्हेंबर, २०१५ रोजी अंतिम नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

सदर जप्त करण्यात येणाऱ्या घरकुलांचा पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याबाबतची कार्यवाही जळगाव महानगरपालिकेकडून प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

-----------------

u

**कुळगांव बदलापूर (जि.ठाणे) नगरपालिका क्षेत्रात दलित वस्ती ये ाजनेंतर्गत निधी इतरत्र वापरल्याबाबत**

u

**(६६) * २९६११ uश्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ तालुक्यातील कुळगांव बदलापूर नगरपालिका क्षेत्रात दलित वस्ती ये ाजनेंतर्गत झालेली कामे दलित वस्तीमध्ये न करता चौपाटी सुशोभिकरण व दलित वस्त्या नसलेल्या प्रभागांमध्ये बेकायदेशिपणे खर्च केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत दलित वस्ती सुधारणा योजनेंतर्गत आलेला निधी चौपाटी सुशोभिकरणासाठी व इतरत्र वापरणाऱ्या दोषी अधिकारी व तत्कालीन नगराध्यक्ष यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली अथवा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

दिनांक १७.०६.२०१५ च्या ठरावाने मंजूर केलेल्या एकूण ५८ कामांपैकी २० कामे ये ाजनेच्या निकषानुसार आहेत.

उर्वरित ३८ कामे योजनेच्या निकषानुसार नसुन सदर ठराव अंशत: विखंडनासाठी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे पाठविण्याबाबत मुख्याधिकारी, कुळगांव बदलापूर नगरपरिषद यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

(४) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

-----------------

u

## नटवर पारेख कंपाऊड शिवाजी नगर गोवंडी येथील इमारतींना पायाभूत सोयीसुविधा पुरविणेबाबत

u

**(६७) * २८५५० uश्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर)र:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नटवर पारेख कंपाऊड, शिवाजी नगर, गोवंडी, मुंबई येथील मुंबई महानगर क्षेत्रविकास प्राधिकरणाअंतर्गत जवळपास ६६ इमारतींना पायाभूत सोयीसुविधासह मध्यवर्ती सांस्कृतिक हॉल, पेयजलाची व्यवस्था व खरेदी-विक्री केंद्राच्या सोयी-सुविधा नसल्याने तेथील सदनिकांची दुरवस्था व घुसखोरांचा बिमोड करण्याबाबतची मागणी स्थानिक जनप्रतिनिधी, रहिवाशी संघ यांनी माहे ऑक्टोंबर २०१५ वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री, (नगरविकास), राज्यमंत्री (नगरविकास), प्रधान सचिव (नगरविकास), आयुक्त (एम.एम.आर.डी.ए. प्राधिकरण) यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे ठोस कार्यवाहीची मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) नटवर पारेख विकासकाने विकसित केलेल्या नटवर पारेख, इंडियन ऑईल कंपाऊन्ड, गोवंडी येथील पुनर्वसन वसाहती बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील कलम ३३(१०) (३.११) अंतर्गत खाजगी विकासकांकडून विकसित करण्यात आली आहे.

सदर विकासकाकडून वसाहतीमधील रस्ते, पाणीपुरवठा, गटारे, मलनि:सारण यासारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यात येतात. तथापि यामध्ये स्वतंत्र खरेदी-विक्री केंद्र व सांस्कृतिक केंद्र पुरविण्याची तरतूद समाविष्ट नाही. सदर पुनर्वसन वसाहतीमध्ये प्रत्येक निवासी सदनिकेत पेय जलाची (पाणी पुरवठा व्यवस्था) करण्यात आली आहे. तसेच सदर वसाहतीमध्ये तळमजल्यावर अनिवासी गाळे उपलब्ध असून ते प्रकल्पग्रस्तांना वितरीत करण्यात आले असून त्यामध्ये ते व्यवसाय करीत असल्यामुळे रहिवाश्यांच्या मूलभूत गरजांच्या वस्तू त्यामधून उपलब्ध होतात.

सदर वसाहतीमध्ये RG साठी राखीव भूखंडावर नियमातील अनुज्ञेयतेनुसार मनोरंजन केंद्र विकसित करण्याच्या प्रस्तावाची प्राथमिक सुसाध्यता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर तपासण्यात येत आहे.

-----------------

## मुंबईतील विलेपार्ले पश्चिम येथे लोहीयानगर झोपडपट्टी पुनर्वसन योजनाच्या प्रलंबित कामाबाबत

**(६८) * ३२६३२ uश्री.पराग अळवणी (विलेपार्ले):** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) विलेपार्ले पश्चिम येथे लोहीयानगर येथे होत असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत पुनर्वसन इमारतींचे बांधकाम अपूर्ण राहिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेतील पुनर्वसन इमारतींना भोगवटा पत्र न मिळता सुध्दा वीज, पाणी, मालमत्ता कर देयकाचा भरणा विकासक करत नसल्यामुळे नागरीकांनाच करावा लागतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ठिकाणी पुनर्वसन इमारत बांधण्यासाठी खणलेला खड्डा अनेक वर्षे तसाच असून पावसाळी पाण्यामुळे आता तेथे दलदल असल्याने या दलदलीत कुणीही पडून जीव गमावू शकतो तसेच डास निर्माण होऊन रोगराई पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने कोणतीही कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) विलेपार्ले येथील न.भू.क्र. १५८२ या मिळकतीवरील लोहियानगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत पुनर्वसन घटकात अ-१ ते अ-४ व बी-१ ते बी-४ अशा एकूण ८ इमारती असून त्यापैकी ७ इमारतींना दि. ०२.०९.२००३ पर्यंत भोगवटा प्रमाणपत्र दिले आहे. पुनर्वसन इमारत अ-४ या एका इमारतीचे बांधकाम सुरु आहे.

(२) सदर योजनेतील विकसीत केलेल्या ७ इमारतींचे सन २००३-०४ मध्ये कर निर्धारण करण्यात आले आहे. दुरदर्शी कर सवलतीनुसार मालमत्ता कराची
रु. १,१७,९१,००२/- इतकी थकबाकी भोगवटादारांनी सन २००३-०४ पासून भरलेली नाही. या ७ इमारतींपैकी ६ इमारतींची पाण्याची देयके भरलेली असून एका इमारतीचे एप्रिल २००८ ते ऑक्टोबर २०१५ मधील रु. २९,९९,३१७/- देयकाची रक्कम थकीत आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे या योजनेतील ७ इमारतींना दि. ०२.०९.२००३ पर्यंत भोगवटा प्रमाणपत्र दिले आहे. त्यामुळे रहिवाशी/ सोसायट्यांनी विज, पाणी, मालमत्तेची देयके भरणे अपेक्षित आहे.
(३), (४), (५) व (६) सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये पुनर्वसन इमारतींसाठी खोदलेल्या खड्यांसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत महापालिका अधिनियम ३८१ (१) अन्वये विकासाकावर नोटीस बजावल्यानंतर विकासकाने तो खड्डा मातीने पूर्ण भरुन काढलेला असून आता त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे डासांचे उत्पत्ती स्थान राहिलेले नाही.

-----------------

**गडचिरोली या नक्षलग्रस्त जिल्ह्यात शासनाच्या विविध विभागात**
**२ हजार ४१३ कर्मचारी, अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(६९) * ३०१८९ uश्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) ी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) गडचिरोली या नक्षलग्रस्त जिल्ह्यात वर्ग १ पासून वर्ग ४ पर्यंत शासनाच्या विविध विभागाच्या आस्थापनेत २ हजार ४१३ कर्मचारी, अधिकारी यांचे पदे रिक्त असल्याचे दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदरील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, गडचिरोली जिल्ह्यात शासनाच्या विविध कार्यालयात अधिक प्रमाणात पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२), (३) व (४) नागपूर व अमरावती विभागातील जिल्ह्यात तसेच नंदूरबार, धुळे, परभणी, हिंगोली, बीड व उस्मानाबाद या जिल्ह्यात शासकीय अधिकारी रुजू होण्यास कमी प्रमाणात इच्छूक असल्याने सदर पदे अधिक प्रमाणात रिक्त राहत होती.

त्यानुषंगाने महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटप नियम, २०१५ दि. २८.४.२०१५ व सुधारणा करुन दि.१६.७.२०१५ अन्वये अधिसूचित करण्यात आले आहेत. सदर सुधारित नियमानुसार नागपूर, अमरावती, औरंगाबाद व नाशिक या महसूली विभागातील रिक्त पदे प्राथम्याने भरावयाची आहेत.

तसेच शासन परिपत्रक दि.१०.३.२०१५ अन्वये विदर्भातील तसेच धुळे, नंदूरबार, हिंगोली, परभणी, उस्मानाबाद व बीड जिल्ह्यात पदस्थापना झालेल्या अधिका-यांना कार्यमुक्त करणेबाबत सर्व विभागांना सूचना देण्यात आल्या आहेत.

सर्व प्रशासकीय विभाग, जिल्हा परिषद व नगरपालिका/महानगरपालिका मध्ये मंजूर, भरलेली व रिक्त पदांचा सामान्य प्रशासन विभागाकडून तिमाही आढावा घेण्यात येतो. या व्यतिरिक्त रिक्त पदे तातडीने भरण्यासाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय दि. २३.१०.२०१५ अन्वये समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीची दि.२६.१०.२०१५ रोजी झालेल्या बैठकीत, अत्यावश्यक संवर्गातील पदे तसेच सरळसेवेच्या व पदोन्नतीच्या कोटयातील पदावर पात्र उमेदवारांना पदोन्नती

देण्याबरोबरच, अनुकंपा तत्वावर नियुक्ती देणेबाबत सर्व विभागांना सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच अनुकंपा नियुक्ती संदर्भात शासन निर्णय दिनांक १.३.२०१४ अन्वये प्रतिवर्षे रिक्त होणा-या पदांच्या ५ % पदांची मर्यादा वाढवून ती एक वर्षासाठी १० %करण्यात आली होती. सदर मर्यादा १.३.२०१५ पासून पुढे दोन वर्षे चालू ठेवण्याच्या शासन निर्णय दि. २८.१०.२०१५ अन्वये घेण्यात आलेला आहे.

तसेच सदर बैठकीत गडचिरोली जिल्ह्यातील पदे भरण्याबाबत स्वतंत्र बैठक घेण्याबाबत ठरविण्यात आले होते. त्यानुसार दिनांक २६.११.२०१५ रोजी मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली बैठक आयोजित केली आहे.

----------------

**रत्नागिरी जिल्ह्यातील लोटे (ता. खेड) औद्योगिक वसाहतीतील विनिती ओर्गनिक केमिकल कंपनीत झालेल्या स्फोटाबाबत**

**(७०) * २८४७७ uश्री.भास्कर जाधव (गुहागर)र:** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१)१रत्नागिरी जिल्ह्यातील लोटे (ता. खेड) औद्योगिक वसाहतीतील विनिती ओर्गनिक केमिकल कंपनीत दि. १३/०९/२०१५ रोजी बाष्पक (बॉयलर) दुरुस्तीवेळी स्फोट होऊन ६ कामगार गंभीररीत्या जखमी झाले तसेच बाष्पकामधून गळती झालेल्या वायुमुळे परिसरातील रहिवाशांना त्रास झाला होता हे खरे आहे काय,

(२)२असल्यास, सदर कंपनीमध्ये अशाच प्रकारचा स्फोट माहे सप्टेंबर २०१५ च्या पहिल्या आठवड्यातदेखील झाला होता, हे खरे आहे काय,

(३)३असल्यास, बाष्पक (बॉयलर) दुरुस्तीचे काम बाष्पक निरीक्षक यांना लिखित कल्पना न देता बाष्पकाबाबतचे पुरेसे ज्ञान नसलेल्या ठेकेदाराकडून करण्यात येत होते, हे ही खरे आहे काय,

(४)४असल्यास, सदर प्रकाराबाबत चौकशी होऊन दोषींवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त-कामगार, आयुक्त-बाष्पके, संचालक-औद्योगिक व संबंधितांकडे केली आहे हे ही खरे आहे काय,

(५)५असल्यास, कामगारांच्या सुरक्षितेसाठी व जखमी कामगारांना आर्थिक मदत देण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) विनिती ऑर्गनिक्स लिमिटेड (प्लॉट नं.ए-२०, एम.आय.डी.सी., लोटे परशुराम, ता.खेड, जिल्हा रत्नागिरी) या कारखान्यात दिनांक १२.०९.२०१५ रोजी बॉयलर विभागातील स्टीम हेडरच्या एलपीएस स्टीम व्हॉल्व्हच्या लिकेज दुरुस्तीचे काम करीत असताना पाईप लाईनमधील शिल्लक वाफ (स्टीम) बाहेर

येऊन तेथे काम करणाऱ्या सहा कामगारांना ५% ते १८ % भाजल्यामुळे जखमा झ ााल्या हे खरे आहे. तथापि, बाष्पकाचा स्फोट झाला व बाष्पकातून गळती झालेल्या वायुमुळे परिसरातील रहिवाश्यांना त्रास झाला, अशी वस्तुस्थिती नाही.

(२) हे खरे नाही.

(३) तशी वस्तुस्थिती नाही.

(४) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून बाष्पक अधिनियम तसेच कारखाने अधिनियमातील तरतुदींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्याने भोगवटादाराविरुध्द यथोचित कलमाखाली कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.

(५) व (६) सुरक्षेचे प्रचलित नियम पाळण्यासाठी आस्थापनेला सक्त ताकीद देण्यात आली आहे.

जखमी कामगारांवर वैद्यकीय उपचारासाठी आस्थापना व्यवस्थापनाने रु.१३,४६,०००/- एवढा खर्च केला असून उपचारादरम्यान वैद्यकीय रजेचे पूर्ण वेतन कामगारांना देण्यात आले आहे. उपचारानंतर सर्व कामगार कामावर पूर्ववत रुजू झाले आहेत.

-----------------

u

**ठाणे येथील बांधकाम व्यावसायिक सुरज परमार यांच्या आत्महत्येसंदर्भात कारवाई करणेबाबत**

u

**(७१) * ३०२६३ uश्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व)वः** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) ठाणे येथील बांधकाम व्यावसायिक सुरज परमार यांच्या आत्महत्येची मा. मुख्यमंत्री यांनी गंभीर दखल घेऊन परमार यांच्या सुसाईड नोटमध्ये उल्लेख असलेल्या सर्वावर कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्तांना दिले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी सुसाईड नोटमध्ये उल्लेख असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सदर सुसाईड नोटमध्ये उल्लेख असणा-या विरुध्द कासारवडवली पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं २५१/२०१५ कलम ३०६, ३४ भादवि सह भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ कलम ७, १३ (२) अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे. गुन्ह्याचा अधिक तपास चालु आहे.

(३) प्रश्न उद्भ् ावत नाही.

-----------------

u

**राज्यात कौशल्य विकास अभियान प्रभावीपणे राबविण्याबाबत**

**(७२) * २८८२४ uॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) ी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) राज्यात सन २०२२ पर्यंत ५ कोटी कुशल मनुष्य बळ निर्मितीचे उद्दिष्ट ठेवले असून यासाठी प्रमोद महाजन कौशल्य विकास अभियाना अंतर्गत विद्यापीठ स्थापन करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात एका वर्षात ४५ लाख तरुणांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यासाठी या कार्यक्रमाचा अद्याप अभ्यासक्रम देखील निश्चित झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा अभ्यासक्रम निश्चित करून राज्यात कौशल्य विकास विद्यापीठ सुरु करण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करीत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) राज्यात कौशल्य विकास विद्यापिठाची स्थापना करण्याचा तत्वत: निर्णय शासनाने घेतला आहे. आता सदर विद्यापिठाची निर्मिती/ स्थापना करण्याची विधीवत कार्यवाही उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत सुरु आहे. सदर कौशल्य विकास विद्यापीठाचे अभ्यासक्रम व इतर शैक्षणिक बाबी निश्चित करण्याची कार्यवाही संबंधित प्रायोजक संस्थेमार्फत (Sponsoring Body) निश्चित करण्यात येणार आहे.

(३) कौशल्य विकास विद्यापिठाच्या कायद्यास विधानमंडळाची मान्यता मिळण्याची प्रक्रीया (उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून) शासन स्तरावरुन पूर्ण झाल्यानंतर सदर विद्यापिठामार्फत कोण-कोणते अभ्यासक्रम राबवावयाचे आहेत यांचा आराखडा विद्यापीठ प्राधिकरणामार्फत निश्चित करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भ् ावत नाही.

-----------------

**नागपूर येथील दीक्षाभूमीला uअअ वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याबाबत**

u(७३) * **२९२७८ uश्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.छगन भुजबळ (येवला) ा:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) नागपूर येथील दीक्षाभूमीला uबब वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याचा निर्णय

घेतल्याचे दिनांक २४ ऑगस्ट, २०१५ च्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर येथील दीक्षाभूमी हे एक बौध्द तीर्थक्षेत्र म्हणून जगभरात प्रसिध्द असून या राष्ट्रीय स्मारकाला uअअ वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा द्यावा अशी मागणी जिल्हा नियोजन समितीचे सदस्य तसेच नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दीक्षाभूमीला uअअ वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा देऊन दीक्षाभुमीला आवश्यक सोयी-सुविधा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नागपूर येथील दीक्षाभूमी या स्थळास uबब वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्या संबंधीचे आदेश दिनांक १४/८/२०१५ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.

(२) होय.

(३) व (४) राज्यात uअअ वर्ग पर्यटन स्थळे घोषित करण्यासाठी निकष तयार करण्यासाठी दिनांक ७/१०/२०१५ च्या शासन निर्णयाव्दारे सचिव (पर्यटन) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीने त्यासंबंधीचे निकष तयार केल्यावर त्या आधारे दीक्षाभूमी या स्थळास uअअ वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

-----------------

## मुंबईतील रामजीनगर, घाटकोपर येथील अल्पवयीन मुलीचे अपहरण करुन तिची निर्घृण हत्या केल्याबाबत

**(७४) * २९७२३ uश्री.विजय औटी (पारनेर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा) I:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) मुंबईतील रामजीनगर, घाटकोपर येथील एका अडीच वर्षाच्या लहान मुलीचे अपहरण केल्यानंतर तिच्यावर लैंगिक अत्याचार करुन तिची निर्घृणपणे हत्या केल्याचे शवविच्छेदनाच्या अहवालातून दिनांक १२ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबई शहरात गेल्या ९ महिन्याच्या कालावधीत सुमारे ६७४ मुलींचे अपहरण करुन ३२२ लहान मुली नराधमांच्या लैंगिक अत्याचारास बळी पडल्याची माहिती मुंबई पोलिसांच्या लेखी नोंद असलेल्या आकडेवारीतून समोर आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी व्यक्तीविरुध्द कारवाई करुन अल्पवयीन मुलीवर लैंगिक

अत्याचार रोखण्यासाठी शासनाने कोणती खबरदारीची उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u
**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) बृहन्मुंबई शहरात गेल्या ९ महिन्याच्या कालावधीत मुलींच्या अपहरणाचे ६६० गुन्हे दाखल असून, उघड गुन्हे ३३८ इतके आहेत. तसेच मुलींवरील बलात्काराचे ३१६ गुन्हे दाखल असून, उघड गुन्हे २९७ इतके आहेत.
(३) उपरोक्त प्रकरणी घाटकोपर पोलीस ठाणे येथे अज्ञात इसमाविरुध्द गु.नों.क्र. ४१५/२०१५ कलम ३०२, ३६३, ३७६ (२) (I)(J)(M), २०१ भा.दं.वि सह कलम ४, ६, ८, १२ लहान मुलांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम, २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, गुन्हा तपासाधीन आहे.

अल्पवधीन मुलींवरील लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी केलेल्या वा करण्यात येत असलेलया उपाययोजना :

बृहन्मुंबई पोलीसांमार्फत महिला व बालकाकरीता १०३ क्रमांकाचे हेल्पलाईन सुरु केली, लहान मुले/मुली हरवलेल्याची नोंद न घेता अपहरणाचा गुन्हा नोंद करुन तपास करणे, तपासात ४ महिनेपेक्षा जास्त कालावधीत गुन्हा उघडकीस न आल्यास अनैतिक मानवी वाहतूक कक्षाकडे सुपूर्द करणे, पोलीस ठाणे निहाय महिला सुरक्षा कक्ष स्थापन केले असून, नागरिकांना सध्याच्या परिस्थितीची जाणीव करुन देऊन खबरदारी धेण्याची सूचना देऊन जनजागृती करण्यात येते. बृहन्मुंबईतील शाळांच्या मुख्याध्यापकांच्या, पोलीस मित्र कमिटी, मोहल्ला कमिटी, शांतता कमिटी, महिला दक्षता कमिटी, झोपडपट्टी पंचायत कमिटी इत्यादीच्या बैठकीत लहान मुलांच्या सुरक्षितेच्या दृष्टीने सूचनावजा आदेश दिले आहेत, शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणऱ्या वाहनामधील चालक हुशार व चाणाक्ष ठेवण्याची व महिला कर्मचारी ठेवण्याची सूचना केली आहे, शाळा सुटल्यानंतर मुलांच्या पालका व्यतिरिक्त इतर कोणीही अनोळखी व्यक्ती सोबत मुलांना पाठवू नये म्हणून सूचना देण्यात आल्या आहेत. मुलांचे शाळा, पार्क, गर्दीची ठिकाणे, झोपडपट्टी परिसर या ठिकाणी बिट मार्शल, महिला चार्ली या गणवेशधारी पोलीसाची सर्तक गस्त वाढविण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

-----------------

u

**दापोली (जि.रत्नागिरी) नगरपंचायतीने शहरातील मिथेन वायूवर पथदिप प्रज्वलीत करण्याचा प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

u
**(७५) * ३४७९४ uश्री.संजय कदम (दापोली) ी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u

(१) दापोली (जि.रत्नागिरी) नगरपंचायतीने शहरातील ओल्या कचऱ्याची विल्हेवाट लावून निसर्गऋण प्रकल्पाच्या माध्यमातून कचऱ्याची समस्या सोडविण्यासाठी आणि निर्माण

होणाऱ्या मिथेन वायूवर पथदिप प्रज्वलीत करण्याच्या प्रकल्पावर आतापर्यंत रु.४५ लाख ५० हजार खर्च करुनही सदरहू प्रकल्प अद्यापही पूर्ण झालेला नसून कचरा टाकण्यासाठी डंपींग ग्राऊॅडचाच वापर करण्यात येत आहे हे खरे आहे काय
(२) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास सदरहू प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दापोली शहरातील ओल्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीने नगरपरिषदेने निसर्गऋण प्रकल्पाच्या माध्यमातून पहिल्या टप्यात बायोगॅस प्रकल्प व दुसऱ्या टप्यात जनरेटर हाऊस उभारण्याचे काम पूर्ण केले आहे. त्याकरीता रु. ४५.५० लक्ष इतका खर्च आला आहे. मात्र पथदिप प्रल्वलीत करण्याची बाब नगरपरिषदेच्या विचाराधीन नाही. तसेच, ओल्या कचऱ्यावर प्रकिया करुन बायोगॅसेची निर्मिती करण्यात येत असून केवळ सुका कचऱ्याचीच डंपींग ग्राऊंडवर विल्हेवाट लावण्यात येत आहे.
(२, (३) व (४) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

-----------------

u

**सोलापूर महानगरपालिकेला जेएनआरएमयु अंतर्गत मिळालेल्या ४६ बस गाड्या तांत्रिक दृष्ट्या खराब असल्याबाबत**

u

**(७६)** * **२८९२९ uश्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण)ण:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) अशोक लेलँण्ड कंपनीच्या मनपा सोलापूरला JNRMU अंतर्गत मिळालेल्या २०० पैकी ४६ गाड्या तांत्रिक दृष्ट्या खराब असल्याचा अहवाल उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून देण्यात आला असून या संदर्भात मनपा सोलापूर यांनी अशोक लेलँण्ड कंपनीला कायदेशीर नोटीस पाठवली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वारंटी काळात गाड्या खराब होऊन देखील या गाड्या बदलून देण्यास अशोक लेलँण्ड कंपनीने नकार दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करून ४६ गाड्या बदलून देण्यासाठी व सदर खरेदी प्रकरणात गैरव्यवहार झाला असल्यास संबंधित अधिका-यांवर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे
(२) होय, अशोक लेलॅण्ड कंपनीने बसेस (जनबस) बदलून देण्याऐवजी वॉरंटी कालावधी चालू असल्याने त्यानुसार जरूर ती तांत्रिक दुरूस्ती करून देणेस तयार असलेबाबत सोलापूर परिवहन उपक्रमास कळविले आहे.
(३) व (४) सदर बसेसची खरेदी केंद्र शासनाच्या सूचनांप्रमाणे करण्यात आली असून त्यानुसार तांत्रिकदृष्ट्या अयोग्य असलेल्या ४६ बसेस बदलून देणेबाबत कंपनीस सोलापूर परिवहन उपक्रमामार्फत नोटीस देण्यात आलेली आहे.

-----------------

u

## केंद्रीय गृहनिर्माण विधेयकामुळे गृहनिर्माण योजनेत फसवणूक झाल्यास यंत्रणांविरुध्द दाद मागता येणार नसल्याबाबत

u

**(७७) * २८७३९ uश्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम)म:** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) केंद्रीय गृहनिर्माण विधेयकामुळे मुंबईसह राज्यात काही ठिकाणी सुरु असलेल्या पुनर्विकास प्रकल्पातील फसवणूकीचा मुद्दा बाजूला पडून पुनर्विकास प्रकल्पात विकासकाकडून असा प्रकार घडल्यास सामान्यांना विकासक, म्हाडा, सिडको वा तत्सम सरकारी गृहनिर्माण यंत्रणांविरुध्द दाद मागता येणार नाही तसेच केंद्रीय गृहनिर्माण विधेयक लागू झाल्यानंतर महाराष्ट्र गृहनिर्माण विधेयक, २०१२ रद्द होणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गृहनिर्माण पुनर्विकास प्रकल्पात सिडको, म्हाडा, विकासक, व तत्सम सरकारी गृहनिर्माण यंत्रणा यांच्याकडून सर्वसामान्याची फसवणूक झाल्यास कोणाकडे दाद मागावी याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत?

u

**श्री. प्रकाश मेहता :**

(१)ते (३) केंद्र शासनाचे, रिअल इस्टेट (नियमन व विकास) विधेयक, २०१३ हे सद्य:स्थितीत राज्यसभेत मंजूरीसाठी मांडण्यात आले असता, सदर विधेयक राज्य सभा सदस्यांचा प्रवर समितीकडे संदर्भित करण्यात आले होते. प्रवर समितीने त्यांचा अहवाल दिनांक ३० जुलै, २०१५ रोजी राज्य सभेस सादर

केला आहे. सदर प्रस्तावित अहवालातील प्रारुप विधेयकातील कलम ९२ नुसार महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) अधिनियम, २०१२ निरसित करण्याची तरतूद आहे. परंतु सदर विधेयक मंजूर झालेले नसल्याने व सद्य:स्थिती महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) अधिनियम, २०१२ अस्तित्वात असल्याने केद्राच्या प्रस्तावित विधेकातील तरतूदीचा राज्याच्या अधिनियमावरील परिणामाचा प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

-----------------

u

**परभणी मनपाच्या ताब्यातील शासकीय जमिनीवर भूमाफियांनी अतिक्रमणे केल्याबाबत**

u

**(७८) * ३४७४८ uडॉ.राहूल पाटील (परभणी)ी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

१.परभणी शहरातील मोक्याच्या जागेवरील गट नं. ३२५ मधील १२ गुंठे, गट नं. ३२६ मधील १४ गुंठे गट नं. ३२७ मधील ३० गुंठे अशा एकून ५६ गुंठे परभणी महानगरपालिकेच्या ताब्यातील शासकीय जमिनीवर भूमाफियांनी अतिक्रमणे केली आहेत, हे खरे आहे कायय

२.असल्यास, या संदर्भात आंदोलन करण्याचा इशारा विविध संस्थांनी माहे ऑगस्ट २०१५ मध्ये जिल्हाधिकारी, परभणी यांना दिला आहे, हे ही खरे आहे कायय

३. असल्यास,सदर अतिक्रमणे त्वरित काढण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे?

४. नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

(४) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

-----------------

u

**लोणार सरोवर (जि.बुलढाणा) परिसरातील अतिक्रमित पांप्रा डोळे रोडवर एकात्मिक गृहिनिर्माण प्रकल्प बंद असल्याबाबत**

u

**(७९) * ३१९७५ uडॉ.संजय रायमुलकर (मेहकर)र:** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार सरोवर (जि.बुलढाणा) परिसरातील अतिक्रमित भोगवटदारांसाठी येथील पांप्रा डोळे रोडवर केंद्र, राज्य आणि नगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या एकात्मिक गृहनिर्माण प्रकल्पाचे काम माहे सप्टेंबर, २०१५ पासून बंद पडले

आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गृहप्रकल्पांचे काम बंद असण्याची कारणे काय आहेत तसेच यांस जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, या गृहप्रकल्पाचे काम केव्हापासून सुरु करण्याचे शासनास अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u
**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) लोणार येथील आयएचएसडीपी प्रकल्पातील टप्पा क्र. १ मधील घरकुलांचे बांधकाम सुरु आहे. टप्पा क्र. २ मधील घरकुलांचे बांधकाम मागील एका महिन्यापासून बंद आहे. दिनांक ३०.९.२०१५ रोजी जिल्हाधिकारी बुलडाणा यांनी सदर ये ाजनेबाबत आढावा बैठक आयोजित करुन योजनेचा आढावा घेतला आहे व कामाची गती वाढवून प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने संबंधित कंत्राटदार व PMC यांना निर्देश दिलेले आहे.

केंद्र शासनाने सदर प्रकल्प पुर्ण करण्यास ३१ मार्च २०१७ पर्यंत मुदत वाढ दिलेली असून सदर कालावधीत प्रकल्प पुर्ण होईल असे मुख्याधिकाऱ्यांनी कळविले आहे.

-----------------

u

**भिवंडी महापालिकेवर ठेकेदारांची देणी व विविध योजनेअंतर्गत कर्ज असल्याबाबत**

u
**(८०) * २९२८२ uश्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर)र:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) भिवंडी महापालिकेला सद्य:स्थितीत ठेकेदारांची देणी २०० कोटी रुपये असून महापालिकेच्या विविध योजनेकरीता सुमारे १५० कोटी कर्ज घेतले असल्याने सुमारे २८१ कोटी रुपयांचे महापालिकेवर कर्ज असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आर्थिक डबघाईला आलेल्या या महापालिकेला विकासकामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक ३१.०३.२०१५ अखेरपर्यंत प्रलंबित देयकाची रक्कम रुपये १५६.८९ कोटी आहे. महानगरपालिकेने घेतलेल्या कर्जाचा तपशिल खालील प्रमाणे आहे:-

- मंजूर कर्ज रक्कम-१९६.८९ कोटी
- प्राप्त कर्ज -१७२.७४ कोटी
- परतफेड केलेले कर्ज (मुद्दल) - ५९.१५ कोटी
- परतफेड केलेले व्याज-६०.७३ कोटी
- शिल्लक कर्ज (मुद्दल)- ११३.५८ कोटी

(२) भिंवडी निजामपुर शहर महानगरपालिका विविध योजनांतर्गत उपक्रमासाठी अनुदान नियमितपणे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

-----------------

u

**कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील टीडीआर घोटाळा व अनाधिकृत बांधकामा बाबत**

u

**(८९) * २८९७८ uश्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण), श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग)ग:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u

(१) ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील टीडीआर घोटाळा व अनाधिकृत बांधकाम या प्रकरणी नगररचना विभागाने दि . ०६/१२/२०१३ व दि . ०४/१/२०१४ रोजी शासनास अहवाल सादर केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने सु-मोटो जनहित याचिका दाखल करून संबधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यास शासनास आदेश निर्गमित केले आहे, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, तत्कालीन मुख्य अधिकारी श्री. भालचंद्र गोसावी यांच्यावर कारवाई करून त्यांची बदली करण्यात यावी यासाठी लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी शासनास विनंती केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तत्कालीन मुख्य अधिकारी यांच्या भ्रष्ट व गैरमार्गाच्या बेहिशोबी मालमत्तेची शासनाने चौकशी केली आहे काय तसेच अहवालानुसार संबधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) होय.
(३) तत्कालिन मुख्याधिकारी श्री.भालचंद्र गोसावी यांच्यावर कारवाई करुन त्यांची बदली करणेबाबत लोकप्रतिनीधी यांनी शासनास विनंती करणेबाबतचा अभिलेख नगर विकास विभागाकडे उपलब्ध नाही. तथापि, त्यांची बदली शासनाने केली आहे.
(४) सदर अधिकाऱ्यांवर उचित कारवाई करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भ् ावत नाही.

-----------------

u

**उस्मानाबाद जिल्हयात ग्रामपंचायत निवडणूकीच्या कारणावरुन ९ जणांना केलेली जबर मारहाण**

u

**(८२) * ३०३८४ uश्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) ।:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) उस्मानाबाद जिल्हयात ग्रामपंचायत निवडणूकीच्या कारणावरुन दिनांक ३१ जुलै, २०१५ रोजी दलिताना जबर मारहाण केल्याने ९ जण जखमी झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी बेंबळी पोलीस ठाण्यात १५ जणांविरुध्द ट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मारहाण करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) होय.
(३) चौकशीमध्ये आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना ग्रामपंचायत मतदानावर बहिष्कार न टाकता आरोपीच्या पॅनलला मतदान करण्याच्या कारणावरुन जबर मारहाण करुन खून करण्याचा प्रयत्न केल्याचे निष्पन्न झाले आहे. या संबंधात पोलीस ठाणे बेंबळी गुरनं. ८०/२०१५ कलम ३(१)(१०) अनूसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा व कलम ३०७, १४३, १४७, १४९, ३२४, ३२३, ५०४, ५०६, १७१(फ), ४२७ भा.दं.वि. व कलम १३५ मुंकोपा प्रमाणे दि. १.८.२०१५ रोजी आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीविरुध्द दोषारोपपत्र मा.न्यायालयात दाखल करण्यात आला असून, गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्‌भ् ावत नाही.

-----------------

## नागपूर विभागातील अप्पर सह कामगार आयुक्त यांनी अनाधिकृतरित्या प्रतिनिधीक मंडळाची बैठक आयोजित केल्याबाबत

**(८३) * ३६१८७ uडॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर)र:** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) नागपूर विभागातील अप्पर सह कामगार आयुक्त, श्री.अनिल लाकसवार यांनी अनधिकृतरित्या दिनांक २९/१०/२०१५ ला प्रतिनिधीक मंडळाचा कार्यकाळ संपल्याने प्रातिनिधिक मंडळाची बैठक आयोजित करण्याचे आदेश काढले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,शासन निर्णयानुसार दिनांक १८ ऑगस्ट, २०११ रोजी प्रातिनिधीक मंडळ रद्द करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री. अनिल लाकसवार यांनी मागील अनेक वर्षापासून शासनाची दिशाभुल करुन अनेक प्रकारच्या आर्थिक अनियमितता केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास श्री. अनिल लाकसवार यांचा संदर्भात विभागीय स्तरावर अनेक विभागीय चौकश्या प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास श्री. अनिल लाकसवार यांना सेवेतून बडतर्फ करण्याबाबत शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) मा.उच्च न्यायालय, नागपूर येथे दाखल याचिका क्र. ४३२३/२०१२ मध्ये मा.न्यायालयाने दि.१/१०/२०१५ रोजी दिलेल्या आदेशानुसार नागपूर व वर्धा जिल्हा माथाडी मंडळाने उक्त आस्थापनेतील कार्यरत माथाडी कामगारांच्या मजूरी दरात सुधारणा करण्याबाबत सर्व संबंधितांची बैठक आयोजित केली होती.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) श्री. लाकसवार यांच्या विरुध्द आर्थिक अनियमिततेच्या कारणास्तव कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित नाही.

(५) प्रश्न उद्भ् ावत नाही.

(६) प्रश्न उद्भ् ावत नाही.

-----------------

## मिरा रोड ( जि.ठाणे) येथे पत्रकारांची झालेली हत्या

**(८४) * २८६३१ uश्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) ी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) ?मिरा-भाईंदर शहरात रात्रभर चालणाऱ्या आर्केस्ट्रा बारवर पोलिसांनी दि.१६ जुलै,

२०१५ रोजी टाकलेल्या धाडीचे वृत्त संकलन करण्याकरिता गेलेल्या तिघा पत्रकारांवर हल्ला करुन त्यांना बेदम मारहाण करुन रस्त्यावर फेकले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घटनेची चौकशी करण्याकरिता वरील पत्रकारांना पोलिसांनी रात्रौ २ वाजता मिरा रोड पोलीस स्टेशनला बोलावून घेतले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलिसांना माहिती देऊन सदर पत्रकार पहाटे दोन वाजता घरी जात असताना पोलीस स्टेशनपासून जवळच त्यांच्यावर हल्ला करुन खून करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी पोलीसांनी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पत्रकारांना मारहाण झाल्याचे खरे आहे.
(२) नाही.
(३) सदर पत्रकार हे स्वत:हून मिरारोड पोलीस ठाण्यात आले होते. त्यानंतर ते जेवण करण्यासाठी मिरा रोड पोलीस ठाणे येथून रिक्षातून वेस्टर्न हॉटेल येथे जात असताना त्यांना मारहाण करुन ठार मारले.
(४) विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र यांनी आदेशीत केल्याने सदर प्रकरणांची चौकशी करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी दोन गुन्हे दाखल असून पत्रकारांना मारहाण केल्याबाबत मिरारोड पोलीस ठाणे येथे गुरनं. ३०३/२०१५, भांदवि. कलम ३९५, ३०७, ३३६, ३६३, ३४२, ३२३,५०४, ५०६, प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर प्रकरणी आरोपीतांविरुध्द मा.न्यायालयात केस क्र. १५३७/२०१५, दि. १३/१०/२०१५ रोजी दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

पत्रकार यांच्या खूना संदर्भात मिरारोड पोलीस ठाणे येथे गुरनं ३०४/२०१५ भादंविसंक ३०२, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल असून गुन्ह्यातील चार अटक आरोपीतांविरुध्द मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भ् ावत नाही.

-----------------

**जळगांव येथील निलंबीत पोलिस निरीक्षकाने आत्महत्या केल्याबाबत**

**(८५) * २८४९१ uश्री.अनिल कदम (निफाड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) ी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) रामनंद नगर पोलीस ठाणे (जि.जळगांव) येथील निलंबित पोलीस निरिक्षक अशोक सादरे यांनी नाशिक येथील राहत्या घरी वरीष्ठ अधिका-यांच्या छळाला कंटाळून दिनांक १६ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास गळफास घेऊन आत्महत्या केली आहे, खरे आहे काय,
(२) असल्यास, आत्महत्या करण्यापूर्वी त्यांनी लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये आत्महत्येला

जबाबदार असणा-यांची नावे नमूद केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,शासनाने सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आत्महत्येला जबाबदार असणा-यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :**
(१) होय,
(२) होय,
(३) होय,
प्राप्त फिर्यादीवरुन संबंधित पोलीस अधीक्षक, जळगांव पोलीस निरिक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव व वाळू ठेकेदार प्रतिनिधी, रा. जळगाव यांचे विरुध्द पंचवटी पोलीस स्टेशन, नाशिक शहर येथे गु.र.नं. ४५८/२०१५, भा.दं.वि. कलम ३०६, ३४ प्रमाणे दि १७/१०/२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

**मुंबई मनपा शाळांमध्ये सव्वा लाख अल्पसंख्याक आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित रहावे लागत असल्याबाबत**

**(८६) * २९६५८ u श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) I:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u(१) मुंबई मनपा शाळांमध्ये इंटरनेटची जोडणी नसल्याने तब्बल सव्वा लाख अल्पसंख्याक आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे. हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागासवर्गीय, अनुसूचित जाती-जमाती, अल्पसंख्याक, दारिद्र्यरेषेखालील, सफाई कामगारांची मुले, इतर मागासवर्गीय तसेच आदिवासी मुले अशा विविध सात प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी तसेच चांगली वर्तणूक असलेल्या विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्ती दिली जाते मात्र गेल्या काही वर्षांपासून या शिष्यवृत्तीपासून पालिकेच्या शिक्षण विभागामार्फत अर्जच पाठविले नसल्याने संबंधित घटकांतील विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

-----------------

u

**अकोला शहरातील टिळक रोड येथील त्रिवेणीश्वर कॉम्प्लेक्समध्ये असलेल्या शासकीय आदिवासी मुलांच्या वसतिगृहात अवैध धंदे सुरु असल्याबाबत**

u

**(८७) * ३५१२२ uश्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम)म:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) अकोला शहरातील टिळक रोड येथील त्रिवेणीश्वर कॉम्प्लेक्समध्ये असलेल्या शासकीय आदिवासी मुलांच्या वसतिगृहात गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींचा संचार वाढला असून इमारतीच्या पायऱ्यांवर मद्यपान करुन तेथेच अस्वच्छता पसरवित आहेत तसेच विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला असून पोलीस प्रशासनाने योग्य कारवाई करण्याची मागणी वसतिगृहाचे गृहपाल यांनी एका निवेदनाव्दारे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी अवैध धंदे सुरु असून ते रोखण्यासाठी पोलीसांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस स्टेशन रामदास पेठ, अकोला येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अचानकपणे छापा घातला असता, सदर ठिकाणी जुगार खेळणारे इसम अथवा दारु पिणारे इसम त्रिवेणीश्वर कॉम्प्लेक्स येथे आढळून आले नाहीत. असे इसम आढळून आल्यास पोलीस स्टेशन रामदास पेठ येथे तात्काळ संपर्क साधण्याबाबत गृहपालांना निदेश देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

-----------------

**दोंडाईचा जि.धुळे नगरपालिकेच्या एकात्मीक गृहनिर्माण योजनेतंर्गत घरकुल बांधकामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(८८) * ३४०६७ uश्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) I:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) दोंडाईचा जि.धुळे नगरपालिकेच्या माध्यमातून राबविण्यात आलेलया एकात्मीक गृहनिर्माण योजनेतंर्गत झालेल्या घरकुलांच्या कामांत प्रचंड गैरव्यवहार झाल्याने त्याबाबत चौकशी करण्यासाठी मा.आयुक्त महापालिका, नाशिक यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी चौकशी करुन सदरील चौकशी अहवाल ३ महिन्याच्या आत शासनास सादर करण्याचे संबंधीत चौकशी अधिका-यांना सूचना देण्यात आल्या

होत्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय, असल्यास त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) सदर चौकशी अहवाल अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही. तथापि, आवश्यक तो परिपुर्ण अहवाल सादर करण्याबाबत आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांना दि. १५.१०.२०१५ तसेच दि.३१.११.२०१५ च्या पत्रान्वये पुन्हा सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

**मुंबईतील के.ई.एम.हॉस्पिटल मधील हृदयरोग न न्युरोसर्जरी विभाग बंद असल्याबाबत**

u

**(८९) * ३२८१८ uश्री.योगेश सागर (चारकोप), श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.वैभव नाईक (कुडाळ)ळ:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) मुंबईत के.ई. एम व सायन या रुग्णांलयांमध्ये हृदयरोग व न्युरोसर्जरी रुग्णांवर चांगले उपचार होत असल्याने राज्यातून व परराज्यातूनही गरीब रुग्ण येथे उपचारासाठी येत असून सध्या के.ई. एम रुग्णालयातील हृदयरोग व न्युरोसर्जरी विभाग बंद असल्याचे दिनांक १६ सप्टेंबर, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हृदयरोग व न्युरोसर्जरी विभाग लवकर सुरु करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबईतील के.इ.एम. रुग्णालयातील हदयरोग व न्युरोसर्जरी विभाग बंद नव्हते . तथापि हदयरोग शल्यचिकित्साशास्त्र विभागातील ऑपरेशन थियटर्स डागडुजीच्या कामासाठी दिनांक ०७.०९.२०१५ ते २२.०९.२०१५ पर्यंत बंद ठेवण्यात आले होते.

तसेच न्युरोसर्जरी विभागातील ऑपरेशन थियटर्स एसी प्लांट नुतनीकरणाच्या कामाकरिता दिनांक ०६.०९.२०१५ ते २९.०९.२०१५ पर्यंत बंद ठेवण्यात आले होते.
(२) सदर रुग्णालयातील हदयरोग शल्सचिकिस्ताशास्त्र विभागातील ऑपरेशन थियर्टसच्या डागडूजीचे काम झाल्यानंतर ऑपरेशन थियटर्स दिनांक २३ सप्टेंबर, २०१५ रोजी सुरु करण्यात आले आहेत.

तसेच सदर रुग्णालयातील न्यरोसर्जरी ऑपरेशन थियटर्स दिनांक २० सप्टेंबर, २०१५ पासून सूरू करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

-----------------

**मुंबई महानगर पालिकेच्या डेब्रिज घोटाळयाची चौकशी करण्याबाबत**

u

**(९०) * ३७७७८ uश्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली) ि:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(१) मुंबई महापालिकेच्या रस्ते विभागाने काढलेल्या निदेशनानुसार विभागातील जंक्शन दुरुस्ती करतांना एक लाख ब्रास डेब्रिज निघण्याचे गृहित धरण्यात येवून त्याची विल्हेवाट लावण्यासाठी पालिकेच्या घनकचरा विभागातंर्गत येणाऱ्या सिंमेट कॉंक्रीट न्ड डेब्रिज (सी न्ड टी) विभागाची परवानगी घेणे आवश्यक असून त्यासाठी महानगर पालिकेला पैसे अदा करावे लागतात तसेच शासनाला स्वामित्व धन द्यावे लागते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील प्रक्रिया टाळून ठेकेदार (सी न्ड टी) विभागाची परवानगी न घेताच या डेब्रिजची परस्पर विल्हेवाट लावत असल्याची बाब ऑक्टोबर २०१५ च्या सुमारास निदर्शनास येवून त्यामुळे ठेकेदारांनी महानगर पालिकेचे सुमारे ३०० कोटी रुपयाचे नुकसान केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, असेच प्रकार शहराच्या अन्य विभागातही चालू असून घोटाळयाची रक्कम हजारो करोडोच्या घरात जाते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास सदर प्रकरणी शासनाने उच्चस्तरीय चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रस्ते विभागाने काढलेल्या निर्देशानुसार रस्ते विभागातील जंक्शन दुरुस्ती करतांना आवश्यकतेनुसार आणि फॉर्मेशन लेव्हलनुसार डेब्रिज निघण्याचे गृहीत धरले जाते. सदर डेब्रिजची विल्हेवाट लावण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा विभागाची परवानगी घेण्यात येते. यासाठी महानगरपालिकेला पैसे अदा करावे लागत नाहीत.

तसेच शासनाला स्वामित्व धन महानगरपालिकेने द्यावे लागत नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

-----------------

**नवी मुंबईतील सिडको, नवी मुंबई महानगरपालिका आणि एमआयडीसी यांच्या जमीनीवरील अनधिकृत बांधकामांबाबत**

**(९१) * ३५३३० u श्री.सदा सरवणकर (माहिम), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) नवी मुंबईतील सिडको, नवी मुंबई महानगरपालिका आणि एमआयडीसी यांच्या जमीनीवर किती अनधिकृत बांधकामे करण्यात आली आहेत याचे सर्वेक्षण करण्याचे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाने दि.०८/०९/२०१५ रोजी वा त्यासुमारास सदर तिन्ही प्राधिकरणांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने किती अनधिकृत बांधकामे आतापर्यंत करण्यात आली आहेत व ती निष्कासित करण्याच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(३) अद्याप मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,

(२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे हद्दीतील ९० इमारती निष्कासित करण्याचे मा. उच्च न्यायालयाचे आदेश आहेत त्यातील ७४ इमारतींबाबत नोटीस बजावण्यात आल्या आहेत. बिंदू माधव नगर, दिघा येथील ४ इमारतींचे बांधकाम तसेच दिघा (पूर्व) भागातील ३ इमारती व लगतचे वाणिज्य गाळे निष्कासित करण्यात आले असून पुढील निष्कासनाची कार्यवाही मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार केली जात आहे.

(३) कार्यवाही सुरु असल्याने विलंब झालेला नाही.

-----------------

**ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत असलेल्या पोलीस वसाहती धोकादायक असल्याबाबत**

**(९२) * २९६३२ u प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) ी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत पोलीसांच्या ३१ वसाहती असून, त्यामध्ये सुमारे ३५०० अधिकारी-कर्मचारी यांची कुटूंबे राहत असून त्यापैकी ४० टक्के पोलीस वसाहती धोकादायक असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१५ च्या पाहणीत आढळून आल्याने मोठ्या प्रमाणात पडझड झालेल्या वसाहतीतील ६३ पोलीस कुटूंबाचे संक्रमण शिबिरात स्थलांतर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, तसेच चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) ठाणे पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रातील कोपरी येथील ७२ निवासस्थानाची इमारत, वर्तकनगर येथील इमारत क्र. ५७ व कोर्टनाका इमारत क्र. २ या इमारतीचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पाहणी करुन स्ट्रक्चर ऑडीट करण्यात आले असून पाहणीमध्ये इमारती धोकादायक घोषित केल्याने तेथील ६३ पोलीस कुटुंबाची निवासस्थाने रिक्त करुन त्यांची अन्य ठिकाणी निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे,

सदर ठिकाणी नवीन निवासस्थान बांधणेचा प्रस्ताव आहे,

(३) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

-----------------

u

**नाशिक येथील सातपूर औद्योगिक वसाहतीतील ड्रेनेजची सफाई करताना दोन कामगारांचा मृत्यू व एक कामगार गंभीर जखमी झाल्याबाबत**

u

**(९३) * ३२८६६ uश्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम)म:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) नाशिक येथील सातपूर औद्योगिक वसाहतीतील एका कंपनीच्या शौचालय टैंकची सफाई करतांना ड्रेनेजमध्ये पडून दिनांक ५ सप्टेंबर, २०१५ रोजी दोन कामगारांचा मृत्यू झाला व एक कामगार गंभीर जखमी झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन मृत कामगारांच्या व गंभीर जखमी महिलाच्या कुंटुंबियांना कोणती आर्थिक मदत देण्यात आली आहे तसेच कामगारांच्या सुरक्षिततेसाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,

(२) सदर घटनेची महानगरपालिकेकडून सखोल चौकशी करण्यात येत आहे, तसेच महानगरपालिकेच्या मृत कर्मचाऱ्यांच्या वारसास महानगरपालिकेत सफाई कामगार या पदावर नेमणूक देण्यात आली असून, त्यांना कामगार कल्याण निधीतून रु. ५००००/- आर्थिक मदत देण्यात आलेली आहे,

सदर घटनेतील अन्य मृत कामगाराच्या वारसांना आर्थिक मदत करण्याचे व गंभीर जखमी कर्मचाऱ्यांच्या खाजगी दवाखान्यातील औषधोपचाराच्या खर्चासाठी मदत करण्याचे महानगरपालिकेकडून प्रस्तावित आहे,

तसेच सदर घटनेतील गंभीर जखमी कर्मचारी महिला नसून पुरुष कर्मचारी आहे,

महानगपालिकेमार्फत आरोग्य विभागाकडील शौचालय टाकी साफ करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येऊन सुरक्षितेतची साधने पुरविण्यात आलेली आहेत,

(३) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

-----------------

u

**मंत्रालयात विविध विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांची एक हजारापेक्षा जास्त पदे रिक्त असल्याबाबत**

u

**(९४) * ३२७६० uश्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.विजय औटी (पारनेर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस)स:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) राज्याचे मुख्यालय असलेल्या मंत्रालयात विविध विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांची एक हजारापेक्षा जास्त पदे रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रिक्त पदांमुळे मंत्रालयाचा कारभार प्रभारी अधिकारी/कर्मचारी यांचे मार्फत करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रिक्त पदांमुळे प्रशासकीय कामकाजावर परिणाम होत असल्याने मंत्रालयातील सर्व पदे तातडीने भरणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मंत्रालयीन विभागातील अधिकारी व कर्मचा-यांच्या पदांबाबत दिनांक ०१.०९.२०१५ रोजीचे माहितीनुसार अधिकारी व कर्मचारी यांची १,०९३ पदे रिक्त होती, हे खरे आहे.
(२) रिक्त पद पदोन्नतीने अथवा सरळसेवेने भरण्यात येते. दरम्यानच्या कालावधीत आवश्यकतेनुसार रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार कार्यरत अधिका-यांना/कर्मचा-यांना देऊन कामकाज पार पाडले जाते, हे खरे आहे,
(३) सरळसेवेची रिक्त पदे भरण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून कार्यवाही सुरु आहे. तसेच पदोन्नती कोटयातील पदे भरण्यासाठी निवडसूची तयार करुन रिक्ततेनुसार पदोन्नत्या देण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भ् ावत नाही.

-----------------

u

**uचाकण क्लस्टर मॉडेलल अंतर्गत एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन करणेबाबत**

u

**(९५) * २८७३१ uश्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) ी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u(१) खराबवाडी आणि बिरदवडी (ता. खेड, जि. पुणे) येथिल गावकरी आणि

ग्रामपंचायतीने चाकण-आंबेठाण रस्त्यावरील दगड खाणीत राजगुरुनगर आणि चाकण नगरपरिषदेचा कचरा टाकण्यास माहे ऑक्टोबर २०१५ मध्ये विरोध केल्याने शहराच्या रस्त्यालगत कचरा जमा होऊन दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला होता, हे खरे आहे काय,

(२)२चाकण क्लस्टर मॉडेलल अंतर्गत एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन करणेबाबत मा. जिल्हाधिकारी, पुणे यांस स्थानिक लोकप्रतिनिधीने दिनांक १ जून,२०१५ रोजी निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) खराबवाडी आणि बिरदवाडी येथील ग्रामस्थांनी दगड खाणीमध्ये कचरा टाकण्यास विरोध केला होता. तथापि, याबाबत सर्व संबंधितांचा विचार विनियम होऊन कचरा चाकण-आंबेठाण रस्त्यालगत मौजे खराबवाडी गट नं. ३५७ येथील खाजगी मालकीच्या खाणीमध्ये टाकण्यात येत आहे.

सदर खाणी लगत तसेच शहरालगत दुर्गंधी पसरु नये म्हणून संबंधित नगरपरिषद यांनी आवश्यक उपाययोजना केल्या आहेत.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. २२/५/२०१५ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांना निवेदन दिले आहे.

(३) शासन निर्णय , पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दि.२६/८/२००३ मधील तरतूदीनुसार जिल्हास्तरावर गठीत करण्यात आलेल्या समिती समोर सदरचा प्रस्ताव ठेवून घन कचरा व्यवस्थापनेची जागा निश्चित करावी लागेल व जागा निश्चितीकरणानंतर प्रस्तावातील तांत्रिक मुद्यांची पडताळणी करुन पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

-----------------

## जालना जिल्ह्यातील भोकरदन रोडवरील राजलक्ष्मी ग्रोटेक इंडिया प्रा.लि. या खताच्या कारखान्यात स्फोट झाल्याबाबत

**(९६) * ३३५७७ uश्री.अर्जुन खोतकर (जालना) ः** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) जालना जिल्ह्यातील भोकरदन रोडवरील राजलक्ष्मी ग्रोटेक इंडिया प्रा.लि. या खताच्या कारखान्यात दिनांक २३ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या सुमारास वेल्डिंग करतांना अचानक स्फोट झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्फोटात किती कामगार ठार व किती कामगार जखमी झाले,

(३) असल्यास, या स्फोटाची कारणे काय आहेत, स्फोटास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, या स्फोटातील मृतांच्या नातेवाईकांना व जखमींना आर्थिक मदत करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. प्रकाश मेहता :**
(१) होय.

मे.राजलक्ष्मी ग्रोटेक इंडिया प्रा.लि. (गट नं.७६, गुंडेवाडी भोकरदन रोड, जि.जालना) या खताच्या कारखान्यात दिनांक २३ ऑगस्ट, २०१५ रोजी लोखंडी टाकीवरील कटींग/वेल्डींगचे काम सुरु असताना अचानक स्फोट झाला, हे खरे आहे.

(२) सदर स्फोटात २ कामगार मृत पावले व १ कामगार जखमी झाला.

(३) सदरचा स्फोट हा ज्या टाकीवर वेल्डींग/कटींगचे काम सुरु होते त्या टाकीच्या तळाशी असलेल्या सल्फ्युरीक सिडचा संपर्क लोखंडी टाकीशी आल्यामुळे त्या भागात हायड्रोजन वायूची निर्मिती झाली व तो वायू वेल्डींग /कटींगच्या उष्णतेच्या संपर्कात येऊन स्फोट झाला.

सदर प्रकरणी कारखान्याच्या भोगवटादारावर कारखाने अधिनियम, १९४८ चे कलम ७ (अ) २ (अ) च्या भंगाबाबत जालना येथील मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात फौजदारी खटला क्र.२२००/२०१५, दिनांक १९.११.२०१५ रोजी दाखल केला आहे.

(४) व (५) दोन्ही मृत कामगारांच्या कायदेशीर वारसदारास नुकसानभरपाईची रक्कम अ.क्र.८,८३,०००/- व ७,३५,०००/- रुपये मा.श्रमिक नुकसान भरपाई, नांदेड यांच्या न्यायालयात दिनांक ०६.११.२०१५ रोजी जमा करण्यात आली आहे. तसेच जखमी कामगाराच्या औषधोपचारासाठी कारखान्याच्या व्यवस्थापनाने रुपये ८,३४,०००/- इतका खर्च केला आहे. सदर जखमी कामगारास कोणतेही अपंगत्व नाही.

-----------------

u

**कल्याण महापालिका क्षेत्रातील चिकणघर येथील एका आरक्षित भूखंडावर अतिक्रमण असतानाही बांधकाम व्यावसायिकांस शंभर टक्के विकास हक्क हस्तांतरण दिल्याबाबत**

u

**(९७) * ३०६७४ uश्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.विजय औटी (पारनेर)रः** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) कल्याण महापालिका क्षेत्रातील चिकणघर येथील एका आरक्षित भूखंडावर अतिक्रमण असतानाही त्यांकडे दुर्लक्ष करुन बांधकाम व्यावसायिकांस शंभर टक्के विकास हक्क हस्तांतरण (टीडीआर) देण्याच्या प्रकरणात सुमारे १२५ कोटीं रूपयाचा घोटाळा झाल्याचे उघडकीस आले असल्याने सदर प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची घोषणा पावसाळी अधिवेशनात नगरविकास राज्यमंत्री यांनी केली असल्याची बाब दिनांक २३ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या दरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी पूर्ण झालेली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत दोषी आढळलेल्या अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात

आलेली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u
**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अंशत: खरे आहे, रहिवास विभागात समाविष्ट क्षेत्राच्या दिलेल्या हस्तांतरणीय विकास हक्कामध्ये अनियमितता झालेली असल्याने याबाबत उचित कार्यवाही करणेबाबत व असा हस्तांतरणीय विकास हक्क प्रदान करण्याच्या प्रकरणांमध्ये समाविष्ट संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची चौकशी सुरु करण्यापुर्वी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याची कार्यवाही करावी, असे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांना तसेच या प्रकरणामध्ये समाविष्ट तत्कालिन आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका व तत्कालीन सहाय्यक संचालक, नगर रचना, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचे संदर्भात संबंधित विभागास कळविण्यात आलेले आहे,
(३) कारणे दाखवा नोटीस बजावण्याची कार्यवाही सुरु आहे,
(४) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

-----------------

u

### उल्हासनगर पालिकेतील तत्कालीन नगररचनाकार यांनी नियम बाह्य पद्धतीने दिलेल्या बांधकामांना मंजुरीबाबत

u
**(९८) * २८७९२ uडॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ)थ:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) उल्हासनगर पालिकेतील तत्कालीन नगररचनाकार श्री. प्रल्हाद होगे पाटील यांनी महानगरपालिकेच्या सेवेत कार्यरत असताना सन २०१२-१४ या कालावधीमध्ये नियम बाह्य पद्धतीने करण्यात आलेल्या ३० ते ५० बांधकामांना मंजुरी दिल्या बाबतची चौकशी करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी मा.राज्यमंत्री, नगरविकास यांना दि. १७ जुलै,२०१५ रोजी निवेदन दिल्यानंतर सदर प्रकरणी चौकशी करून अहवाल सादर करावा असे आदेश आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांना दिले आहेत, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास , सदर प्रकरणाची आयुक्तांनी चौकशी करून यासंबधीचा अहवाल मा. राज्यमंत्री, नगरविकास यांना सादर केला आहे काय,
(३) असल्यास, अहवालातील शिफारसी व निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार तत्कालीन नगररचनाकार यांच्यावर आतापर्यंत कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u
**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही. सदर प्रकरणी चौकशी सुरु आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी चौकशी पूर्ण झाल्यानंतर त्यामधील निष्कर्षानुसार कार्यवाही

करण्यात येईल.

-----------------

**पुणे तसेच पिंपरी-चिंचवड येथे मोठ्या प्रमाणावर बनावट मोबाईल फोन विकले जात असल्याबाबत**

**(९९) * ३२२९३ uडॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा) I:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) पुणे तसेच पिंपरी-चिंचवड येथे मोठ्या प्रमाणावर बनावट मोबाईल फोन विकले जात असल्याचे दिनांक १७ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी मोठ्या प्रमाणावर छापे मारुन सॅमसंग कंपनीचे बनावट मोबाईल तसेच सुटे भाग ही जप्त करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बनावट मोबाईल मुळे गुन्हेगारांचा शोध घेणे अशक्य होत असल्याने अशा मोबाईलचा उपयोग देशविघातक शक्ती करु शकतात हे लक्षात घेवून शासनाने याप्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

पुणे व पिंपरी चिंचवड येथे बनावट मोबाईल फोन विकल्याबाबत व बाळगल्याबाबत दोन गुन्हे दाखल आहेत.त

(२)

१) सदर प्रकरणी फिर्यादींनी केलेल्या तक्रारीवरुन खडक पोलीस स्टेशन येथे गु.र. क्र. २४६/२०१५ भा. द.वि. कलम ४०६,४२०,३४ कॉपीराईट क्ट कलम ५१,५३,५४ सह ६३, ट्रेड मार्क क्ट सन १९९९ चे कलम १०३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून दोन सॅमसंग कंपनीचे २७ पल कंपनीचे व एक सोनी कंपनीचा असा माल जप्त करण्यात आला असून सदर मोबाईल व्यवस्थापन सॅमसंग इंडिया पुणे यांच्याकडे तपासासाठी पाठविले आहे.

२) सदर प्रकरणी फिर्यादींनी दिलेल्या तक्रारीवरुन पिंपरी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ३१२७/२०१५ कॉफी राईट कायदा क्र. ५१,५२,५३,६४, व ट्रेडमार्क कायदा क्र.

१०३,१०४, प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर प्रकरणी तपासाअंती गॅलक्सी सव्हिसेस येथे कार्बन मोबाईल कंपनीचे एकूण रु. ८,४७,०१०/- इतक्या किंमतीचे एकूण ४९१ मोबाईल्स सापडले. या अनुषंगाने दोन आरोपींना अटक करण्यात आली असून सदर गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.
(३) बनावट मोबाईल बाळगल्याबाबत माहिती मिळाल्यास याबाबत तात्काळ कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भ् ावत नाही.

-----------------

u

**रायगड जिल्ह्यातील पनवेल येथे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे केंद्र सुरु करणेबाबत**

u

**(१००) * २८६०२ uश्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट)ट:** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील सुमारे २ लाख कामगारांना महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या विविध योजनांचे फायदे मिळण्यासाठी पनवेल येथे कामगार कल्याण मंडळाचे केंद्र सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑगस्ट २०१५ मध्ये मा. कामगार मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास रायगड जिल्ह्यातील उद्योगांमार्फत मिळणा-या करोडो रुपये निधीतून कामगारांना कोणतेच लाभ मिळत नाहीत,हे ही खरे आहे काय,य
(३) असल्यास, पनवेल जिल्ह्यातील कामगारांच्या कल्याणासाठी कामगार कल्याण मंडळाचे केंद्र सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,सविलंबनाची कारणे काय आहेत ?u

**श्री. प्रकाश मेहता :** (१) होय.
(२) हे खरे नाही, सद्या रायगड जिल्ह्यातील कामगार मंडळाच्या विविध उपक्रमांचा लाभ घेण्याकरिता ठाणे विभागातील ठाणे व चेंबूर येथील कामगार कल्याण केंद्राशी संपर्क साधतात. आतापर्यंत मंडळाच्या शिष्यवृत्ती योजना,असाध्यरोग सहाय्यता योजना, औद्योगिक व व्यावसायिक कामगारांसाठी नाट्यमहोत्सव, गुणवंत कामगार पुरस्कार इ. विविध योजनातून रायगड परिसरातील कामगारांनी लाभ घेतलेला आहे.
(३) विविध शासकीय कार्यालय तसेच सिडको व महाराष्ट्र राज्यमार्ग परिवहन महामंडळ यांच्याकडे केंद्र सुरु करण्यासाठी जागा मिळणेबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

u

**मूर्तिजापूर (जि.अकोला) पोलीस स्टेशनकरिता कर्मचा-यांची पदे वाढविण्याबाबत**

u

**(१०१) * २९७९८ uश्री.अमित झनक (रिसोड), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) ी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) मूर्तिजापूर (जि.अकोला) पोलीस स्टेशनच्या हद्दीत १६२ ग्रामीण क्षेत्र येत असून एक लक्ष ६० हजार अशी लोकसंख्या असलेल्या शहरातील पोलिस स्टेशनला १२० कर्मचा-यांची संख्या मंजूर असून केवळ ७० कर्मचा-यांवर सुरक्षेची जबाबदारी असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुर्तीजापूर पोलीस स्टेशन हद्दीत येणाऱ्या गावांची लोकसंख्या वाढत असल्याने पोलीसांच्या संख्येत वाढ करण्याबाबतची मागणी येथील ग्रामस्थांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुर्तिजापूर (जि. अकोला) पोलीस स्टेशनची एकूण मंजूर पदसंख्या ११२ असून त्यापैकी ७९ पदे कार्यरत असून, ३३ पदे रिक्त आहेत.

(२) होय.

(३) महाराष्ट्र राज्य पोलीस दलाच्या नविनिर्मित ६१४९४ पदनिर्मिती पहिल्या टप्यामध्ये पोलीस अधीक्षक, अकोला यांच्या आस्थापनेवर मूर्तिजापूर पोलीस ठाण्याचे विभाजन करुन नवीन मुर्तिजापूर ग्रामिण पोलिस ठाणे निर्माण करणेबाबत शासनाची मान्यता झ ााली असून त्याकरीता विविध शाखा व विविध संवर्गाकरीता एकूण ८२ पदे देण्यात आलेली आहेत, त्यानुसार लवकरच सदर पोलीस स्टेशन कार्यान्वित होणार आहेत,

(४) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

----------------

u

**औरंगाबाद महानगरपालिकेत प्रकल्प विभागात केंद्र शासनाच्या सुवर्ण् जयंती रोजगार योजना व राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत निधी वाटपात गैरव्यवहार झाल्याबाबत**

u

**(१०२) * ३२०६४ uश्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर)र:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) औरंगाबाद महानगरपालिकेत प्रकल्प विभागात केंद्र शासनाच्या सुवर्ण् जयंती रोजगार योजना व सध्याची राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत आलेल्या १४ कोटी रुपयांच्या निधी वाटपात मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार होऊन अपात्र व्यक्तींना निधीचे वाटप झाल्याची बाब दिनांक २२ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरवर्षी या योजनेंतर्गत ज्या बेरोजगारांना निधीचे वाटप केले जाते त्या लाभार्थ्यांची यादी जाहिर केले नसल्याचे आढळून आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिका व शासनातर्फे लाभार्थ्यांच्या तयार करण्यात आलेल्या यादीस विरोध करण्यात आलेल्या असंख्य तक्रारींची दखल न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यात दोषी असलेल्या कर्मचारी व अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक २३.८.२०१५ रोजीच्या दैनिक लोकमत या स्थानिक वर्तमानपत्रात या संदर्भात बातमी प्रसिध्द झाली आहे. तसेच या संदर्भात औरंगाबाद, महानगरपालिकेकडे तक्रारीही प्राप्त झाल्या आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) या प्रकरणाची चौकशी करून अहवाल सादर करण्याकरीता औरंगाबाद महानगरपालिकेचे अतिरीक्त आयुक्त व उपआयुक्त यांची दोन सदस्यीय समिती आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी गठीत केली असून, त्यांना तीन महिन्यात अहवाल सादर करण्यास कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

-----------------

## मुंबई शहर व उपनगरामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत वाटप झालेली सदनिका विक्रीबाबत

**(१०३) * २९३५३ uश्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) ी: नव:** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) मुंबई शहर व उपनगरामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत सदनिका वाटप करण्यात येते, सदरची वाटप करण्यात आलेली सदनिका १० वर्षापर्यंत विकता येत नसतानाही जर पात्र लाभार्थ्यांनी सदरची सदनिका १० वर्षापूर्वीच वैद्यकिय उपचारासाठी वा अन्य गरजेपोटी विकल्या असल्याची बाब शासनाच्या माहे डिसेंबर, २०१४ च्या

सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा प्रकारच्या विक्री केलेल्या सदनिका खरेदीदाराच्या नावावर होत नाही त्यामुळे खरेदीदाराची गैरसोय होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग २ च्या अनुषंगाने १० वर्षानंतर पात्र सदनिका धारक मिळत नाही या संदर्भात सदनिका नोंदणी संदर्भात सुधारित शासन निर्णय काढण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, गृहनिर्माण मंत्री, गृहनिर्माण राज्यमंत्री, सचिव, गृहनिर्माण विभाग व मुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांच्याकडे दिनांक २० ऑगस्ट, २०१५, १९ ऑगस्ट, २०१५, १० ऑगस्ट, २०१५, ११ ऑगस्ट, २०१५, २७ ऑगस्ट, २०१५ व २८ ऑगस्ट, २०१५, रोजी वा त्यासुमारास करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामधील काही झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमध्ये पात्र झोपडीवासीयांना वाटप केलेल्या पुनर्वसन सदनिका १० वर्षाच्या आत हस्तांतरीत झाल्याची प्रकरणे वेळोवेळी निदर्शनास आली आहेत.
(२) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पू.) अधिनियम १९७१ कलम ३ ई व बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली १९९१ विनियम ३३ (१०) परिशिष्ट- IV, उपकलम १.१८ च्या तरतूदी नुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पुनर्वसन सदनिका वाटप केल्यापासून १० वर्षापर्यंत कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करता येत नाही.
(३), (४) व (५) या विषयासंदर्भात मा. लोकप्रतिनिधींची दि. ८ जुलै, २०१५ आणि दि. ८, ११, १९, २७ व २८ ऑगस्ट २०१५ ची पत्रे प्राप्त झाली आहेत. त्यानुषंगाने शासन पत्र, गृहनिर्माण विभाग दि. ०४.११.२०१५ अन्वये मा. लोकप्रतिनिधींना वस्तुस्थिती अवगत करण्यात आली आहे.

-----------------

u

## पुणे शहरातील रस्ते व वाहतुक विकास प्रकल्पाबाबत

u

**(१०४) * ३०४०३ uश्री.अमर काळे (आर्वी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड)ड:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) पुणे येथे राष्ट्रीय मानकांनुसार शहरातील साधारण १३ टक्के क्षेत्र रस्ते विकासासाठी आवश्यक आहे, मात्र पुण्यासारख्या गजबजलेल्या शहरात हे क्षेत्र ६.५ टक्के इतके नगण्य आहे, त्यामुळे मेट्रो, मोनोरेल, बीआरटी,एचसीएमटीआर सारखे मोठे वाहतूक विकास प्रकल्पांना अडथळा निर्माण झाला असल्याचे माहे जुलै, २०१५ दरम्यान

निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील रस्ते व वाहतुक विकासाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u
**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

युआरडीपीएफआय-२०१५ (अर्बन अॅन्ड रीजनल डेव्हलपमेंट प्लान्स फॉर्म्युलेशन अँड इंम्प्लीमेंटेशन) च्या मार्गदर्शक तत्वानुसार वाहतूक व दळणवळण या प्रयोजनाकरिता एकुण क्षेत्राच्या १२% ते १४% क्षेत्र आवश्यक आहे.

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील एकुण क्षेत्राच्या सुमारे १३.३२% क्षेत्र वाहतूक व दळणवळण याकरिता प्रस्तावित करण्यात आले आहे. यापैकी सुमारे १०.४४% क्षेत्रावर रस्त्यांचे विकसन करण्यात आलेले आहे.

तसेच या विकास आराखड्यात २४ मी. रूंदीचा एच.सी.एम.टी.आर. (हाय कॅपॅसिटी मास ट्रान्झीट रूट) रस्ता प्रस्तावित केलेला आहे.

टप्पा क्र. १ मध्ये सुमारे ३१.२५ कि.मी. मेट्रो प्रस्तावित असून, त्यापैकी सुमारे ५.०५ कि.मी. जमिनीखालून व सुमारे २६.२० कि.मी. अस्तित्वातील रस्त्यावरुन प्रस्तावित आहे.

(२) पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अंतर्गत, मंजुर अर्थसंकल्पीय उपलब्ध तरतूदींनुसार व ताब्यात आलेल्या जागांच्या उपलब्धतेनुसार सुमारे २३०१ हेक्टर इतके रस्ता क्षेत्र आतापर्यंत विकसित झालेले आहे. तसेच पुणे शहरात आवश्यकतेनुसार विविध ठिकाणी उड्डाणपुल, भुयारी मार्ग, नदीवरील पुल आणि जे.एन.-एन.यु.-आर.-एम. अंतर्गत बी.आर.टी.मार्ग विकसित केले आहेत. त्याचप्रमाणे नव्याने पुणे मेट्रो आणि शहरांतर्गत वर्तुळाकार मार्गाचे विकसन प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्‌भ् ावत नाही.

-----------------

u

## पुणे शहरातील सायबर गुन्हेगारीत लक्षणीय वाढ झाल्याबाबत

u
**(१०५) * २९३१५ uडॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर)र:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) पुणे शहरातील सायबर गुन्हेगारीत लक्षणीय वाढ झाली असून डेबिट, क्रेडीट कार्डची माहिती घेऊन फसवणूकीची प्रकरणे वाढली असून ऑनलाइन खरेदीवेळी आयव्ही, पासवर्ड चोरीचे प्रकार वाढणे तसेच एटीएम कार्डचे क्लोनिंग करुन अनेकांना गंडा घालण्याचे प्रकारही माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सायबर गुन्ह्याबाबतच्या तक्रारीच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असून अनेक सायबर गुन्ह्यांचा तपास वर्षानुवर्षे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुण्यातील वाढत्या सायबर गुन्ह्यांना रोखण्यासाठी तसेच प्रलंबित सायबर गुन्ह्यांचा तपास निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

पुणे शहरातील डेबीट, क्रेडीट कार्डची माहिती घेऊन ऑनलाईन खरेदीवेळी आय.व्ही., पासवर्ड चोरी करून फसवणूक झालेले गुन्हे खालीलप्रमाणे

| सन २०१४ | | सन २०१५ | |
|---|---|---|---|
| प्राप्त | निर्गती | प्राप्त | निर्गती |
| ७३ | ३५ | ८२ | २५ |

सन २०१४ मध्ये एकुण ७३ गुन्हे दाखल झाले असून त्यापैकी ३५ गुन्हयात तपास करून/ आरोपी अटक करून गुन्हयांची निर्गती करण्यात आली आहे. u

सन २०१५ मधील दाखल ८२ गुन्हयांपैकी २५ गुन्हयात तपास करून/ आरोपी अटक करून गुन्हयांची निर्गती करण्यात आली आहे.

एकंदरीत सन २०१४ पेक्षा सन २०१५ मध्ये सायबर संबंधातील गुन्हयामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते.

(२) हे अंशत: खरे आहे.

पुणे शहरात पोलीस आयुक्तालयात डेबीट, क्रेडीट कार्डची माहिती घेऊन ऑनलाईन खरेदी, आय.व्ही. पासवर्ड चोरी करून फसवणूक संदर्भात सन २०१४ मध्ये ३८ गुन्हे तपासात प्रलंबित आहेत. तसेच सन २०१५ मधील ५७ गुन्हे प्रलंबित आहेत.

(३) पुणे शहरातील सायबर गुन्हयांना रोखण्यासाठी तसेच प्रलंबित गुन्हयांचा तपास करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते.

१. पोलीस उप आयुक्त आर्थिक व सायबर गुन्हे यांचे अधिपत्याखालील सायबर लॅब, शिवाजीनगर, मुख्यालय , पुणे शहर येथे सन २००७ पासून नॅसकॉम, DSCI, यांच्या

मदतीने सुरू करण्यात आला असून या ठिकाणी सायबर क्राईम लेव्हल-१ व २ चे ७१२३ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.
२. पुणे पोलीस आयुक्तालयातील अधिका-यासांठी विविध सायबर गुन्हयांच्या विषयावर कार्यशाळा आयोजित केल्या आहेत.
३. पुणे शहरातील वाय- फाय सिक्युरिटीच्या संदर्भात वॉरड्राईव्ह दरवर्षी घेण्यात येत असून वाय-फाय सुरक्षिततेबाबत नागरिकांना अवगत करण्यात येते.
४. सायबर सेल कडील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे मार्फत सायबर अवेरनेसबाबत व्याख्याने देण्यात आली आहेत.
५. जनतेस प्रिंटमिडीयाव्दारे, रेडिओवरील कार्यक्रमाव्दारे, शाळा कॉलेजसमध्ये विद्यार्थ्यांना व्याख्यानाव्दारे सायबर अवेरनेसबाबत प्रशिक्षण देवून जनजागृतीसाठी प्रयत्न केलेले आहेत.
६. सायबर गुन्हयांचा तपास पोलीस निरीक्षक दर्जाचे अधिका-यांकडून करण्यात येतो.
७. सायबर गुन्हे शाखा येथे प्रशिक्षित अधिकारी व कर्मचारी असून त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी सहायक पोलीस आयुक्त व पोलीस उपायुक्त दर्जाचे अधिकारी कार्यरत आहेत.
८. पोलीस स्टेशन पातळीवर सायबर गुन्हयांचा तपास करण्यासाठी पोलीस निरीक्षक (गुन्हे) वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचेसोबत कमीत कमी ३ ते ४ अधिकारी व पोलीस कर्मचारी यांना सायबर गुन्हयांचे तपासाबाबत प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.
९. सदर अधिकारी व कर्मचारी यांना तपासकामी सहाय्य करतात. सायबर लॅब येथे तज्ञ व्यक्तींची नेमणूक केलेली असून, गुन्हयाचे तपासकामी तपास अधिका-यांना मार्गदर्शन करण्यात येते.
४). प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

-----------------

### उरण तालुक्यातील सिडको विभागातील सेक्टर ५१ मध्ये राजरोस तिवरांच्या झाडांची कत्तल होत असल्याबाबत

**(१०६) * २८७१९ uश्री.मनोहर भोईर (उरण)ण:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण तालुक्यातील सिडको विभागातील सेक्टर ५१ मध्ये राजरोस तिवरांच्या झ ााडांची कत्तल होत असल्याने मोठ्या प्रमाणात तिवरांचे जंगल उध्वस्त झाल्यामुळे सन १९९८ मध्ये सिडकोने बांधलेले नाले खचल्याची तक्रार तेथील रहिवाश्यांनी सिडकोचे विभागीय कार्यकारी अभियंता यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे माहे ऑगस्ट, २०१५ व त्यापूर्वी अनेक वेळा केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सिडकोने बांधलेला नाला खचल्याची कोणतीही तक्रार सिडको विभागीय कार्यालयाकडे प्राप्त झाली नाही. परंतु दि. १०.८.२०१५ रोजीच्या विकास कामांच्या पहाणीदरम्यान अज्ञात इसमांनी २० मी. रुंद चॅनलच्या पात्रातील (अंदाजे १०० मी. लांब) खारफुटीच्या झाडांची अवैधरित्या तोडणी केली

असल्याची बाब लक्षात आल्यानंतर दि.१२.८.२०१५ रोजी कार्यालयीन पत्राव्दारे उरण पोलीस ठाणे व परिक्षेत्र वन अधिकारी उरण यांचेकडे तक्रार करण्यात आली आहे. तसेच अज्ञात इसमाविरुध्द गुन्हा दाखल करुन योग्य ती कारवाई करण्याची विनंती करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भ् ावत नाही.

-----------------

u

**राज्य राखीव दलातील ९२ पोलीस उपनिरीक्षकांच्या पदोन्नत्या प्रलंबित असल्याबाबत.**

u

**(१०७) * ३३४२८ uश्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर)र:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) राज्य राखीव दलातील तब्बल ९२ पोलीस उपनिरीक्षकांचे गोपनीय अहवाल गहाळ झाले असून कार्यालयीन गलथानपणामुळे अनेक वर्षांपासून पदोन्नती प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ९२ राखीव पोलीस उपनिरीक्षकांचे बढत्या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच सदर पदोन्नती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) राज्य राखीव दलातील पोलीस उपनिरीक्षकांचे वार्षिक गोपनीय अहवाल नस्ती गहाळ झालेल्या नसून,सदर गोपनीय अहवालाच्या आधारे सन २०१३-१४ च्या निवडसूचीकरीता रिक्त पदांचा विचार करुन २४ सशस्त्र पोलीस उपनिरीक्षकांना सशस्त्र पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे.त्यामुळे कोणत्याही प्रकारची चौकशी करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

u

**उल्हासनगर (जि.ठाणे)शहरात अनधिकृत बांधकामाबाबत**

u

**(१०८) * ३४२५४ uश्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर)र:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर शहरात मोठ्या प्रमाणात अवैधरित्या बांधकामे होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे

काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार उल्हासनगर शहरात अवैध बांधकामे होवू नयेत म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u
**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात काही ठिकाणी अनधिकृत बांधकाम सुरु असल्याबाबतच्या तक्रारी माहे आ ॅगस्ट, २०१५ मध्ये प्राप्त झ ााल्या आहेत. तसेच काही ठिकाणी अनधिकृत बांधकामे सुरु असल्याचे उल्हासनगर महानगरपालिकेकडून करण्यात आलेल्या पाहणीतून निदर्शनास आले आहे.
(२) व (३) उल्हासनगर शहरात झालेली अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यासाठी दिनांक ०१.१०.२०१५ पासून महानगरपालिकेने विशेष मोहिम सुरु केली असून या अंतर्गत आजपर्यंत सुमारे ६२००० चौ. फुट इतक्या क्षेत्रफळाची एकूण ३७ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भ् ावत नाही.

-----------------

u

**वांद्रे (पूर्व) येथील गांधी नगरात खेळाचे मैदान व माध्यमिक शाळेकरिता आरक्षित भूखंडावर एमआयजी क्लबने बांधकाम केल्याबाबत**

u
**(१०९) * ३२७३६ uश्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) ी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) वांद्रे (पूर्व) येथील गांधी नगरात खेळाच्या मैदानासाठी ७७५३ चौ.मी. व माध्यमिक शाळेकरीता १३२९ चौ.मी. चा भूखंड मुंबई महानगरपालिका व म्हाडा यांनी आरक्षित ठेवलेली असतांना सदर भूखंडावर एमआयजी क्लबने रेस्तरॉ, प्लाऊड नाईन बार, कॅफे टेरेस, ५ प्रकारचे बॅन्क्वेट हॉल तसेच विद्यापीठ ग्रंथालय इत्यादीचे बांधकाम करुन खाजगी व्यवसाय सुरु केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी म्हाडाच्या तसेच पालिकेच्या अधिका-यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर भूखंडावरील बांधकामाला महानगरपालिका व म्हाडाने कोणत्या निकषाद्वारे परवानगी दिली आहे वा परवानगी दिली नसल्यास, सदर बांधकामे निष्कासित करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबईच्या मंजूर विकास योजनेप्रमाणे म्हाडाच्या मालकीचा प्रश्नाधीन भूखंड खालीलप्रमाणे सध्या आरक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | न.भु.क ६३८ अअक्लब व पॅव्हेलियम | ४००२.८० चौ.मी. |
| २) | न.भु.क ६३८ बबमाध्यमिक शाळा व खेळाचे मैदान | ३५६०.४० चौमी. |
| ३) | न.भु.क ६३८ अअखेळाचे मैदान | १३४३४.७० चौ.मी. |

सदर भूखंडाचे एकुण आरक्षित क्षेत्र २०९९७.९० चौ.मी. इतके आहे. वरील न.भु.क्र. ६३८ अ व ६३८ क चे एकंदर क्षेत्र १७४३७.५० चौ.मी. इतके आहे सदर क्षेत्रापैकी ७६५३ चौ.मी. इतके क्षेत्र म्हाडाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस पूर्वी हस्तांतर केलेले होते. सदर क्षेत्र बृहन्मुंबई महानगरपालिकेने सन १९८९ मध्ये देखभालीसाठी एम.आय.जी. क्रिकेट क्लबला दिलेले होते. जुन्या मंजूर विकास योजनेप्रमाणे व खेळाचे मैदानासाठी आरक्षित होते. त्यावेळी बृहन्मुबई महानगरपालिकेने सदर भूखंड क्षेत्र फळाच्या १५ % इतक्या क्षेत्रफळाचे क्लब हाऊस बांधण्यास परवानगी दिलेली होती. तदनंतर म्हाडाने सदर १७४३७.५० चौ.मी. क्षेत्र एम.आय.जी.क्रीकेट क्लबला दिनांक १८.३.२००४ पासून भाडेपट्याने दिलेले आहे.

मंजूर विकास योजनेप्रमाणे न.भू.क्र. ६३८ अ ह्या क्लब व पॅव्हेलियनसाठी आरक्षित झालेल्या भूखंडावर एम.आय.जी. क्रिकेट क्लब यांना क्लब हाऊस व पुरक उपक्रमासाठी १.०० चटई क्षेत्र निर्देशकांप्रमाणे बृहन्मुंबई महानगरपालिकेने परवानगी दिलेली असुन त्याप्रमाणे बांधकामास भोगवटा प्रमाणपत्रही दिलेले आहे. न.भु.क्र. ६३८ व या माध्यमिक शाळेच्या भूखंडावर एम.आय.जी क्रीकेट क्लब शाळा बांधून महानगरपालिकेस हस्तांतरण करणार आहे. शाळेच्या बांधकामास जागेवर सुरुवात इ ाालेली आहे.

(२) एम.आय.जी क्रिकेट क्लबला प्राधिकरणाच्या ठरावाने दिलेल्या किंमतीबाबत मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून उघड चौकशी सुरु आहे.

(३) विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार सदर भूखंडावरील बांधकामास बृहन्मुंबई महानगरपालिकेडून परवानगी देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भ् ावत नाही.

-----------------

u

## खटाव व माण (जि.सातारा ) तालुक्यातील बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँकेच्या शाखेच्या ७ एटीएम मशीनमध्ये रक्कम न भरता केलेला अपहार

u

**(११०) * २९६५५ uश्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड)ड:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा

करतील काय :-

u

(१) सातारा जिल्हयातील खटाव तालुक्यातील वडूज, औध व माण तालुक्यातील दहिवडी, गोंदवले येथील बँक ऑफ महाराष्ट्र व स्टेट बँकेच्या शाखेच्या ७ एटीएम मशीनमध्ये रक्कम न भरता १ कोटी ५ लाख १२ हजार रुपयांचा झालेला अपहार व फसवणूक प्रकरणी वडूज पोलिसांनी चौघांना अटक केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गुन्ह्या प्रकरणी तपास करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,

(२) प्रकरणी सातारा शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३८१/१५ व कोरेगांव पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १०१/१५ भा.दं.वि. कलम ४०७, ४०८, ४२० प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यामध्ये आतापर्यंत एकून १८ आरोपी पैकी १६ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांचेकडून अपहृत १ कोटी ५ लाख १२ हजार रकमेपैकी रु. १८ लाख ५० हजार इतकी रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. अटक आरोपीची पोलीस रिमांड घेऊन तपास करण्यात आला असून सद्य:स्थितीत आरोपी जामीनावर आहेत, गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

u

**देगलूर व बिलोली,( जि.नांदेड) येथील पोलीस कर्मचारी व अधिकारी यांच्यासाठी असलेल्या शासकीय निवासस्थानाची अत्यंत दुरावस्था झाल्याबाबत**

u

**(१११)** * **३२२५५ uश्री.सुभाष साबणे (देगलूर)र:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) देगलूर व बिलोली (जि.नांदेड) येथील पोलीस ठाणे अंतर्गत कार्यरत पोलीस कर्मचारी व अधिकारी यांच्यासाठी असलेल्या शासकीय निवासस्थानाची अत्यंत दुरावस्था झाल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवासस्थाने दुरूस्तीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, यांना दि. २६ मे, २०१५ रोजी वा तद्‌नंतरही पत्रव्यवहार करून सदर बाब निदर्शनास आणूनही अद्यापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्‌नुसार कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :**
(१) हे खरे आहे.

देगलुर पोलीस ठाणे येथे ३ अधिकारी निवासस्थाने व ४७ कर्मचारी निवासस्थाने आहेत त्यापैकी ६ निवासस्थाने राहण्यास पूर्णत: निरुपयोगी असून ४१ निवासस्थाने ही डागडुजी करुन वापरात आहेत तसेच बिलोली पोलीस ठाणे येथे पोलीस अधिकारी १ निवासस्थान व ४४ कर्मचारी निवासस्थाने आहेत त्यापैकी ४० निवासस्थाने राहण्यास निरुपयोगी असून उर्वरित ४ निवासस्थानाची डागडुजी करुन ते वापरात आहेत. सदरची निवासस्थाने ही निजामकालिन आहेत,

(२), (३) व (४) याबाबतचा अद्यावत प्रस्ताव प्राप्त करुन घेण्यात येत आहे.

-----------------

## ठाणे जिल्हयातील तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मोडकळीस आलेल्या चाळी व अनधिकृत इमारतीमध्ये राहणा-या रहिवाशांच्या पुनर्वसनाबाबत

u

**(११२) * ३४८११ uश्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) I:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(१) ठाणे जिल्हयातील तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मोडकळीस आलेल्या चाळी व अनधिकृत इमारतीमध्ये जवळपास ३० ते ४० वर्षे राहणा-या रहिवाशांच्या पुनर्वसनाबाबत,क्लस्टर योजना व सर्वसामान्यांना परवडणारी घरे या योजनांची एकत्रितपणे अंमलबजावणी करण्यासाठी तेथील लोकप्रतिनिधींनी व रहिवाशांनी दि.४ ऑगस्ट २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री, गृहनिर्माण मंत्री व आयुक्त ठाणे महानगरपालिका यांना निवेदन दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ठाणे जिल्ह्यतील तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रहिवाशांनी मोडकळीस आलेल्या चाळी व धोकादायक इमारतीच्या पुनर्विकासाबाबत मा.गृहनिर्माण मंत्री यांना निवेदन दिल्याचे गृहनिर्माण विभागाच्या अभिलेखावरुन दिसून येते.

(२) व (३) मोडकळीस आलेली घरे, क्लस्टर व परवडणारी घरे यांच्या एकत्रित विकासासाठी क्लस्टरची नवीन योजना लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. त्यानुसार नोटीस जनतेच्या अवलोकनार्थ प्रसिध्द केली असता अशी योजना लागू करण्यापूर्वी Impact Assesment Report प्राप्त करुन घेऊन मगच योजना लागू करावी, असे निर्देश मा.उच्च न्यायालयाने एका जनहित याचिकेत दिले आहेत. ठाणे महानगरपालिकेने त्यानुसारचा Impact Assesment Report तयार करुन घेतल्याने त्या महानगरपालिकेसाठी Cluster योजना लागू करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

-----------------

u

**मुंबईतील बंद गिरणाच्या जमिनीवर म्हाडा तर्फे बांधण्यात आलेल्या सदनिका निकृष्ट दर्जाच्या असल्याबाबत**

u

**(११३) * ३०९०४ uश्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम)म:** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) मुंबईतील बंद गिरणाच्या जमिनीवर उभारण्यात आलेल्या घराची लॉटरी म्हाडामार्फत सन २०१२ मध्ये काढण्यात आली या लॉटरीत कामगारांना वितरीत करण्यात आलेल्या घरांना गळती लागली असल्याची तक्रार कामगारांनी म्हाडाकडे केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कारणास्तव निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकाला पुन्हा घरांचे बांधकाम देण्यात येवू नये अशी मागणी गिरणी कामगारांनी केली असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करीत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. प्रकाश मेहता :** (१) सुधारित विकास नियंत्रण नियमावलींतील नियम ५८ (१) (ब) मधील तरतुदीनुसार मुंबईतील बंद/आजारी गिरण्यांपैकी १८ गिरण्यांमधील गिरणी कामगारांसाठी ६९४८ सदनिका बांधण्यात आल्या असून दिनांक २८ जून, २०१२ रोजीच्या सोडतीद्वारे यशस्वी ठरलेल्या पात्र गिरणी कामगारांना ५७६८ सदनिकांचा म्हाडामार्फत ताबा देण्यात आलेला आहे. उर्वरीत यशस्वी अर्जदारांबाबत कार्यवाही चालू आहे.

उपाध्यक्ष, म्हाडा यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार म्हाडामार्फत वितरीत करण्यात आलेल्या गिरणी कामगारांसाठीच्या सदनिकांपैकी स्वान मिल शिवडी, स्डॅन्डर्ड मिल शिवडी, न्यु हिंद मिल माझगाव येथील काही रहिवाशांकडून गळतीबाबतच्या तक्रारी म्हाडाकडे प्राप्त झाल्या होत्या. सदरहू तक्रारीच्या अनुषंगाने म्हाडामार्फत प्रत्यक्ष पाहणी केली असता रहिवाश्यांनी केलेल्या अंतर्गत कामामुळे गळती झाल्याचे आढळून आले. सदर गळतीच्या अनुषंगाने मे.बी.जी.शिर्के कन्स्ट्रक्शन टे.प्रा.लि. यांच्याकडून दुरुस्ती करुन घेण्यात आलेली आहे.

(२) अशा प्रकारची मागणी गिरणी कामगारांकडून शासनास थेट अथवा म्हडामार्फत प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भ् ावत नाही.

-----------------

u

**मुंबई शहरातील रेल्वे मार्गात टाकल्या जाणा-या कच-याबाबत**

u

**(११४) * २९६८१ uश्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर)र:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) मुंबई शहरातील रेल्वे मार्गात टाकला जाणारा कित्येक टन कचरा रेल्वे प्रशासनाने राज्य प्रदूषण मंडळाची परवानगी न घेता वाशी खाडीत टाकला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रेल्वे प्रशासन व मुंबई महानगरपालिका यांच्या झालेल्या बैठका व पत्रव्यवहारानुसार रेल्वे प्रशासनाने रेल्वे मार्गातील कचरा महापालिकेच्या हद्दीत आणून ठेवावा त्यानंतर महापालिका सदर कचरा उचलेल असे मान्य झालेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रेल्वे प्रशासनाने राज्य प्रदूषण मंडळाची परवानगी न घेता कचरा वाशी खाडीत टाकल्यामुळे रेल्वे प्रशासनावर राज्य प्रदूषण मंडळाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u
**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून खाडीमध्ये कचरा टाकण्यासाठी परवानगी दिली जात नाही. तथापि वाशी ते मानखुर्द स्टेशन येथील रेल्वे प्लॅटफॉर्म ट्रॅक व यार्ड येथील नागरी घनकचरा वाशी खाडीत टाकण्यात येत असल्याच्या स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पाहणी केली असता, वाशी खाडीकडील उड्डाणपुलाखालील रेल्वेच्या जागेत नागरी घनकचरा जमा असल्याचे आढळून आले.
(२) हे खरे आहे.
(३) नागरी घनकचऱ्याची नियमानुसार विल्हेवाट लावावी म्हणून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत मुख्य व्यवस्थापक, हार्बर लाईन, मुंबई यांना नागरी घनकचऱ्याची घन कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० नुसार विल्हेवाट लावण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

-----------------

u

## केईएम रुग्णालयात रुग्णांच्या नातेवाईकांनी तीन निवासी डॉक्टरांवर हल्ला केल्याबाबत

u
**(११५) * ३२३८८ uश्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर)र:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) केईएम रुग्णालयात रुग्णांच्या नातेवाईकांनी तीन निवासी डॉक्टरांना लोखंडी सळईने दिनांक २५ सप्टेंबर, २०१५ रोजी पहाटे मारहाण केल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रुग्णालयात निवासी डॉक्टरांवर होणारे हल्ले व

त्यांच्या सुरक्षिततेबाबत शासनाद्वारे कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात येणार आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) प्रस्तुत प्रकरणी चौकशीची कार्यवाही करण्यात येत असून चौकशीअंती चौकशीचा अहवाल बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सक्षम अधिकाऱ्यांना सादर करण्यात येईल.

के.ई.एम. रुग्णालयात मारहाण झालेल्या डॉक्टरांनी भोईवाडा पोलीस स्टेशन येथे दिनांक २५.०९.२०१५ रोजी तक्रार दाखल केली आहे व भोईवाडा पोलीस स्टेशनकडूल आरोपींवर कारवाई करण्यात येत आहे.
(३) निवासी डॉक्टरांवर होणारे हल्ले व त्यांच्या सुरक्षिततेबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपायये ाजना करण्यात आल्या आहेत.

- uके.ई.एम. रुग्णालयात सुरक्षा रक्षकांची संख्या वाढविण्यात आली आहे.
- सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून उपाययोजना म्हणून १४५ सी.सी.व्ही.कॅमेरे बसविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
- सदर रुग्णालयात रुग्णांच्या जवळ असलेली गर्दी कमी करण्यासाठी रुग्णांच्या केवळ २ नातेवाईकांना पास देण्यात येत आहे.
- निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांना रुग्णांशी व त्यांच्या नातेवाईकांशी सुसंवाद साधण्याविषयी सुचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भ् ावत नाही.

-----------------

u

## सोलापूर जिल्ह्यातील महापालिका शिक्षण मंडळात गणवेश व साहित्य खरेदींमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

u

**(११६) * ३३३४५ uकुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य)य:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) सोलापूर जिल्ह्यातील महापालिका शिक्षण मंडळात गणवेश खरेदी आणि १६ शाळांमधील साहित्य खरेदीमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार करुन शिक्षकांच्या बेकायदेशीर नियुक्त्या केल्याचा ठपका ठेवून चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी शिक्षण मंडळातील पदाधिकारी व सदस्यांनी केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गणवेश व साहित्य खरेदींमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा प्रकारची मागणी करण्यात आली होती. तथापि, लाभार्थी विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्याचे सर्व अधिकार शालेय व्यवस्थापन समिती यांना असून सदर समितीमार्फत गणवेश खरेदी करण्यात आले आहेत. तसेच, शाळा व्यवस्थापन समितीच्या स्तरावर १६ शाळांनी संसाधन कक्षासाठी आवश्यक असलेल्या साहित्याची खरेदी सन २०१३ मध्ये केली असून त्याचे लेखापरिक्षणही करण्यात आले आहे. तसेच, दि. ०२.०५.२०१२ च्या शासन निर्णयानंतर प्राथमिक शाळेमध्ये कोणत्याही शिक्षकाची नियुक्ती करण्यात आलेली नाही.

सबब, सदर प्रकरणी तथ्य नसल्याचे आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांनी स्पष्ट केले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भ् ावत नाही.

-----------------

u

## पुण्यातील समाजकल्याण विभागाचे उपायुक्तांना लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केल्याबाबत

u

**(११७)** * **३०८४२ uश्री.शरददादा सोनावणे (जुन्नर)र:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) पुण्यातील समाजकल्याण विभागाचे उपायुक्त महादेव रामकजी वैद्य व शिपाई नरहरी सोनबा तेली यांनी चार प्राथमिक शिक्षकांची सेवा कायम ठेवणे आणि वसंतराव नाईक प्राथमिक आश्रम शाळा, नांदेड येथे एक स्वयंपाकी ठेवण्यासाठी मंजुरी इत्यादी कामांकरिता जुन्या तारखांचे आदेश काढून देण्यासाठी दोन लाख रूपयांची लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक २१ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास समाजकल्याण कार्यालयात सापळा रचून अटक केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तपास पूर्ण करण्यात आला आहे काय, असल्यास, तपासाचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** १) होय.

या प्रकरणी संबंधीत अधिकारी व शिपाई यांना दि.२२.०७.२०१५ रोजी अटक करण्यात आली.

(२) व (३) वसंतराव नाईक प्राथमिक आश्रमशाळा गवंडगाव, ता.देगलूर, जि.नांदेड या आश्रमशाळेतील ४ शिक्षक व १ स्वयंपाकी यांच्या नियुक्तीस मान्यता देण्यासाठी संबंधीत अधिकारी यांनी तक्रारदार श्री.शंकर किसनराव राठोड यांचेकडे रु.२,००,०००/- इतक्या रक्कमेची लाच मागितली होती. सदरहू लाचेची रक्कम आरोपी लोकसेवक श्री.माधव वैद्य यांनी मागणी करुन कार्यालयीन शिपाई श्री.नरहरी तेली यांनी

दि.२२.०७.२०१५ रोजी स्विकारली आहे. त्यानुसार स्वारगेट पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.३०८५/२०१५, लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ च्या कलम ७, १२, १३(१)(ड) सह १३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात येवून दोन्ही आरोपी लोकसेवकास दि.२२.०७.२०१५ रोजी अटक करण्यात आली होती. आरोपी लोकसेवक श्री.माधव वैद्य, प्रादेशिक उपआयुक्त, समाजकल्याण लातूर यांना शासन आदेश दि.०५.०८.२०१५ अन्वये अटकेच्या दिनांकापासून निलंबित करण्यात आले आहे. तसेच कार्यालयीन शिपाई श्री.नरहरी तेली यांची प्रादेशिक उपआयुक्त, समाजकल्याण पुणे विभाग, पुणे यांच्या दि.२१.०८.२०१५ च्या आदेशान्वये अन्य ठिकाणी बदली करण्यात आली आहे. संबंधीत आरोपी लोकसेवकांविरुध्द न्यायालयात अभियोग दाखल करण्यास परवानगी देण्याची बाब विचाराधीन आहे.

-----------------

u

**राज्यातील माहिती अधिकारातील प्रलंबित प्रकरणाची संख्या वाढत असल्याबाबत**

u

**(११८) * २९५९८ uॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम)म:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) राज्यातील माहिती अधिकारातील प्रलंबित प्रकरणाची संख्या वर्षागणिक वाढत असून राज्यभरात एकूण २४ हजार १९१ व्दितीय अपिलांची प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) माहे ऑगस्ट, २०१५ अखेरीस राज्य माहिती आयोगाकडील प्रलंबीत व्दितीय अपिल प्रकरणांची संख्या २४ हजार ८९० इतकी असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) माहिती आयुक्त, नाशिक आणि औरंगाबाद ही रिक्त पदे भरण्याकरीता शासन प्रयत्नशील आहे.

-----------------

u

**नांदेड शहरातील विविध विकास कामांबाबत**

u

**(११९) * ३३९८५ uश्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) ी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) जेएनएनयुआरएम योजनेअंतर्गत शिल्लक असलेले रुपये ३८ कोटी व शहर विकासासाठी अतिरिक्त खर्च केलेले रुपये १६ कोटी असे एकुण ५४ कोटी रुपये केंद्र शासनाकडून येणे बाकी असून हा निधी मिळाल्यास नांदेड शहराच्या विकासकामांना मदत होणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड शहरातील विविध विकासाची कामे जेएनएनयुआरएम, बीएसयुपी व नगरोत्थान योजनेतून हाती घेण्यात आली असून या योजनेत मनपाचा १० टक्के तर नगरोत्थान योजनेत ५० टक्के सहभाग आहे विविध योजनांसाठी भरावयाच्या मनपाच्या सहभागाची रक्कम उभारणीसाठी मनपाचे महसूली उत्पन्न कमी पडत असल्याने मनपाला विविध स्वरुपाची कर्ज उभारावी लागत आहेत, हे खरे आहे काय, u

(३) असल्यास, केंद्राकडून येणारा निधी संबंधित नांदेड शहराला मिळाल्यास अपुर्णावस्थेतील कामे मार्गी लागतील हे पाहता शासन याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करीत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) जेएनएनयुआरएम टप्पा क्र. ०१ अभियानाअंतर्गत नांदेड महानगरपालिकेस मंजूर झालेल्या निधी पैकी रूपये ३८.२६ कोटी इतका निधी केंद्र शासनाने राखून ठेवलेला आहे, हे खरे आहे.

(२) नांदेड शहरात राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांसाठी नांदेड महानगरपालिकेच्या स्वहिश्याचे प्रमाण खालीलप्रमाणे आहे.

| **क्र.** | **योजना** | **स्वहिस्सा (प्रकल्प किमतीच्या टक्के)** |
|---|---|---|
| १ | जेएनएनयुआरएम-१ | १०% |
| २ | बीएसयुपी | २% |
| ३ | नगरोत्थान | ३०% |

| | | |
|---|---|---|
| | | |

नांदेड महानगरपालिकेमार्फत प्रकल्पाची अंमलबजावणी करताना संबंधित योजनेच्या वित्तीय आकृतीबंधानुसार निधी उभारणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर योजनांच्या महानगरपालिका सहभागाची रक्कम उभी करण्यासाठी नांदेड महानगरपालिकेमार्फत कर्जाची उभारणी करण्यात आलेली आहे.

(३) व (४) नागरी सुधारणांची पूर्तता करण्यात येऊन त्यानुसार नांदेड शहरासह जेएनएनयुआरएम टप्पा-०१ अंतर्गत इतर अभियान शहरांसाठी सुधारणेपोटी अप्राप्त असलेला १० टक्के निधी मिळणेबाबत केंद्र शासनाकडे वेळोवेळी पाठपूरावा करण्यात आला आहे. तथापि सदर उर्वरीत १० टक्के निधी केंद्र शासनाकडून उपलब्ध केला जाणार नसल्याबाबत केंद्र शासनाकडून कळविण्यात आलेले आहे.

-----------------

u

**राज्यात कार्यरत असणाऱ्या पोलीस कर्मचारी अधिकाऱ्यापैंकी तब्बल १ लाख ३४ हजार पोलीस शासकीय निवासापासून वंचित असल्याबाबत**

u

**(१२०) * ३६८७२ uश्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी),**

**श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य)य:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कार्यरत असणाऱ्या २ लाख १९ हजार ९६६ पोलीस कर्मचारी अधिकाऱ्यापैंकी तब्बल १ लाख ३४ हजार पोलीस अजूनही शासकीय निवासापासून वंचित असल्याची बाब दिनांक २९ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय निवासस्थान न मिळाल्याने पोलीसांना खूप दुरवरुन कामावर यावे लागत असल्यामुळे त्याचा परिणाम पोलीसांच्या कार्यक्षमतेवर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :**

(१) राज्यात पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची एकूण ८६ हजार ५१५ निवासस्थाने उपलब्ध असून, ८० टक्के उद्दीष्टाप्रमाणे १ लाख ७७ हजार ३४९ अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता आवश्यक असणारी एकूण ९० हजार ५३४ निवासस्थानांची

आवश्यकता आहे,
(२) व (३) पोलीस दलातील कार्यरत असणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना (१) शासनाच्या निधीतून, (२) दिनांक २.९.२०१५ च्या न.वि.वि.च्या अधिसूचनेनुसार उपलब्ध होणाऱ्या वाढीव चटईक्षेत्राचा वापर करुन तसेच (३) पोलीस कर्मचाऱ्यांच्या खाजगी सहकारी गृह निर्माण प्रकल्पांना प्रोत्साहन देऊन निवासस्थाने उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे,
(४) प्रश्न उद्‌भ् ावत नाही.

-----------------

u

**डोंबिवली (पूर्व)(जि.ठाणे) येथील खारफुटी तोडून भूमाफियांनी मोठया प्रमाणात बेकायदा चाळीचे बांधकाम केल्याबाबत**

u

**(१२१) * २९७३५ uश्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण)ण:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) कल्याण डोंबिवली महापालिकेतील डोंबिवली पूर्व येथील आयरे, कोपर पूर्व आणि भोपर या भागात खारफुटी तोडून भूमाफियांनी मोठया प्रमाणात बेकायदा चाळीचे बांधकाम केलेले असून या चाळींना पालिकेच्या जलवाहिन्यांतुन चोरुन पाणी पुरवठा केला जात असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत खारफुटीची बेकायदेशीरपणे तोड करुन बेकायदा चाळी बांधणाऱ्या भूमाफियांवर व त्यांना अभय देणाऱ्या पालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भ् ावत नाही.

-----------------

u

**चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदी असूनही अनेक खेड्यात व शहरात सर्रास दारु विक्री केली जात असल्याबाबत**

u

**(१२२) * ३०१९८ uश्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) ी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदी असूनही ब्रम्हपूरी तालुक्यात व शहरातील हॉटेल, चायनिज सेंटर व अन्य टपऱ्यांवर अवैधरित्या बनावट दारु विक्री सुरु असल्याचे माहे ऑगस्ट २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक खेड्यात व शहरात सर्रास दारु विक्री केली जात असल्याची माहिती संबंधित विभागाला असूनही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यात अवैधरित्या दारु विक्री करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.
ब्रम्हपूरी तालुक्यात व शहरातील हॉटेल्स, चायनिज सेंटर व अन्य टपऱ्यांवर अवैध दारु विक्री सुरु असल्याबाबतची बाब निदर्शनास आली नाही. u
(२) नाही.

चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक खेड्यात व शहरात सर्रास दारु विक्री केली जात असल्याची माहिती संबंधित विभागाला असूनही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे, हे म्हणणे योग्य नाही.

चंद्रपूर जिल्ह्यात दि.०१/०४/१५ रोजीपासून दारुबंदी घोषीत करण्यात आली आहे. दारुबंदीची अंमलबजावणी यशस्वीरित्या करण्यासाठी चंद्रपूर जिल्ह्यात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.
(३) अवैध दारु वाहतुक व विक्रीवर आळा घालण्यासाठी प्रत्येक पोलीस स्टेशन स्तरावर भरारी पथक तयार करण्यात आलेले असुन जिल्हा पातळीवर स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर येथे २ भरारी पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

पोलीस स्टेशन स्तरावरील गोपनिय यंत्रणा सतर्क करुन जास्तीत जास्त दारुबंदीचे केसेस करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे महिला दारुबंदी मंडळ, महिला बचत गट, महात्मा गांधी तंटामुक्त समिती, शिक्षक, प्रतिष्ठित नागरिक, ग्राम पंचायत/जिल्हा परिषद सदस्य यांची मदत घेण्यात येत आहे.

प्राप्त माहितीच्या आधारे तात्काळ छापे घालुन व दारु जप्त करुन आरोपीस अटक करण्यात येत आहे.

दारु विक्री करणाऱ्या गुन्हेगारांवर कलम ९३ मुदाका अन्वये कार्यवाही करण्यात येते.

जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनमध्ये स्थापन करण्यात आलेल्या अवैध दारु विक्री छापा पथकाद्वारे कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भ् ावत नाही.

-----------------

u

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रात अंबरनाथ व पनवेल या नव्या महापालिका स्थापनाबाबत

u

**(१२३) * ३०२८६ uश्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) ी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) राज्य शासनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रात अंबरनाथ व पनवेल अशा दोन नव्या महापालिका स्थापन करण्यासंदर्भात मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने यासंबंधीच्या प्रारुप आराखडा तयार केला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रारुप आराखड्यानुसार ठाणे जिल्ह्यात अंबरनाथ व कुळगांव, बदलापूर नगरपालिकांचे एकत्रीकरण आणि रायगड जिल्ह्यातील उलवे, नवीन पनवेल व खारघर या सिडको उपनगरांचा समावेशकरून पनवेल महापालिका स्थापण करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाला सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी आयोजित केलेल्या १३८ व्या बैठकीमध्ये प्रारुप मुंबई महानगर प्रादेशिक योजना २०१४-२०३४ मुंबई नियोजन समितीस सादर करण्यास मान्यता दिली आहे. मुंबई महानगर नियोजन समितीकडून प्रादेशिक योजना अंतिम करण्यात येईल.

अंबरनाथ, कुळगाव-बदलापूर नगरपालिकांचा एकत्रीकरण करुन एक नवीन महानगरपालिका निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच नवीन मुंबई नवनगर क्षेत्रातून उलवे, नवीन पनवेल, कळंबोली व खारघर यांचा पनवेल नगरपालिकेत समावेश करुन एक नवीन महानगरपालिका निर्माण करण्याचेही प्रस्तावित आहे.

(३) मुंबई महानगर नियोजन समितीने प्रारुप प्रादेशिक योजना अंतिम करुन शासनाच्या मंजूरीसाठी सादर करणे अपेक्षित आहे. तसेच शासन निर्णय दिनांक २३.११.२०१५ अन्वये पनवेल, अंबरनाथ, कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रुपांतर करण्याकरीता विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती गठीत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

-----------------

u

## कल्याण डोंबिवलीतील आरक्षित भूखंडांवर भूमाफियांनी अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

u

**(१२४) * २८८१८ uअॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम)म:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) कल्याण डोंबिवली शहराच्या नियोजनबद्ध विकासासाठी २० वर्षांपूर्वी आखणी करून, १ हजार २११ भूखंड सार्वजनिक वापरासाठी आरक्षित करण्यात आलेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास , महानगरपालिका अधिका-यांच्या निष्काळजीपणामुळे यातील ४९० हेक्टर क्षेत्रफळाच्या ६२५ भूखंडावर भूमाफियांनी कब्जा करून अनधिकृत बांधकाम केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारे सार्वजनिक वापरासाठी आरक्षित भूखंड बळकावणारे भूमाफिया आणि त्यांच्याकडे दुर्लक्ष करणारे पालिका अधिकारी यांच्यावर शासनातर्फे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, कल्याण डोंबिवली येथील सध्या मोकळे असलेले ५८६ भूखंड वाचविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,

(२) ते (५) आरक्षित जमिनीवर अनाधिकृत बांधकाम होणार नाही याची दक्षता महानगरपालिकेकडून घेण्यात येते त्याउप्पर अतिक्रमण/ अनाधिकृत बांधकाम आढळून आल्यास अधिनियमातील तरतुदीनुसार निष्कासित करण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येते.

-----------------

u

## नळदुर्ग, जि. उस्मानाबाद येथे IHSDP व म्हाडाच्या १२०६ घरकुलांच्या योजनेत गैरव्यवहाराबाबत

u

**(१२५) * २९१८७ uश्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण)ण:** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नळदुर्ग, जि. उस्मानाबाद येथे IHSDP योजनेतून म्हाडाच्या माध्यमातून १२०६ घरकुलांची योजना १० % लाभार्थी हिश्श्यावर मंजूर करण्यात आली होती परंतु मूळ किंमती मध्ये बदल करून निविदा काढली गेली व लाभार्थ्याकडून रु.२५,००० अतिरिक्त रक्कम घेतली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाभार्थीची मूळ यादी व बायोमेट्रिक यादी यात प्रचंड तफावत असून

अल्पसंख्याक, भटके व विमुक्त जाती यांच्यासाठी घरकुल आरक्षित केले नसल्याने मूळ लाभार्थी योजनेपासून वंचित राहिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेतून फक्त ३०२ घरकुल तयार झाले असून या घरांचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचा अहवाल सार्वजनिक बांधकाम विभागाने दिला असल्याचे निदर्शनास आले आहे. हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या गैरव्यवहाराबाबत संबंधित लोकप्रतिनिधी व अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) आयएचएसडीपी योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थ्यांकडून १२% तर अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/इतर मागासवर्गीय/शारिरिक अपंग आणि इतर दुर्बल घटक याप्रवर्गातील लाभार्थ्यांकडून १०% इतके अंशदान देण्यात येते. नळदुर्ग येथील घरकुलाच्या अंशदान रु. २९,३५१ इतके असून १२०६ घरकुलांच्या सदर प्रकल्पाला केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीच्या दि. ९.१.२००८ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली आहे. तथापि घरकुलांची प्रगती समाधानकारक नसल्यामुळे केंद्र शासनाने सदर प्रकल्प ३७८ घरकुलांसाठी सिमित केलेला आहे.

(२) नाही. अद्याप लाभार्थ्यांसाठी निकषानुसार आरक्षण निश्चित केलेले नसून लाभार्थ्यांना घरकुलाचे वाटप करण्यात आलेले नाही.

(३) सदर प्रकल्पातील एकूण ३७८ पैकी ३०२ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असून ७६ घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे. घरकुलांचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अहवाल नळदुर्ग, नगर परिषद कार्यालयास प्राप्त झालेला नाही.

(४) व (५) सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे जनहित याचिका दाखल करण्यात आलेली असून प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

u

**राज्यात तसेच यवतमाळ जिल्ह्यातील पोलिस दलाच्या मोटार परिवहन विभागात १० कोटीं रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत**

u

**(१२६) * ३१९९२ uडॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व),श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.वैभव पिचड (अकोले)`:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) यवतमाळ येथील पोलिस दलाच्या मोटार परिवहन विभागातील (एमटी) वाहनांचे निर्धारित किलोमीटरपेक्षा कमी व्हरेज दाखवून आणि लॉग बुक मॅनेज करुन डिझेल-पेट्रोल मध्ये गैरव्यवहार झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच यापूर्वीही राज्यात उपरोक्त विभागात बोगस स्पेअर पार्ट खरेदीत रुपये १० कोटींचा गैरप्रकार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u
**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) पोलीस महासंचालक कार्यालयाकडून महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांना सखोल चौकशी करण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे. अहवाल प्राप्त झाल्यावर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

-----------------

u

## लातूर जिल्हा पोलीस दलातील रिक्त पदे भरण्याबाबत

u
**(१२७) * २९६६७ uश्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर)र:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्हा पोलीस दलात ८६ पदे रिक्त असून सद्य:स्थितीत जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था बळकट करण्यासाठी मनुष्यबळाची अत्यंत गरज असूनही रिक्त पदे भरण्यात येत नसल्याने कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून गेल्या ९ महिन्याच्या काळात ६१६ ठिकाणी चो-या व घरफोड्या केल्याच्या घटना घडल्या असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील रिक्त पदे भरण्याबाबत तसेच चो-या व घरफोड्या रोखण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे कारणे काय आहेत ?

u
**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) लातूर जिल्हा पोलीस दलात काही पदे रिक्त आहेत. तथापि, सदर रिक्त पदांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा कोणताही गंभीर प्रश्न निर्माण झ ालेला नाही.

(२) सदरची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच नोव्हेंबर अखेर दाखल गुन्ह्यांपैकी २५१ गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत. तसेच दरोड्याच्या गुन्ह्यातील ३ टोळ्यांना अटक करण्यात आली आहे. दरोड्याच्या एका गुन्ह्यात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी प्रतिबंधक कायदयाप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच गुन्हे घडु नये म्हणून रात्रगस्त, दरोडा प्रतिबंधक गस्त डिव्हीजनल पेट्रोलिंग, जिल्हा गस्त चालु आहे.
(३) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

-----------------

**अकोला महानगरपालिकेत प्रभाग क्र.२२ मध्ये शौचालयाच्या बांधकामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

u

**(१२८) * ३५१३६ uश्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम)म:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) अकोला महानगरपालिकेत प्रभाग क्र.२२ मध्ये शौचालयाच्या बांधकामात भ्रष्टाचार करुन अधिका-यांनी लाखोंचा अपहार केल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या धोरणानुसार १० शौचालयांचे बांधकाम मंजूर करण्यात आले असताना केवळ ६ शौचालयांचे बांधकाम करण्यात येऊन उर्वरित ४ शौचालये न बांधता १० शौचालयांच्या बांधकामांची देयके काढण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषी अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.
अकोला महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. २२ मध्ये रु. ५ लक्ष इतक्या खर्चाचे १० सिट्सचे एक सार्वजनिक शौचालय बांधण्यास अकोला महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने मंजूरी दिली.

तथापि, या शौचालयाचे प्रत्यक्ष काम हाती घेतल्यानंतर जागेची कमतरता आणि स्थानिक नागरीक तसेच महानगरपालिका सदस्यांची मागणी विचारात घेवून या प्रभागात एका बाजूस महिलांकरिता २ सिट्सचे शौचालय अशी एकूण ८ सिट्स ची दोन स्वतंत्र सार्वजनिक शौचालये बांधण्यात आले.

दोन ठिकाणी स्वतंत्र शौचालये बांधण्यात आल्याने दोन वेगवेगळे सेफ्टीक टँक बांधण्यात आले. परिणामी कामात झालेल्या अनुषंगिक वाढीमुळे या प्रयोजनाकरिता रु. ४,९९.८३५/- एवढा खर्च झाला असून करारनाम्यतील मंजूर दरानुसार प्रत्यक्ष मोजमाप करुन देयक अदा करण्यात आले आहे.
(३) वरील वस्तुस्थितीच्या पार्श्वभमीवर या प्रकरणी प्राथमिक चौकशी अंती कोणीही दोषी आढळून न आल्याने याबाबत कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

(४) प्रश्न उद्‌भ् ावत नाही.

-----------------

u

**दोंडाईचा नगरपालिकेच्या वतीने शिवाजी पुतळ्याजवळ बेकायदेशिररित्या शॉपिंग सेंटरचे बांधकाम केल्याबाबत**

u

**(१२९) * ३४०६८ uश्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) I:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) दोंडाईचा नगरपालिकेच्या वतीने शिवाजी पुतळ्याजवळ बेकायदेशिररित्या शॉपिंचे बांधकाम करुन मराठी, ऊर्दू, आणि गुजराथी माध्यमांच्या पालिकेच्या शाळेतील मुलांना येण्या-जाण्यासाठी रस्ताच शिल्लक ठेवला नसल्याची गंभीर तक्रार जिल्हाधिकारी, धुळे यांच्याकडे सामाजिक कार्यकर्ते श्री.सुहास साठे यांनी केल्यानंतर जिल्हाधिकारी , धुळे यांनी या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी उपविभागीय अधिकारी, शिरपूर भाग, शिरपूर यांना चौकशीसाठी पाठविले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पालिकेच्या वतीने सादर करण्यात आलेल्या नकाश्यात ३० ते ४० वर्षापूर्वी बांधकाम झालेले शॉपिंग सेंटर दाखविण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाला ाचुकीची माहिती देवून दिशाभुल करणा-या दोंडाईचा पालिकेच्या अधिका-यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, धुळे यांच्यामार्फत तत्कालीन नगरपालिका मुख्याधिकारी व नगर रचनाकार, धुळे यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

**राज्यातील कंत्राटी कामगारांच्या समस्यांबाबत**

u

**(१३०) * २९८८१ uप्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम)म:** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) राज्यात कंत्राटी कामगारांची संख्या वाढत असून ती सध्या ७० टक्के इतकी झाली असल्याने त्यांची परिस्थिती हालाखीची असून काही कंत्राटी कामगारांची नोंद ही ठेवली जात नाही, तसेच त्यांचे वेतन कमी असल्याने कामगारांचे शोषण वाढत असल्याचे मत कामगार नेते यांनी दिनांक ३० ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास मांडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटी कामगारांच्या समस्या सोडविण्याबाबत देशातील कामगार संघटनांचा दिनांक २ ऑगस्ट, २०१५ रोजी संप करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कंत्राटी कामगारांच्या वेतनात वाढ करण्याबाबत तसेच कामगार कायद्यातील काही त्रुटी दूर करुन बदल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे खरे नाही , तसेच दिनांक ३० ऑगस्ट, २०१५ चे निवेदन या कार्यालयास प्राप्त झालेले नाही.
(२) देशपातळीवर सर्व कामगार संघटनांनी विविध मागण्यांसाठी दिनांक २ ऑगस्ट, २०१५ रोजी एक दिवसाचा संप केला होता.

(३) कंत्राटी कामगारांना देण्यात येणारे वेतन किमान वेतन अधिनियमान्वये निश्चित केले जाते.
(४) प्रश्न उद्‌भ‌्ावत नाही.

-----------------

**पुणे शहरासाठी पाणी पुरवठा करण्यात येणा-या भामा आसखेड धरणातून आळंदी नगरपरिषदेस पाणीपुरवठा करणेबाबत**

**(१३१) * २८८६६ uश्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) ि: तारांकित प्रश्न क्रमांक ६६१५ ला दिनांक ३ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरासाठी भामा आसखेड धरणातून करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा योजनेतुन आळंदी नगरपरिषदेस पाणी मिळणेकरिता नगरविकास राज्यमंत्री यांसकडे माहे एप्रिल २०१५ च्या सुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाणीपुरवठा योजनेबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे माहे ऑक्टोबर २०१५ च्यासुमारास बैठक झाली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बैठकीच्या अनुषंगाने आळंदी नगरपरिषदेस पाणी देण्याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला वा घेण्यात येत आहे,
(४) असल्यास, सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे. अध्यक्ष, आळंदी नगरपरिषद यांनी राज्यमंत्री (नगर विकास) यांच्याकडे मागणी केली होती.
(२) होय. २१ ऑक्टोबर, २०१५ रोजी जिल्हाधिकारी पुणे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली आहे.

(३), (४) व (५) सदर बैठकीत आळंदी नगरपरिषदेने पाणी पुरविण्याबाबत केलेल्या मागणीच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिका अधिका-यांनी तांत्रिक अभ्यास करुन दि. २१/११/२०१५ पर्यंत अहवाल सादर करावयाचा होता. तथापि तो अद्याप अप्राप्त असल्याने अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार त्वरीत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

u

**समृध्दी जीवन फुडस इंडिया लिमिटेड कंपनीने गुंतवणूकदारांची तब्बल ६०० कोटी रूपयांची फसवणूक केल्याबाबत**

u

**(१३२) * ३३५७९ uश्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर)र:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) समृध्दी जीवन फुडस इंडिया लिमिटेड कंपनीवर सेबी ने बंदी घातलेली असतानांही कंपनीने मराठवाड्यासह राज्यभरातील जवळपास ४ लाख गुंतवणूकदारांची तब्बल ६०० कोटी रूपयांची फसवणूक केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी स्थानिक पोलिस स्थानकांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच गुंतवणूकदारांचे पैसे परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२)
समृध्द जीवन फुड्स इंडीया लिमीटेड कंपनीने फसवणूक केल्याबाबत पुणे शहरातील चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३८४/२०१४ भा.दं.वि. कलम ४०६, ४२० प्रमाणे दि.२०/११/२०१४ रोजी व डेक्कन पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.३२३/२०१५ भा.दं.वि. कलम ४२०, १८८, १२०(ब) दि.३१/१०/२०१५ रोजी गुन्हा दाखल आहे. तसेच जळगांव जिल्ह्यात चाळीसगांव पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.६२/२०१३ भा.दं.वि. कलम ११४, ४२०, ४२६, ४२७, ४७७, ४७७(अ), ३४ नॉन बँकिग फायनान्स इन्स्टी. क. ५८ (ब) (४अ) प्रमाणे दि.२५/०२/२०१३ रोजी असे तीन गुन्हे दाखल असून याव्यतीरिक्त राज्यात कुठेही गुन्हे दाखल नाहीत.
(३) सदर गुन्ह्यांचा तपास योग्य पध्दतीने व्हावा यासाठी दि.२७/११/२०१५ च्या आदेशान्वये गुन्ह्याचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपविण्यात आला आहे.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## मुंबई येथील व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयाचे प्रशिक्षण संचालक श्री.जे.व्ही.भुतांगे यांची चौकशी करण्याबाबत

**(१३३) * ३०६८६ uश्री.सुनिल राऊत (विक्रोळी) ी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांचे कौशल्य विकसित करण्यासाठी व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयाकडून महागडी उपकरणे खरेदी करण्याची प्रक्रिया राबविण्यात आली. प्रशिक्षण संचालक श्री.जे.व्ही.भुतांगे यांनी बनावट निरीक्षण अहवाल देवून खरेदी केलेल्या युनिर्व्हसल मिलिंग मशीन आणि व्हकिल मिलिंग मशीन प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याच्या अनेक तक्रारी होत्या सदर प्रकरणाची लाचलुचपत विरोधी पथकाकडून (एसबी) चौकशी सुरु असतांना श्री.भुतांगे यांची ज्या विभागाकडून अनियमिततेचे आरोप करण्यात आले त्याच विभागात पुनर्वसन करण्यात आले असल्याची बाब दिनांक १८ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशी पूर्ण झाली नसतांना श्री.भुतांगे यांच्या पुनर्वसन कोणत्या आधारावर करण्यात आले, त्यांचे पुनर्वसन करणा-या विरुध्द शासनाने काही ठोस कारवाई केली आहे काय वा करण्यात येत आहे काय,

(३) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) श्री.ज.द.भुतांगे यांच्या विरुध्द खरेदी प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत खुली चौकशी करण्यासाठी शासनाने दि.१२.९.२०१३ रोजी परवानगी दिली असुन, लाचलुचपत विभागाचा अहवाल व निष्कर्ष अद्याप अप्राप्त आहे. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयात संचालक (व्यवसाय शिक्षण) व संचालक (प्रशिक्षण) अशी दोन पदे असुन श्री.भुतांगे हे संचालक (व्यवसाय शिक्षण) या पदावर नियमितपणे कार्यरत आहेत. तथापि संचालक (प्रशिक्षण) हे पद सध्या रिक्त असुन सदर पदाचा uसेवा व लेखा विषयक बाबींचा ा अतिरीक्त कार्यभार आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई यांच्याकडे शासनाने सोपविला आहे. तसेच uसेवा व लेखा विषयक बाबी वगळुन उर्वरीत प्रशिक्षण विषयक कामकाजाचा ा अतिरीक्त कार्यभार श्री.भुतांगे यांच्याकडे सोपविण्याचा निर्णय दि.२५.८.२०१५ च्या आदेशानुसार शासनाने घेतला आहे.

(२) प्रश्न उद्‌भ ावत नाही.

(३) प्रश्न उद्‌भ ावत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयातील uअनेस्थेसिया मशीनन

**खरेदीत कोटयवधी रुपयाचा गैरव्यवहाराबाबत**

**(१३४) * २८८०४ uडॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.जीवा गावित (कळवण), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) ा:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयातील रुग्णांना शस्त्रक्रीयेपुर्वी भूल देण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या u ॲनेस्थेसिया मशीन u खरेदीत कोटयावधी रुपयाचा गैरव्यवहार व फसवणुक झाल्याचे प्रकरण दिनांक ५ ऑगस्ट , २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, महानगरपालिकेने इंग्लंड मधून ॲनेस्थेशिया च्या ५० मशिन्स मागविण्यासाठी रुपये ६ कोटी ४२ लाखाचे कंत्राट मंजूर केले त्यापैकी ३० चीनी बनावटीच्या मशिन्स पुरविण्यात आल्याने महानगरपालिकेचे रुपये ३ कोटी ४२ लाखाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, सदर चायना मेड मशिन्स लाखो रुपयांची जकात बुडवून मुंबईत आणण्यात आल्याने जकात विभागाने अकरा पट दंड म्हणून २ कोटी ११ लाख रुपये आकारलेला दंड कंत्राटदार कंपनीने बुडविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केले आहे काय, त्यानुसार सदर मशिन्स खरेदीच्या कंत्राटदार कंपनीवर तसेच या गैरव्यवहारात गुंतलेल्या महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे,

(२) हे खरे आहे,

(३) हे खरे आहे,

(४) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खात्यामार्फत केलेल्या चौकशीनंतर कंत्राटदार मे. युनिव्हर्सल ऑरगॅनिक्स यांना महापालिकेने कायमस्वरुपी काळया यादीत टाकले आहे,

कंत्राटदार मे, युनिव्हर्सल ऑरगॅनिक्स यांनी भरलेली कंत्राट अनामत रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिकेने जप्त केली आहे, तसेच त्यांचे व्हेंडर रजिस्टेशनही बंद केले आहे, सदर कंत्राटदाराविरुध्द आग्रीपाडा पोलीस स्टेशन, मुंबई येथे क्रमांक ९७८०/२०१५, दिनांक २७ ऑक्टोंबर, २०१५ अन्वये एफ.आय.आर. नोंद करण्यात आला आहे, तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कारवाई सुरु आहे,

(५) प्रश्न उद्भ् ावत नाही.

-----------------

**मुंबई शहरातील वाडीबंदर ते घाटकोपरकडे जाण्यासाठी बांधलेल्या फ्रि-वे आणि**

**आणीक पांजराफोळ जोड रस्त्यांवरील प्रकल्प बांधितांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(१३५) * २९६९८ uश्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सुनिल शिंदे (वरळी) ी:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) मुंबई शहरातील वाडीबंदर ते घाटकोपरकडे जाण्यासाठी बांधलेल्या फ्रि-वे आणि आणीक पांजरापोळ जोड रस्त्यांवरील २००० प्रकल्प बांधितांचे घरे देऊन पुनर्वसन करावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० ऑगस्ट, २०१५ रोजी मा.मुख्यमंत्र्यांकडे निवेदन देऊन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणी प्रकरणी मा.मुख्यमंत्र्यांनी एमएमआरडीएला दिलेल्या आदेशानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे तसेच किती कालावधीत प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी दिनांक २०/०८/२०१५ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली असून सदर बैठकीचे इतिवृत्त मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे पाठविण्यात आले असून सदर निर्णयानुसार पुढील कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भ् ावत नाही.

-----------------

u

**कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने रस्त्यांच्या कॉक्रिटीकरण व दुरुस्तीच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

u

**(१३६) * २९७४५ uश्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा-कळवा), श्री.सुरेशभाऊ लाड (कर्जत) श्री.संजय केळकर (ठाणे) ॆ:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने ३२ मुख्य रस्त्याच्या कॉक्रिटीकरणाचे काम व शहरातील ४० प्रमुख रस्त्यांचे पुर्नपृष्टीकरणासाठी रुपये ६० कोटी खर्च केले परंतु सदर ३२ रस्त्यांच्या कॉक्रीटीकरणाचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाल्याने तसेच ६० कोटी रुपयांच्या पुर्नपृष्टीकरणाचे कामात मोठया प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याने कल्याण

येथील महिलांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे लेखी तक्रार केल्याचे माहे सप्टेबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले, तदनुसार सदर रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करुन भ्रष्टाचार करणाऱ्या ठेकेदार, महापालिका अभियंते व इतर संर्व संबंधितांवर कोणती कडक कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?
u
**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,
(२) सदर तक्रारीची कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत प्राथमिक चौकशी करण्यात आली असून उक्त तक्रारीत प्रथमदर्शनी तथ्य नसल्याचे दिसून येत असल्याबाबत आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

-----------------

u
**नवी मुंबई व ठाणे येथील १४ जणांना पोलीस शिपाई म्हणून भरती करुन देण्याचे अमिष दाखवून फसविल्याबाबत**

u
**(१३७) * ३०२९२ uश्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम)म:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) नवी मुंबई व ठाणे येथील १४ जणांना मुंबईत पोलीस शिपाई म्हणून भरती करुन देण्याचे अमिष दाखवून ५६ लाख रुपयांना लुटणाऱ्या चार जणांना नेरुळ पोलीसांनी पकडले असल्याचे माहे सप्टेंबर २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u
**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नेरुळ पोलीस स्टेशन येथे फिर्यादी व त्याचे तीन मित्र यांच्याकडून एकून रु.१५,१०,०००/- घेऊन फसवणूक केल्याबाबत तक्रार दाखल करण्यात आली होती.
(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने नेरुळ पोलीस स्टेशन, नवी मुंबई येथे गु.र.क्र.१६४/२०१५, भा.दं.वि.कलम ४२०, १७०, ४६४, ४६५, ४६७,४६८, ४७१, १२० (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून तपासाअंती ५ आरोपीना अटक करण्यात आली आहे.
गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.
(३) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

-----------------

## मुंबईतील एसआरएच्या इमारतींमध्ये अग्निशमक यंत्रणा बसवण्याबाबत

u

**(१३८) * २८८२५ uॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्रीमती तृप्ती प्रकाश (बाळा) सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सदा सरवणकर (माहिम), :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातंर्गत (एसआरए) बांधण्यात येणा-या इमारतींमध्ये विकासकांनी मुंबई महानगरपालिकेच्या अग्निप्रतिबंधक कायद्यानुसार तयार केलेल्या नियमावलीनुसार अग्निशमन यंत्रणेची व्यवस्था केलेली नसल्यामुळे या इमारतींना आगीचा मोठा धोका असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या इमारतींना आग लागल्यास तेथील अरूंद रस्त्यामुळे घटनास्थळी अग्निशमन दलाच्या गाडया पोहचूच शकत नाहीत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार मुंबईतील एसआरएच्या इमारतींमध्ये अग्निशमक यंत्रणा बसवण्याकरीता शासन कोणत्या ठोस उपाययोजना करणार आहे वा करीत आहे,
(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ते (४) झापेडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत बांधण्यात येणाऱ्या २४ मीटर पेक्षा जास्त उंचीच्या इमातीसाठी विकास नियंत्रण नियमावलच्या विनियम १७ नुसार ९.०० मीटर रुंदीचा प्रवेश व परिशिष्ट ४ च्या खंड ६.११ प्रमाणे इमारती सभोवतालची मोकळी जागा किमान ६.०० मीटर किंवा मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी विहीत केल्याप्रमाणे ठेवणेची तरतुद आहे. तथापि २४.०० मीटर कमी उंचीच्या इमारतीसाठी उक्त खंड ६.११ चे तरतुदीनुसार किमान सामासिक अंतर १.५० मीटर ठेवणेबाबत तसेच खंड ६.१९ च्या तरतूदीनुसार ३.६० मीटर रुंदीचा पोहोच मार्ग असण्याची तरतूद आहे. २४.०० मी पेक्षा जास्त उंचीच्या इमारतीसंदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दस्तांकडून नाहरकत प्रमाणपत्रांच्या अटी व शर्तीनुसार मंजूरी देणेची कार्यवाही करण्यात येते.
(५) लागू नाही.

-----------------

u

## सोलापूर येथे विमानतळाच्या जागेवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाले असल्याबाबत

u

**(१३९) * ३४८३८ uश्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण)ण:** सन्माननीय **मुख्यमंत्री**

पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u

१. सोलापूर येथे विमानतळाच्या जागेवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
२. असल्यास, अतिक्रमित वस्तीला मनपा सोलापूर यांनी नळ, वीज तसेच इतर सोई उपलब्ध करून अतिक्रमणास खतपाणी घातले असल्याचेही निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
३. असल्यास, सदर अतिक्रमण हटविण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा करण्यात येत आहे,
४. नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) विमानतळाच्या जागेवर कंपाऊंड वॉल बांधली असून तेथे अतिक्रमण झालेले नाही.
(२) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.
(३) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.
(४) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

-----------------

u

**मेहेकर (जि.बुलढाणा) तालुक्यात राधाई इन्वेस्टमेंट सर्व्हिस प्रा.लि.च्या संचालक व एजंटानी अनेकांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याबाबत**

u

**(१४०)** * **३२००३ uडॉ.संजय रायमुलकर (मेहकर)र:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(१) मेहेकर (जि.बुलढाणा) तालुक्यात झटपट श्रीमंतीचे अमिष दाखवून राधाई इन्वेस्टमेंट सर्व्हिस प्रा.लि.च्या संचालक व एजंटानी अनेकांची लाखो रुपयांची फसवणूक केल्या प्रकरणी माहे मार्च, २०१५ मध्ये तसेच दिनांक १ व १६ जून, २०१५ रोजी लोणार पोलीस स्टेशन व दिनांक ६ जून, २०१५ रोजी बुलढाणा पोलीस स्टेशन येथे तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी तक्रारी देऊनही पोलिसांनी कारवाई करण्यास टाळाटाळ केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कंपनीचे संबंधित संचालक, एजंट यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u
**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) राधाई इन्वेस्टमेंट सर्व्हिस प्रा.लि च्या संचालक व एजंटानी अनेकांची लाखो रुपयांची फसवणूक केल्या प्रकरणी केलेल्या तक्रारीवरुन अर्जदारास फसवणूक इ ााल्याबाबत कागदपत्र सादर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. परंतु अर्जदाराने कागदपत्र न दिल्यामुळे तक्रारी प्रलंबित होत्या.
दिनांक २७.११.२०१५ रोजी अर्जदाराने पोलीस स्टेशन लोणार येथे फसवणूक इ ााल्याबाबतचे कागदपत्रासह तक्रार दाखल केली. त्याअनुषंगाने राधाई इन्वेस्टमेंट सर्व्हिस प्रा.लि चे अध्यक्ष, संचालक व एजंट यांच्याविरुध्द गु.र.क्र.२१५/१५, भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्‌भ् ावत नाही.

-----------------

u

**अकोला महापालिकाक्षेत्रात रमाई घरकुल आवास योजनेतील गैरव्यवहाराबाबत**

u

**(१४१) * ३५१४० uश्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम)म:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) शासनाने अकोला महापालिका क्षेत्रातील गोरगरिबांसाठी रमाई घरकुल आवास योजना राबविली असताना गोरगरिबांची घरे वळती करुन बनावट कागदपत्रे तयार करुन संगनमताने शासनाच्या योजनेचा दुरुपयोग करुन महापालिका आयुक्तांनी गैरव्यवहार केल्याची माहिती ऑडिट विभागाच्या तपासणी दरम्यान माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार सर्व संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

u

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. महालेखापाल कार्यालयाकडून या योजनेचे लेखापरिक्षण झालेले नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भ् ावत नाही.

-----------------

u

**मुंबईतील, मुलुंड पूर्व, न्यू पीएमजीपी व म्हाडा वसाहतीचे रिएलिटर्स विकासकाने बांधकाम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत**

u

**(१४२) * ३०७७७ uश्री.सुनिल राऊत (विक्रोळी)ी:** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) मुंबई, मुलुंड पूर्व, न्यू पीएमजीपी व म्हाडा वसाहतीचा दि रिएलिटर्स या खासगी

विकासकाकडून पुनर्विकास प्रकल्प राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पाचे बांधकाम अतिशय निकृष्ट दर्जाचे असून इमारतीच्या गृहप्रवेशापूर्वीच इमारतीचे प्लास्टर ढासळण्यास सुरुवात झाली असल्याची बाब दिनांक ४ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इमारतीच्या बांधकामाची गुणवत्ता तपासणी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, येथील निकृष्ट दर्जाचे बांधकामाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार दोषी विकासकावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे अंशत: खरे आहे. न्यु. पी.एम.जी.पी., मुलुंड (पूर्व), मुंबई , या म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकास प्रकल्प विकास नियंत्रण नियमावली ३३(५) अंतर्गत मे.रिचा रिएलेटर्स या खाजगी विकासकाकडून राबविण्यात येत असलेल्या इमारतीचे १२ व्या मजल्यावरील बाल्कनी खालील साधारण १.० X १.० आकारमानाचे प्लासटर निघाल्याचे दिनांक ०४.०८.२०१५ रोजीच्या दरम्यान निदर्शनास आले होते. सदर दुरस्तीचे काम विकासकाने त्वरीत दुरुस्त केलेले आहे.

(२) विकासकाकडून बांधकामाची गुणवत्ता वेळोवेळी तपासण्यात येते. याबाबत विकासकाचे तांत्रित सल्लागार डॉ.एच.एम.राजे यांनी सदर काम पूर्णत: सुरक्षित व राहण्यास योग्य असल्याचे प्रमाणपत्र मुंबई महानगरपालिकेस सादर केले आहे. मुंबई महानगरपालिकेकडून कामाची पाहणी करुन सदर इमारती राहण्यास योग्य असल्याची पाहणी करुन भोगवटा प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

(४) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

(५) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

u

u

**विधान भवन :** **u** **डॉ. अनंत कळसे**

**नागपूर.** **u** **प्रधान सचिव**

**महाराष्ट्रविधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.